म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. 9393

कर्नाटक संतमुकुटमणि

# भक्त श्रीपुरंदरदास

REFBK-0010963
REFBK-0010963

दा. ५ं.
१०९६५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५१६५ वि: चरित्र
क्रमांक ९९० नों: दि: ५-१-५
चरित्र

कर्नाटक संत मुकुटमणी–

# श्री पुरंदरदास

★

लेखक :

**श्री. दा. गो. सगोराम,**

बी. ए. एस्. टी. सी.

मुख्याध्यापक : राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळ हायस्कूल,

पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १०९६३
शाखा

श्री रामतत्व प्रकाशन
बेळगांव

REFBK-0010963
REFBK-0010963

[ पुढील सर्व ...

[ कि. २ रु. ] १९६०

श्री [ ... ]
... – बेळगांव.

मुद्रक व प्रकाशक :
**श्री. शिवाजीराव आबाजीराव सावंत**
श्री रामतत्व प्रकाश छापखाना बेळगांव

# प्रस्तावना

★★★★★★★★★

कर्नाटक - संत - मुकुटमणि **श्री संत पुरंदरदास,** यांच्या जीवनाचा व वाङमयाचा अल्पपरिचय, या ग्रंथद्वारें, श्री. दा गो. संगोराम हे मराठी वाचकांना करून देत आहेत. कोणच्याहि प्रांतांत व कोणच्याहि काळीं असले तरी, संत हे एकच भाषा बोलतात. कारण सर्व संतांनीं एकाच **सद्वस्तूचा** अनुभव घेतलेला असतो. ज्यानें साखर खाल्ली–मग तो कोठें कां असेना – तो साखर गोड असते, असेंच सांगणार. तसेंच आत्मानुभवी साधूंचें आहे हल्लींच्या भारताच्या स्थितींत फुटीरपणा वाढत असतांना, सर्वांतील ' एक ' वस्तूचा अनुभव सांगून, प्रकृतिधर्मावरून, आपण जरी वेगवेगळे दिसत असलों, तरी आंतरिक् दृष्ट्या ' एकच ' आहोंत, असें शिकविणाऱ्या वाङमयाच्या प्रसाराची फार गरज आहे. कै. साने गुरूजी यांच्या ' भाषाभगिनीं 'च्या बुडाशीं असणाऱ्या तत्त्वापेक्षां, यांतील तत्त्व अधिक व्यापक आहे. या दृष्टीनें श्री. संगोराम यांच्या या प्रयत्नाचें अभिनंदन करणें अवश्य आहे. या योगें दोन भाषिकांचा ( कन्नड बोलणारे व मराठी बोलणारे ) परिचय अधिक जवळून होईल, व एकमेकांना एकमेकांचें हृदय कळून येईल.

श्री. संगोराम यांच्या चरित्राचे विषयभूत श्री **पुरंदरदास** हे तर महान् **साधु** व **कवि** म्हणून प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रांत तुकोबा, उत्तर प्रदेशांत श्री तुलसीदासजी, तसे कर्नाटकांत पुरंदरदास आहेत. त्यांनीं केलेलीं पदें गोड, रसाळ, व भक्तिप्रधान, अशीं आहेत. व तीं कन्नडिग

लोकांना अतिशय आवडणारीं आहेत. अशांपैकीं कांहींचा मराठींत अनुवाद करून या पुस्तकांत घातला आहे. आशा आहे कीं, मराठी वाचकवर्ग, (श्री. संगोराम यांनीं हा जो श्री पुरंदरदासांच्या कृतीचा अल्प परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे) त्याचें चीज करील, व दासांची जी मूळ काव्यकृति आहे, तिचा अभ्यास करील.

पुणें
दि. २-१-१९६० }

शं. वा. दांडेकर.

# ग्रंथ – समर्पण

★

लहानपणापासून दासांच्या भजनाचें आणि भक्तिमार्गाचें

बीजारोपण माझ्या हृदयांत करून ज्यांनीं मला

शाश्वत सुखाचा अध्यात्म मार्ग दाखविला

त्या माझ्या परमपूज्य वैकुंठवासी

पित्यास–

**: तीर्थरूप गोपाळ रामचंद्र संगोराम :**

यांच्या दिव्य स्मृतीस हें वाङ्मय पुष्प अत्यंत प्रेमादरानें

आणि भक्तिभावानें अर्पण केलें आहे.

**–दामोदर गोपाळ संगोराम.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनु क्रो ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि: ............

# नम्र निवेदन

★★★★★★

जें निवेदन करावयाचें तें करून झालें आहे. तें तरी मी केलें आहे काय ? ' परी त्या विश्वंभरें बोलविलें. '

लहानपणापासूनच मला दासांची पद्यें ऐकण्याचा नाद ! माझे वडील तीं रोज अत्यंत तन्मयतेनें म्हणत असत. दासांच्या भूपाळ्या ऐकतांना मी तल्लीन होत असे. साधारणपणें तीस वर्षांपूर्वीं ती. वडिलांनीं दासांच्या शंभर कानडी पद्यांचा मराठींत अनुवाद केला. तेव्हांपासूनच त्यांचें चरित्र लिहावें हा हेतु मनांत वागवून मी होतों. ती. वडिलांच्या हयातींत ' दासशतपदी ' अगर चरित्र कांहींच प्रसिद्ध होऊ शकले नाहीं. त्यावेळीं आम्ही निपाणीस होतों. ती. वडिलांच्या पश्चात् मी पुण्यास वास्तव्य केलें. मनांत मात्र वडिलांची इच्छा पूर्ण करण्याची तीव्र इच्छा जागृतच होती. सहा सात वर्षांपूर्वीं ' द्वैत-सिद्धांत केसरी ' चें संपादक श्री. रामाचारी अवधानी यांनीं मला श्रीपुरंदरदासाचें चरित्र लिहिण्यास प्रोत्साहन दिलें व तें मासिकांत छापण्याचें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें तीन प्रकरणें ' द्वैत-सिद्धांत केसरीं ' त छापून निघाली. पुनरपि लेखनाचें काम स्थगित झालें.

विशेषतः कर्नाटकांत आणि इतरत्रहि पुरंदरदासांची पुण्यतिथी साजरी होत असते. पुण्यातहि ' पुरंदरदास सेवा मंडळ ' ही संस्था दासांच्या पुण्यतिथीचा उत्सव प्रतिवर्षी मोठ्या समारंभानें साजरी करीत असते. संस्थेचे चालक माझे स्नेही श्री. अरळीकट्टी यांनीं मला ' सकाळ ' पत्रामध्यें दासांचें त्रोटक चरित्र लिहिण्याची आग्रहाची सूचना केली. त्याप्रमाणें मी चरित्र लिहिण्याचें काम पुनः सुरू केलें. मनामध्यें असा विचार आला कीं, लिहायचें तर मोठेंच चरित्र लिहूं. ता. १२ फेब्रुवारी १९५६ रोजीं 'सकाळ' मध्यें पुरंदरदासाचें संक्षिप्त चरित्र छापून आलें. तें

वाचून सर्व चरित्र लिहून काढण्याबद्दल व त्यांच्या उपदेशाचें सार मराठी वाचकांना समजून देण्याबद्दल बऱ्याच जणांनीं मला सांगितलें. मी पांच सहा वर्षापूर्वी कांहीं मित्रांबरोबर निंबाळ येथें गुरुदेव रामभाऊ रानडे यांच्या दर्शनास गेलों होतों त्यावेळीं मी दासांच्या चरित्र लेखनाचा माझा हेतु निवेदन केला. कांहीं पद्यांचा अनुवाद म्हणून दाखविला त्यांना दासांच्या भजनांचें भारी प्रेम ! त्यांच्या भजनसंग्रहांत दासांची पद्यें असून तीं नित्य पाठांत आहेत. त्यांनींहि मला आशिर्वाद दिला. याचप्रमाणें सांगलीस **कैवल्य धामांतहि** पालखीच्यावेळीं दासांचीं पदें म्हणतात. अशा संताच्या चरित्रास ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकरांचाच आशीर्वाद योग्य म्हणून मी त्यांना दोन वर्षापूर्वी भेटलों त्यांनींहि आनंदानें चार शब्द लिहिण्याचें कबूल केलें. याप्रमाणें सर्व ठीक झालें. पण पुस्तक छापून कसें निघायचें ? मोठाच प्रश्न पडला. पण सर्व गोष्टी ईश्वरी संकेतानुसारच होत असतात. या न्यायानें मी बेळगांवास आलों असतां श्री. रघुनाथराव सावंत यांना भेटलों. त्यांचा माझा परिचय होता. त्यांनीं त्यांचे बंधु श्री. शिवाजीराव यांची ओळख करून दिली ! याप्रमाणें 'रामतत्त्व प्रकाशा'चा प्रसाद मिळण्याची संधि मिळाली. सुस्वभावी श्री. शिवाजीरावांनी छापण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें. आज पन्नास वर्षांपासून **रामतत्त्व प्रकाशानें** अनेक धार्मिक ग्रंथ प्रकाशांत आणून लोकांवर एकप्रकारें ऋणच करून ठेवलें आहे. आद्य मध्वाचार्यांचे सर्वच ग्रंथ त्यांनीं छापून काढिले आहेत. एवढेंच नव्हें तर मध्वसांप्रदायाचें सर्वच ग्रंथ श्रीरामतत्त्वानें छापून काढले आहेत. 'दासर कीर्तनेगळु' म्हणून हरिदासांचा पद्य संग्रह चार भागांत त्यांनीं छापला आहे. विशेष हा कीं सदर भाग बालबोध लिपींत असल्यानें कानडी व मराठी वाचकांना अत्यंत उपयुक्त आहेत. त्या पुस्तकांचा मला बहुमोलाचा उपयोग झाला आहे. हें नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतों.

त्याचप्रमाणें माझे आप्त ह. भ. प. **बाबूराव कोटणीस** कैवल्य धाम सांगली यांनीं पुस्तक प्रकाशनाचा समारंभ सांगलीस कैवल्य धामांत करण्याचें आश्वासन दिलें. याप्रमाणें सर्व तयारी होऊन आज सदर ग्रंथ

प्रकाशांत येत आहे. 'निन्नसंकल्पानुसार माडो' असें जगन्नाथदास देवाला म्हणतात. ईश्वरी संकेतानुसारच सर्व गोष्टी घडतात.

दोन वर्षांपूर्वीं मला दिलेलें आश्वासन ह. भ. प श्री. सोनोपंत यांनीं स्मरून माझ्या या अल्प कृतीला अत्यंत प्रेमानें आशिर्वाद दिला हें मी माझें भाग्य समजतों. संत म्हणजे ईश्वरी साक्षात्कार देवविणारी ज्योति ! त्यांचे आभार मी कोणत्या शब्दांनीं मानूं ?

सदर ग्रंथ लिहिण्यास ज्या मुख्य पुस्तकांचा आधार घेतला त्या पुस्तकांचे लेखक 'पुरंदरदासार्यर चरित्र' लेखक श्रीपाददास हुंडे, शिवमोग्गा. 'Haridasas of Karnatak by Karmakar A. P. & Kalamdani N. B. त्याचप्रमाणें पुरंदरदासांच्या सर्व कवितांचे संग्राहक श्री. पावंजी गुरुराव यांचाही मी आभारी आहे.

श्री. शिवाजीराव सावंत यांच्यामुळें श्री. वामनराव भाटे एम्. ए., बी.टी., यांचा परिचय झाला. व त्याचें रूपांतर गाढ स्नेहांत झालें. श्री. भाटे यांनीं पुस्तक उत्तम रीतीनें निघण्याच्या कामीं बहुमोलाचें सहाय्य केलें आहे. हस्तलिखितें वाचणें, प्रुफें तपासणें, छपाईकडे वरचेवर लक्ष पुरविणें हीं कामें त्यानींच केलीं. नाहींतर मी पुण्यास राहून हीं कामें झालीं नसतीं. या दास चरित्रानें स्फूर्ति उत्पन्न होऊन नथेच्या प्रसंगावर त्यांनीं केलेली सुंदर कविता परिशिष्टांत छापली आहे. या सर्व गोष्टींबद्दल त्यांचे आभार कितो मानले तर ते थोडेच आहेत. सदर पुस्तकांत पुण्याचे श्री. देशपांडे यांनीं ब्लाक्स् करण्यास सुंदर प्रसंग चित्रें काढून दिलीं याबद्दल त्यांचेही मी आभार मानतों. रामतत्त्व प्रकाशचे मालक **श्री. सावंत बंधु,** मॅनेजर व सर्व कामकरी मंडळी यांनीं उत्साहानें ठरलेल्या मुदतींत पुस्तक छापून काढले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. मुखपृष्ठावर श्रीदासांचें जें चित्र आहे त्याचा ब्लॉक करण्यास **श्री. अरळीकट्टी** यांनीं आपण तयार करवलेला मूळ फोटो दिला याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

यापुढें 'कर्नाटक संतदर्शन' हा ग्रंथ लिहून काढण्याचा संकल्प करून जनताजनार्दनाच्या चरणीं हें नम्र निवेदन अर्पण करीत आहे

पुणें
दि. १७ जानेवारी ६०

सर्वांचा नम्र-
दा. गो. संगोराम.

## परिशिष्ट [ अभिप्राय ]

[ 'कैवल्यधाम' सांगली येथें दि. १७-१-१९६० रोजीं संत कोटनीस महाराजांच्या समाधिसान्निध्यांत सदर 'श्रीपुरंदरदास' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ कै. गुरुदेव रानडे यांचे परमशिष्य मे. काकासाहेब तुळपुळे यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला. त्यावेळीं ह. भ. प. बाबूराव कोटनीस व अध्यक्षमहाराज यांनीं जीं भाषणें केलीं त्यांचा सारांश खालीं मुद्रित केला आहे. — प्रकाशक. ]

श्री. दा. गो. संगोराम बी. ए. पुणें यांनीं कर्नाटकांतील महान् संत श्रीपुरंदरदास यांचें अल्प चरित्र प्रसिद्ध करून त्या भक्तशिरोमणीचा व त्याच्या काव्याचा मराठी वाचकांना थोडक्यांत परिचय करून देण्याचा, प्रस्तुत पुस्तकांत, स्तुत्य प्रयत्न केला आहे. पुस्तकांतील भाषा सोपी, सरळ व ओघवती आहे. श्रीपुरंदर विठ्ठल यांचें कानडींतील मूळ काव्य अत्यंत मधुर, प्रासादिक व आध्यात्मिक अनुभवांनीं नटलेलें आहे. रागदारींतील त्यांचीं गाणीं प्रेमळ व बहारदार असल्यानें, ऐकणाऱ्यांच्या चित्तवृत्ति, भाषा समजली नाहीं तरी, सहज तल्लीन होऊन जातात. प्रांत, भाषा, जातपात कोणतीही असो, सर्व भारतांतील महान् साधु-संतांचा परमेश्वरी साक्षात्कार एकच असल्यानें, समान उद्गार त्यांच्या काव्यांत आढळून येतात. चरित्रकारानें निरनिराळीं उदाहरणें देऊन या पुस्तकांत तेंच तत्त्व विशद केलें आहे. माध्व-सांप्रदायांतील मुख्य तत्त्वें, तसेंच, कर्मकांड व सोवळें ओवळें यांवर श्री पुरंदरदासांनीं ओढलेले कोरडे, यांचाही उल्लेख यांत आढळतो. श्री पुरंदरदासांच्या कांहीं पद्यांचा मराठींत अनुवाद दिला आहे. कानडी मूळ पद्यें दिलीं नाहींत. त्यामुळें मनाचें पूर्ण समाधान होत

नाहीं. कानडी मूळ पदें ' नागरी ' लिपींत देऊन, पुढें त्यांचें मराठी भाषांतर अगर अनुवाद अशी मांडणी पुढील आवृत्तींत केल्यास फार छान होईल. मूळ भाषेंतील लालित्य व माधुरी वाचकांना लुटतां येईल. या सूचनेचा श्री. संगोराम अवश्य स्वीकार करतील अशी आशा वाटते. शक्य तर कनकदासांचीहि दोन चार पदें अनुवादांसह द्यावींत.

श्रीक्षेत्र चिमडमठांत पालखीच्या सेवेच्या वेळीं जीं पदें म्हणतात व शिस्त पाळतात ती प्रथमपासूनच श्रीनिंबरगीकर महाराजांनीं ठरवून दिलेली आहे. ' बारो रंग यन्न मनिगे ' या महाराजांच्या पदानें सुरवात होऊन प्रदक्षिणेचा शेवट श्री पुरंदर-दासांच्या ' देव बंद-नम्म स्वामी बंदनो ' या पदानें होण्याचा, त्याच प्रमाणें पंचपदीच्या वेळीं संगीत सेवा ' दासन माडिको यन्न ' व ' याके दय माडुवल्ली ' ' श्रीहरीये ' ही दोन श्री पुरंदर विठ्ठ-लांचीं पदें प्रथम म्हणावयाचीं, अशी पद्धत श्रीनिंबरगीकर महा-राजांनीं ठरवून दिली, ती आजतागायत चालू आहे. याप्रमाणें महाराजांनीं श्री पुरंदरदासांच्या पदांना योग्य व अढळ स्थान दिलेलें आहे. देवाच्या दरबारांत सर्व भाषा - भगिनींच्या साधु-संतांना समान दर्जा व महत्त्व आहे, हा आदर्श शिष्यवृंदांपुढें ठेवला आहे.

श्री. संगोराम यांनी हें उपयुक्त पुस्तक लिहून योग्य समयीं प्रसिद्ध केलें. या अभिनंदनात्मक कार्याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद देऊन हा छोटासा अभिप्राय संपवीत आहे. त्यांच्या हातून अशीच मराठीची वाङ्मय सेवा होवो ! असा आशिर्वाद मी देत आहे.

" कैवल्य - धाम " सांगली.
ता. १७ - १ - ६०

रघुनाथ हणमंत कोद्नीस

## अध्यक्ष श्री. तुळपुळे यांचें भाषण ( सारांश )

" आपल्या देशांतील आत्मानुभूतीपर काव्य, साहित्य व तत्त्वज्ञान यांत आत्मानुभवी संतांनीं पुष्कळ भर टाकिली आहे. प्रत्येक देशांतील व भाषेंतील आत्मानुभूतीपर वचनें संकलित करणें, हें तेथील लोकांचें कर्तव्य आहे.

सर्व जगांतील इतस्ततः विखुरलेलीं अशीं वचनें संकलित करून एकत्र जोडलीं तर त्यांतून सुसंगत अशा आत्मानुभूतीच्या तत्त्वज्ञानाची एक संपूर्ण संगति तयार करतां येईल; त्या उज्वल तत्त्वज्ञानाच्या सूत्रानें अनुस्यूत असें विश्वाचें एक कुटुंब बनेल, व जगाचें ऐक्य साधतां येईल. "

( गुरुदेव रानडे: परमार्थपर व्याख्यानें पृ. ४४. )

गुरुदेव रानडे यांच्या वरील वचनांच्या दृष्टीनें विचार केला तर, " कर्नाटक संत मुकुटमणि भक्त श्री पुरंदरदास ' हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करून श्री. दा. गो. संगोराम बी. ए. यांनीं केंवळ कर्नाटक-महाराष्ट्र यांत प्रेमभाव निर्माण करण्याचेंच नव्हे, तर जगाचें ऐक्य साधण्याचें कार्य, अल्प प्रमाणांत " केलें आहे. जाति, भाषा, देश, काल हे भेद साक्षात्कारी संतांच्या ठिकाणीं राहू शकत नाहींत; ते भेदातीत असतात; म्हणून भेदातीत होण्याचा मार्ग तेच दाखवूं शकतात. संतांच्या जीवनाची ही एकरूपता ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, कबीर, कनकदास इत्यादिकांचीं उदाहरणें देऊन, लेखकानें, प्रस्तुत पुस्तकांत, दाखविली आहे. पुस्तकाची भाषा प्रौढ परंतु सोपी व ओघवती आहे. साधारणतः संतांच्या चरित्रांत खऱ्याखोटया चमत्कारांचाच भरणा फार असतो. या पुस्तकांतहि कांहीं चमत्कार दिले आहेत; परंतु त्याबरोबर साधनमार्ग, साक्षात्कार, माध्वतत्त्वज्ञान या विषयांचेंहि विवेचन केलें

आहे. ही समाधानाची गोष्ट आहे. यांतील माध्व-तत्त्वज्ञान वाचलें म्हणजे वैष्णवधर्मासंबंधीं कांहीं निराधार गैरसमज दूर होतात. वैष्णवांचें शंकरांशीं वैर नाहीं. त्यांच्या सांप्रदायांत शंकरांचें स्तोत्र रोज म्हणावें लागतें हें थोड्याच स्मार्तांना माहीत असेल. गोपीगीत व रासक्रीडा यासंबंधीं मतभेदास पुष्कळ जागा आहे. भागवतांत गोपीलीलांचा आशय कांहींहि असो. पुढें त्याचे दुष्परिणाम समाजावर झाले, यांत शंका नाहीं. तेव्हां गुरुदेव रानडे यांनीं आपल्या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें केवळ उपमारूपकें म्हणूनहि परमार्थांत श्रृंगार न शिरूं देणें अवश्य आहे.

श्री. संगोरामांचा "कर्नाटक-संत-दर्शन" ही लिहिण्याचा मानस आहे; त्याप्रमाणें पुरंदरदासांची निवडक पदें व श्री. संगोरामांच्या वडिलांनीं त्यांचा केलेला प्रासादिक अनुवाद प्रसिद्ध करावा, अशीही त्यांची इच्छा आहे. या दोन्ही गोष्टी त्यांनीं अवश्य कराव्यात. परमार्थप्रेमी मराठी वाचकांकडून त्यांचें स्वागतच होईल.

प्रस्तुत पुस्तकाच्या स्वरूपाचीं पुस्तकें आर्थिक दृष्ट्या लाभकारक होत नाहींत; क्वचित हानिकारकच ठरतात. पुस्तकाचे प्रकाशक, रामतत्त्व प्रकाश छापखान्याचे मालक श्री. शिवाजीराव सावंत यांना ही गोष्ट माहीत असलीच पाहिजे. तरीही विशेष ध्येयनिष्ठेनें त्यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें व त्याची किंमतहि अत्यल्प ठेविली हें अभिनंदनीय आहे. सुमारें १२५ पानांचें पुस्तक महागाईच्या काळांत केवळ दीड रुपयाला देणें फार कठीण आहे.

हें उपयुक्त बोधप्रद पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. संगोराम यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

सांगली
१८-१-६० } ग. वि. तुळपुळे

## • शुद्धिपत्रक •

| पा. नं. | | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ४ | ... | ६ | योग्यतेच | योग्यतेचे |
| ६ | ... | ८ | नमून | नसून |
| ८ | ... | ३ | होईन | होइन |
| ९ | ... | ११ | शिवाप्पा | शीनाप्पा |
| ,, | ... | १८ | ,, | ,, |
| १४ | ... | १७ | इके | इको |
| २० | ... | ३ | रक्षकं | रक्षक |
| २० | ... | ४ | काया | कायो |
| २५ | ... | ४ | नंदालाही | वेदांनाहि |
| २८ | ... | ४ | विट्ठला | विठला |
| २८ | ... | १९ | परॅरेनेगिल्ला | परॅरेनगिल्ला |
| ३२ | ... | ५ | देव | देवाचॅ |
| ३३ | ... | १४ | आहेत कां! | आहेत! कां |
| ३८ | ... | ७ | विराहामध्ये | विहारामध्ये |
| ४० | ... | १४ | दुच्छप्र | हुच्चप्र |
| ४२ | ... | २ | विवाहितीं | विवाहितां |
| ४२ | ... | १७ | क्रीडाखालीं | क्रीडाकालीं |
| ५३ | ... | १७ | संवगड्यांचा | संवगडिचा |
| ५४ | ... | ११ | बोध दे याला | याला बोध कर |
| ५९ | ... | २१ | न्यारुवलिदेरनु | न्यारुमुनिदेरनु |
| ६१ | ... | १० | पदुमनाभदलि | पदुमनाभनलि |

| पा. नं. | | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ६४ | ... | ४ | मारहर | नारदवरद |
| ७४ | ... | १२ | आषय | आशय |
| ७९ | ... | १६ | वेशधन | वंशधन |
| ८० | ... | ५ | यापरी | यापरि |
| ८२ | .... | १ | निज | निजं |
| ८३ | .... | १२ | पद्धति पद्धति | पद्धति |
| ८७ | ... | १८ | करुणविधिय | करुणानिधिय |
| ८७ | ... | १९ | नोउलीलु | नोसलोलु |
| ९० | ... | १ | श्रीमंधर | श्रीमंथनधर |
| ९१ | ... | १ | कनकखिडी | कनकनखिडी |
| ९४ | ... | ६ | आणि | आणि मुखानें |
| ९४ | ... | १० | स: | य: |
| ९४ | ... | १० | हरि | हरिं |
| ९४ | ... | १८ | प्रत्यक्षी | प्रत्यक्षो |
| ९५ | ... | ८ | माडलु | पाडलु |
| ९५ | ... | ९ | ,, | ,, |
| ९५ | ... | ९ | वलिवेनिव | वलिवेनिम |
| ९५ | ... | १५ | ऐकिली; | ऐकिली; प्रल्हादानें उभे राहून स्तुति केली: |
| १०४ | ... | २१ | प्राणांगत | प्राणांतर्गत |
| १०४ | ... | २१ | सुप्रीत प्रीत | सुप्रीत |

* * * * * *

# CHAMAN



रुचकर आणि स्वादिष्ट मुखशुद्धिसाठीं

# चमन


याचे सेवनानें तोंडास रुची येते व तहान
भागून आवाज खुलतो आणि मुख
सुगंधमय होतें
सर्वत्र मिळते
सुगंधी साहित्य आणि औषधें बनविणार

## स्टार कंपनी, बेळगांव.

सर्व प्रकारचीं शालोपयोगी इंग्रजी, मराठी, कानडी, हिंदी, संस्कृत आणि सर्व धार्मिक ग्रंथ मिळण्याचें एकमेव ठिकाण.

● श्रीरामतत्त्व बुक - डिपो, बेळगांव. ●

[ स्थापना १८७६ ]



श्रीविठ्ठलभक्त पुरंदरदास

# श्रीपुरंदरदास

मन्मनोऽभीष्ट वरदं सर्वाभीष्टवरप्रदम् ।
पुरंदरं गुरुं वंदे दासश्रेष्ठं दयानिधिम् ॥

* * * * * * *

१०८५२

## १ संतांचें अवतार कार्य :

संतश्रेष्ठ देशाच्या, जगाच्या, कोणत्याही भागांत अगर कोणत्याही कालीं अवतरले तरी त्यांचें निर्मल व उद्बोधक चरित्र, आणि जनहिताची आत्यंतिक तळमळ यांत केव्हांही उणेपणा ह्मणून आढळणार नाहीं. ईश्वरावर अढळ निष्ठा, कडकडीत वैराग्य आणि निर्मल असें सत्यज्ञान हे त्यांचे गुणविशेष होत. स्वतः उदासीन व व्यथारहित राहून मुमुक्षूंना स्वात्मोध्दाराचा भक्तीचा राजमार्ग दाखविणारे हेच खरे सद्गुरु होत. अज्ञानांधःकारांत चांचपडणाऱ्या, वारंवार अडखळणाऱ्या अज्ञजीवांना ज्ञान भक्तीचा प्रकाश दाखविणारे हे दीपस्तम्भच होत. या भाग्यसंपन्न भारतभूला भागवतोत्तमांनीं जन्म घेऊन अनेकपरीनें भूषविलें आहे. रामानंद, कबीर, सूरदास, तुलसीदास आदि संतानीं नगराजानें व गंगा, सिंधु, सरस्वती, यमुना इत्यादि सुरसरितांनीं प्रफुल्ल आणि प्रसन्न केलेल्या उत्तर प्रदेशाल आपल्या भक्ति-भावगीतांनीं निनादून सोडलें आहे.

त्याचप्रमाणें, श्रीज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, तुकाराम, चोखा मेळा आदि श्रेष्ठ संतांनीं या आर्यावर्ताची, तापी, गोदा, कृष्णा, भीमा या पवित्र नद्यांनीं वेढलेली मध्यभू विठ्ठलनाम संकीर्तनांनीं रंगवून सोडली आहे. आणि भारताच्या दाक्षिणभागीं असलेल्या तुंगा, कृष्णा, कावेरी, कपिला इत्यादि नद्यांनीं पवित्र आणि प्रसन्न केलेल्या कर्नाटकभूला, दासश्रेष्ठ श्रीपुरंदरदास व्यासराय, विजयदास, हयवदनदास, जगन्नाथदास, गोपाल दास, कनकदास आदि महान् भागवतांनीं मंडित करून आपल्या दिव्य प्रासादिक वाणीनें गायिलेल्या भगवन्नाम संकीर्तनांनीं भाविकांच्या अंतःकरणाला हरिभजनाचें वेड लावलें आहे. खरोखर सकल जीवांच्या उध्दारार्थ अवतरलेल्या या संतश्रेष्ठांच्या बहुमोल उपदेशाचा परिमल सर्वत्र ओतप्रोत भरून अखंड राहिला आहे.

## २ दासांची अभंगवाणी व गुणविशेष :

वर निर्दिष्ट केलेल्या श्लोकावरून संत श्रीपुरंदरदास यांची महान योग्यता सहज कळून येण्यासारखी आहे. त्यांचे समकालिन महाराष्ट्रांतील संतश्रेष्ठ श्रीएकनाथ महाराज यांनीं अज्ञ जनांना जसा भागवत धर्माचा कळकळीनें उपदेश केला आहे, तद्वतच हे महान भगवद्भक्त पुरंदरदास हृदयाचा ठाव घेणाऱ्या अशा आपल्या रसाळ, सुंदर आणि काव्यमय वाणीनें भागवत पुराणांतरींचीं मुख्य तत्त्वें वर्णन करतांना आढळतात. श्रीसमर्थ रामदासांप्रमाणें मानवाच्या खट्याळ मनाला गोड

भाषेंत आत्मोध्दाराचा, ईश चिंतनाचा उपदेश करतांना अत्यंत तन्मय झालेले दिसतील. श्रीज्ञानेश्वराप्रमाणें गहन वेदांत प्रमेय, अगर ज्ञान, वैराग्य अथवा योगमार्ग यावर सुंदर काव्यमय विवेचन करतांना आढळतील. त्यांच्या काव्यांतल्या उपमा, दृष्टान्त, आणि मार्मिक शब्दयोजना वाचकाच्या खोल मनाचा ठाव घेऊन त्याला आनंदानें डोलावयास लावतात. काव्यामृत रसास्वादानें मन तन्मय होतें. पुढें तें आत्मपरीक्षणाला तयार होतें, आणि शाश्वत सुखाच्या राजरस्त्याला लागतें.

कबीर, सूरदास, तुकाराम आदि भगवद्भक्तांप्रमाणें ईशनाम संकीर्तनांत रंगून गेलेले व भाव हरपलेले असे ते दिसतील. त्यांची अभंगवाणी वाचीत असताना असें वाटतें कीं, हे दासमहाराज आपल्या बरोबर सर्वतऱ्हेच्या हिताच्या गुजगोष्टी करीत आहेत. जणूं काय आपल्या कुटुंबांतीलच एक अद्वितीय, श्रीहरीच्या प्रीतीला पात्र झालेला साक्षात्कारी पुरुष संसारांतील नानाविध गोष्टींचा अगर प्रश्नांचा योग्य उलगडा करून तुफान अशा मानवी जीवन सागरांत धडपडणाऱ्या, भ्यालेल्या आणि तरून जाण्याची इच्छा धरणाऱ्या जीवांना पर-तीरास हात धरून नेत आहेत असें वाटतें. दुर्जन व ईश्वरविरोधी लोक पाहिलें कीं, तुकारामाप्रमाणेंच यांनाही तीव्र संताप व उद्वेग येतो. ईश्वरसेवेशिवाय यांना अन्य कांहीं कर्तव्य नाहीं. अज्ञ जीवांना ज्ञानोपदेश करणें ही उत्तम प्रकारची भगवत्सेवा होय, असें त्यांचें प्रामाणिक मत होतें.

तुकारामाप्रमाणेंच ते परम निष्ठेचे विठ्ठल भक्त होते; ते सदैव भजनांत रंगत असत. गुरूंच्या आज्ञेवरून त्यांनीं सर्व काव्य विठ्ठलास समर्पण केलें असून ' पुरंदर विठ्ठल ' अशी मुद्रिका प्रत्येक पद्याच्या शेवटीं घातली आहे.हीच सर्व समर्पण सेवा अगर पराकोटीची आत्मनिवेदन भक्ति होय. दास हे महान् योग्यतेच सत्पुरुष होते. विशिष्ट नामरहित दास शब्दाचा उल्लेख केला असतां ' पुरंदरदास, असाच अर्थ घेतला जातो. ' जर कोणी दास असेल तर तो पुरंदरदास होय, ' असें त्यांचे मंत्रगुरू श्रीचंद्रिकाचार्य, श्रीव्यासराय स्वामी यांनीं स्वतः आपल्या पद्यामध्यें आपल्या परम प्रिय शिष्याबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. दास म्हणजे हरिदास होय. दास परंपरेमध्यें पुरंदरदास प्रमुख गणिले जातात. यांच्यापासूनच शिष्यशाखा सर्वत्र पसरली; आणि अद्यापिही दासपरंपरा चालू आहे. श्रीपुरंदरदास श्रीमध्वसांप्रदायी असल्यानें भक्तिप्रधान अशा श्रीमध्वपंथाची तत्त्वें त्यांनीं विशद करून सांगितलीं आहेत. श्रीमदाचार्यांचा गुणगौरव करणारीं अनेक पद्यें त्यांनीं रचिलीं आहेत.

## ३ दासकूट आणि व्यासकूट :

महाराष्ट्रांत आणि सर्वत्रही संस्कृत भाषेशिवाय इतर प्राकृत भाषेंत वेदांततत्त्वें विशद करून सांगणें अगर अध्यात्ममार्गास मूलाधार असणारे ज्ञान, भक्ति, वैराग्य याविषयीं प्राकृतांत उपदेश करणें, एकेकाळीं अत्यंत निंद्य गणलें गेलें

होतें. असें करणें म्हणजे अब्रह्मण्यं, महा पाप अशी समजूत होती. आणि तत्कालिन विद्वान् शास्त्री मंडळी अशा तऱ्हेनें उपदेश करणाऱ्याला शास्त्रानें दण्ड्य अगर पापी ठरवीत असत. म्हणूनच श्रीज्ञानेश्वर, तुकाराम आदि संतांना खरें ज्ञान कशाला म्हणतात, हें प्राकृत भाषेंत जोरदार रीतीनें प्रतिपादन करावें लागलें. आणि त्यांनीं ही ज्ञानगंगा समाजाच्या खालच्या वर्गापर्यंत नेऊन सोडली. सर्व भाषिक लोक या ज्ञानगंगेंत स्नान करून भक्तिरसाच्या डोहांत सदैव डुंबत राहिले. नंतर हळूं हळूं शास्त्रीमंडळीचा विरोधी वर्गही या सुलभ भक्तिमार्गाकडे वळला. तद्वतच कर्णाटकामध्येंही घडलें. पुरंदरदासांनीं आपल्या अमोघ, दिव्य आणि रसाळ प्राकृत वाणीनें सर्व कर्णाटक भक्तजनांना ज्ञान आणि भक्तीचें दिव्यामृत पाजिलें. विरोधाच्या काहूरास न जुमानतां त्यांनीं सतत आपला उपदेशाचा डांगोरा पिटवणें चालूं ठेविलें. तुकारामाप्रमाणेंच ज्ञान, भक्ति वैराग्य यांची उत्तम रीतीनें त्यांनी सांगड घातली. तीनही गोष्टी एकमेकास पूरक आहेत एवढेंच नव्हे तर ज्ञानाशिवाय भक्ति नाहीं, भक्तीशिवाय वैराग्य नाहीं, आणि वैराग्याशिवाय भक्ति व ज्ञान यांना पूर्णता नाहीं. हरिदासांच्या या परंपरेस दासकूट असें म्हणतात. व केवळ ज्ञान, सांख्यज्ञान आदि ज्ञानमार्गाचें आचरण करणाऱ्या, आणि वेद, उपनिषदें, पुराणें यांतील मूळ तत्वें जाणणाऱ्या संस्कृतज्ञ लोकांच्या समूहास व्यासकूट असें म्हणत असत. हरिदासांचे महत्कार्य श्रीमध्वतत्त्वानुसार

भक्तिमार्गाचा प्रसार कानडी ( प्राकृत ) भाषेमध्यें करणें हें होय. श्रीमध्वाचार्यांच्या साक्षात् शिष्यांपैकीं श्रीनरहरि तीर्थापर्यंत ( तेराव्या शतकाच्या प्रारंभीं ) जरी हरिदासांचा उगम दाखवितां आला तरी, खरी दासपरंपरा श्रीपुरंदर दासांचे मंत्रगुरु श्रीव्यासराय स्वामी यांच्यापासूनच सुरू झाली. सर्वांचें आराध्य दैवत विठ्ठलच आहे, हें त्यांच्या त्यांच्या नाममुद्रिकेवरून दिसून येतें. सर्व संतांचा उपदेश कोणा एका विशिष्ट भाषीयांकरितां नसून अखिल मानव जाती-करितां असतो, हें त्यांचें काव्य वाचतांना सहज कळून येण्यासारखें आहे.

## ४ दासवेष आणि भजनरंग :

एका हातांत सुंदर नाद करणाऱ्या चिपळ्या! एका हातांत संगीत स्वररागिणी वीणा! मोकळ्या गळ्यांत पवित्र तुलसीच्या माळा! श्रीमध्वसांप्रदायानुसार देहावर प्रसन्नता दर्शविणारी गोपीचंदनाची द्वादशनामचिन्हें! व त्याखालीं शंखचक्रांकित मुद्रा! विशाल भालप्रदेशावर चंदनांचे ऊर्ध्व-पुण्ड्रचिन्ह व त्यामधें उभी अंगाऱ्याची रेघ, आणि त्याखालीं श्रीहरीस अर्पण केलेल्या अक्षत गंधाचा टिळा! ( योगी लोक जिथें त्रिवेणी संगम आहे असें ह्मणतात, कोणी आज्ञाधारक चक्रामधील अमृत कलशाचें स्थान ह्मणून वर्णन करितात, किंवा स्वतः दास ज्या स्थानास 'शिवत्रिपुटी' असा उल्लेख करतात ) डोक्यावर लहान पागोटें, पायांत रुणझुणणारे चाळ!

तोंडानें सारखा नामघोष! नामसंकीर्तन! स्वतः दासच ह्मणतात. 'हुच्च हिडियतु यनगे, हुच्च हिडियतु' मला वेड लागलें आहे, खरोखर मी वेडाच नाहीं काय?' या पद्याचा अनुवाद मी मराठी पद्यरूपांतच खालीं देत आहे, ह्मणजे थोडक्यांत सर्व सारांश कळेल. कानडींतील सरस काव्य मराठींतही भावपूर्ण रीतीनें कसें उतरलें आहें हेंहीं कळेल. आणि मराठी अनुवाद असल्यानें अर्थ विस्तार करण्याची जरूरी नाहीं. माझे परमपूज्य वडील वै. गोपाळ रामचंद्र संगोराम यांनीं दासांच्या कित्येक सुंदर पद्यांचा मराठींत सुरस अनुवाद केला आहे. अनुवाद करतांना मूळार्थ कोठेंही सोडला नाहीं, आणि स्वतःच्या पदरचें कांहीं घातलें नाहीं. सदर चरित्रामध्यें आवश्यक तेथें माझ्या परमपूज्य वडिलांनीं केलेला अनुवाद उद्धृत करीत आहे.

ः हुच्च हिडियतु, यनगे, हुच्च हिडियतु ः

चालः—मुनी महाराज, परिजन, (महानंदा)

लागलें वेड हरी, खरोखर लागलें वेड हरी ॥ ध्रु० ॥
वेड लागतां संतत बडबड, वदत, 'गोविंद हरी'! ॥ १ ॥
तडतड तोडुनि टाकितसें मी, मायापाश दुरीं ॥ २ ॥
दोष दागिने देहावरचे, भिरकावी किति तरी ॥ ३ ॥
तुझिया पायां अडखळुनीयां, पडत पहा वरि वरी ॥४॥
बहुत जन्मिचे कष्ट-कुंभ ते, फोडित मी निजकरीं ॥५॥
सामोरीं जन निष्ठुर येतां पळुनि अन्य पथ धरी ॥ ६ ॥
दगड दुर्जनावरि फेंकावे गमत मनोमंदिरीं ॥ ७ ॥

मंदा बघतां मूकचि बनुनी मौनव्रता आचरीं ॥ ८ ॥
दिसतां हरि-निंदक घालावी धूळ तयाचे शिरीं ॥ ९ ॥
मुक्तचि होईन पुरंदर विठ्ठला होय कृपा तव तरी ॥१०॥

किती सुंदर, भावपूर्ण आणि अर्थपूर्ण उद्गार आहेत पहा ! दास म्हणजे मूर्तिमंत वैराग्याची प्रतिमा होती. भक्तिरसामध्यें अखंड अवगाहन करणारे ते, ध्रुव, प्रल्हादांप्रमाणें परमेश्वराचे एकांत भक्त होते. त्यांना भक्तश्रेष्ठ नारदाचे अवतार मानतात.

## ५ दासांचा जन्म-वृत्तांत :

दासांचा जन्मवृत्तांत संपूर्ण व साधार असा सर्व प्रकाशांत अद्याप आलेला नाहीं. जे थोडेफार ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांचे व त्यांनीं स्वतः आपल्या पद्यांतून प्रसंगोपात् स्वतःविषयीं केलेले उल्लेख आणि त्यांच्या शिष्यवर्गापैकीं विजयदास, जगन्नाथदास, इत्यादि दास श्रेष्ठांनीं त्यांच्याविषयीं लिहिलेल्या कांहीं पद्यांतून मिळालेली माहिती, यांचें परिशीलन करून त्यांचा हा त्रोटक वृत्तांत त्यांच्या शिकवणूकीसह थोडक्यांत वाचकांपुढें ठेवीत आहे.

दासांचा जन्म पंधराव्या शतकाच्या शेवटीं अदमासें इसवी सन १४८४ च्या सुमारास त्यावेळीं सोलापूर जिल्ह्यांत मोडणाऱ्या पुरंदर गडामध्यें झाला. ( आज पुरंदरगड पुणें जिल्ह्यांत आहे. ) त्यांचे वडील वरदप्प नाईक हे सत्वशील, धर्मनिष्ठ व भाविक असे देशस्थ ब्राह्मण होते. त्यांचा

व्यावहारिक धंदा सराफीचा होता. दासांच्या भाग्यशील मातेचें नांव लक्ष्मक्का ( लक्ष्मीअक्का ) असें होतें. पुत्रप्राप्तीसाठीं त्या थोर पतिपत्नींनीं एकनिष्ठपणें तिरुमल्लेश श्रीवेंकटपतींची-श्रीनिवासाची ( तिरुपति बालाजी ) सतत बारा वर्षें उपासना केली. उपासनेला संतुष्ट झालेल्या श्रीवेंकटेशानें त्यांना पुत्र-प्राप्तीचा आशिर्वाद् दिला, व पुढें कांही कालानें नारदांश ह्मणून प्रसिध्दि पावलेले सदर पुरंदरदास त्यांच्या उदरीं अवतीर्ण झाले.

## ६ संसारी श्रीनिवास.

माता-पित्यांनीं बालकाचें नांव श्रीनिवास, असें आपल्या उपास्य देवतेचें नांव, ठेविलें. श्रीनिवास नाईक याच नांवानें ते पुढें लोकांत मान्यता पावले त्यांना शिवाप्पा नाईक असेंही ह्मणत. सराफीचा धंदा करणाऱ्यांना नाईक असें पूर्वीं ह्मणत असत. लहानपणींच त्यांनीं वर्णाश्रमधर्मयुक्त सर्व विद्या व संगीत कला यांत प्रावीण्य मिळविलें. त्यांचें आचरणही गंगोदकाप्रमाणें शुध्द होतें. वडिलांच्या हयातींत त्यांचें लग्नही झालें. त्यांची भार्या सुशील, सद्‌गुणी, धार्मिक प्रवृत्तीची पतिव्रता स्त्री होती. तिचें नांव सरस्वतीबाई.

## ७ शिवाप्पा नाईक नवकोट नारायण झाले !

वडिलांच्या पश्चात् श्रीनिवास नाइकांनीं सराफीचा धंदा जोरांत चालू केला. ते विख्यात रत्नपारखी म्हणून ओळखले जाऊं लागले. विजयनगर, विजापूर गुलबुर्गा इत्यादि राजधान्यांच्या व मोठमोठ्या शहरीं त्यांची मान्यता

वाढली. व्यापार वाढला. त्यावेळीं श्रीव्यासरायस्वामींचा शिष्य ‘ कृष्णदेवराय ’ हा विजयनगर येथें राज्य करीत होता. श्रीनिवास नाइकांना तेथें दरबारांत फार मान होता. पुढें ते या व्यापारामध्यें इतके संपन्न झाले कीं लोक त्यांना ‘नवकोट-नारायण’ ह्मणून संबोधूं लागले! ( राज्यांतील प्रचलित नाण्यांपैकीं प्रत्येक नाणें ज्याच्या संग्रहीं, नऊ कोट असे, त्याला ‘ नवकोट नारायण ’ म्हणत! ) अलोट संपत्ति, संसारदक्ष सति, आणि पुत्रप्राप्ति! आणखी संसारांत दुसरें काय पाहिजे? याचा विपरित परिणाम असा झाला कीं ‘यौवनंधनसंपत्तिः’ या सुभाषितोक्तिप्रमाणें श्रीनिवास नाईक लक्ष्मीमदानें धुंद झाले! त्यांना धनसंपादनाशिवाय व संचयाशिवाय कांहीं सुचेनासें झालें. ते अत्यंत कृपण बनले, कठोरही बनले. प्रेमळ व सुशील स्त्रीला त्यांनीं अत्यंत धाकांत ठेविलें. भिक्षेकऱ्यास मूठभर धान्य दान करण्याचे स्वातंत्र्यहीं त्यांनीं तिला ठेविलें नव्हतें! परंतु त्या सत्वशील माउलीनें कधीं तक्रार केली नाहीं! पति जें देईल त्यांतच सर्व संतोषानें करावें व पतीस अर्पण करून मग आपण सेवन करावें, असा तिचा नित्यक्रम असे. पतीचा भयंकर असा हा संसारव्यामोह नष्ट करण्याबद्दल ती मनांत देवाची नित्य प्रार्थना करी.

## ८ संसारी नाईक बैरागी बनले!

कांहीं काळ लोटल्यानंतर उपरति होण्याचा काळ आला. श्रीनिवास हा सामान्य मानव नसून उपासनेच्या


बलानें, श्रीवेंकटेशाच्या वरप्रदानानें झालेला, वरदपुत्र होता. तरीही योग्य काल आल्याशिवाय अशा तऱ्हेची भवबंधनांतून मुक्त होण्यासारखी उत्क्रांति होत नाहीं. त्यालाही पूर्व-कर्म बलवत्तर लागतें. ‘ बहुता सुकृतांची जोडी, ह्मणुनि विठ्ठलीं आवडी,’ गुरुकृपा अगर ईश्वरकृपा लागते.‘ यमेवेष वृणुते तेन लभ्यः ’ असेंच उपनिषदें अगर शास्त्रें आणि पुराणें सांगतात. संसारांतील साध्या गोष्टी घडण्यालाही योग्यकालाची वाट पाहावी लागते. अध्यात्म मार्गांत तर योग्य काल ( Time factor. ) फार महत्वाचा मानिला आहे. आजकालच्या भौतिकवादी वाचकांनीं डॉ. वि. म. भट यांच्या नुकत्याच प्रसिध्द झालेल्या ‘योगसिध्दी व ईश्वरी साक्षात्कार’ या ग्रंथाचें परिशीलन करावें, ह्मणजे या अद्‌भुत घटनांचा उलगडा होईल.

धनमदानें धुंद होऊन वरीलप्रमाणें संसारी ‘ नाईक ’ कालक्रमणा करीत असतां, एक अद्‌भुत घटना घडली. श्रीपांडुरगानें ( श्रीवेंकटेश आदि श्रीहरींचीं रूपें व हें यांत भेद नाहीं-सर्वरूपेष्वभेदमान् ) एकदां एका बृध्द ब्राह्मणाचा वेष धारण केला; आणि नाइकांच्या अंतःकरणांत ज्ञानोदय करण्याच्या इच्छेनें सराफकट्ट्यांतील प्रसिध्द सराफ श्रीनिवास नाईकांकडे याचक ह्मणून तो आला! परतु कवडीचुंबक नाईकांनीं त्या वेषधारी पंढरिनाथाला एक कपर्दिकही दिली नाहीं! उलट कठोर शब्दानें त्याचा धिःकार केला. याचकानें दांतांच्या कण्या केल्या, अनेक परींनीं मनधरणी केली, पण


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

व्यर्थ ! काय हा व्यामोह पहा ! तेथून हांकून लाविल्यावर हे याचक, वृध्द ब्राह्मण, त्यांच्या पत्नीकडे गेले. अहो ! बलीला पाताळांत दडपणारा हा भयंकर याचक स्वस्थ कसा बसेल ? त्या माऊलीच्या अंतःकरणाला त्यानें पाझर फोडला. दान न देणाऱ्या पतीची मनसोक्त निंदाही तिच्यापुढें केली. 'स्त्रियाच दानधर्मशील असतात', असें सांगून, मुक्त कंठानें तिची स्तुति करून, एकुलत्या एक मुलाच्या लग्नाचें निमित्त सांगून तिच्याकडून त्यानें नथेचें दान मिळविलें ! घरांतील कोणत्याही वस्तूंवर काडीमात्र सत्ता नसतांना (!) तिनें ब्राम्हणाच्या इच्छेनुसार अत्यंत नम्रभावानें आपल्या नाकांतील मौल्यवान नथ दान देऊन टाकली !

परंतु तो ब्राह्मण दुसरीकडे कोठें न जातां, ताबडतोब नाईकांच्या दुकानांत आला, व नाईकांस म्हणाला, 'नाईक, ही घरची नथ विकायची आहे. पहा, मुलाचें लग्न तर अडलें आहे. तुम्ही कांहीं दान दिलें नाहीं. याची तरी योग्य किंमत द्या.' नथ पाहतांच नाईकांना आश्चर्याचा धक्का बसला, संशय आला ! पण करणार काय ? मनांत चलबिचल सुरू झाली. न जाणों कदाचित् आपल्या नथेप्रमाणेंच हुबेहूब दुसरी नथ असेल. मनाचा निश्चय करून तीची किंमत देऊन त्या ब्राम्हणास त्यांनी वाटेस लाविलें. दुकानांतल्या तिजोरींत ती नथ सीलबंद बंदोबस्तांत ठेवून, दुकान बंद करून, धांपा टाकीतच घरीं आले ! 'नथ कुठें आहे ? मला आतांच्या



आपल्या नाकांतील मौल्यवान नथ दान देऊन टाकिली.



शीनाप्पा नाईक नथेची परीक्षा करीत आहेत.

[ पा. १२ ]



दासांची पत्नि विषप्राशनाला सिद्ध झाली आहे.

आतां पाहिजे, ताबडतोब दे, ' अशी त्यांनीं गर्जनाच केली. माउली विचारी घाबरून गेली. यावेळीं ती साध्वी श्रीतुलसी-वृंदावनाची पूजा करीत होती. तिनें श्रीपांडुरंगाचा धांवा चालू केला. मार खाऊन अपमान करून घेण्यापेक्षां ईश्वरी इच्छाच समजून ती विषप्राशनास सिद्ध झाली ! इकडे नाइकांचा जीव खालींवर होत होता. तिनें आंतल्या खोलींत जाऊन वाटींत विष तयार केलें, आणि वाटी ओठांस लाविली ! आतां विष प्राशन करणार, इतक्यांत त्या वाटींत वरून कांहीं तरी टप्कन् पडल्याचा आवाज झाला ! पहाते तों नथ ! ती दिङ्मूड झाली ! ईश्वरी प्रसादानें तिला धन्य वाटलें. तात्काळ तिनें ती नथ स्वच्छ पुसून पतीच्या हातांत दिली. त्याला दुसरा आश्चर्याचा धक्का बसला ! बायकोवरचा राग गेला. पण चित्ताची व्याकुलता कमी होईना ! धांवतच त्यांनीं परत दुकान गांठलें. आणि तिजोरी उघडली. सर्व कांहीं व्यवस्थित होतें. क्षणभर आनंद वाटला ! ओंठांवर हास्य चमकलें. पण सील फोडून आंतल्या पोतडींत पहातात तों कांहीं नाहीं. पोतडी रिकामी ! झालें, नाईकांचें कठोर मन विरघळलें ! अगदीं घायकुतीला आलें ! त्यांना चालवेना ! पावलें जड पडूं लागलीं ! छाती धडधडूं लागली ! केल्या गोष्टींचा मनस्ताप जाणवूं लागला. कसेंबसें ते घरीं आले. नथेचा सर्व वृत्तांत जेव्हां त्यांच्या पत्नीकडून त्यांना कळला, तेव्हां एका लहान अजाण अर्भका-प्रमाणें ते ढसांढसां रडूं लागले. मन पश्चात्तापानें दग्ध झालें.

ईश्वरदर्शनासाठीं मन अत्यंत व्याकुल झालें. दर्शनासाठीं ते उपोषण करून ठाण मांडून बसले ! पत्नीस मात्र वृद्ध ब्राह्मण-वेषानें श्रीपांडुरंगानें पुनश्च दर्शन दिलें, व तिच्या पतीस, ‘ प्रत्यक्ष दर्शन होण्यास अद्याप अवकाश आहे, ’ असें सांगितलें. पत्नीस आलेल्या आदेशानुसार नाईकांनीं तीन दिवस उपोषण केलें आणि ईश्वर भजनांत दास दंग झाले ! नंतर लागलीच त्यांनीं घरावर तुळसीपत्र ठेवून सर्वस्व दान करून हातांत झोळी घेतली, आणि बायकोमुलांसह देवालयाचा रस्ता धरला ! काय हा त्याग ! ‘ त्यागेनैकेन अमृतत्वमानशुः’ ! नवकोटनारायण बैरागी बनले ! एका पद्यांत त्यांनीं या वैराग्यभाग्याचें फार बहारीचें वर्णन केलें आहे. पुढें स्वप्न-दृष्टान्ताप्रमाणें ते हंपी क्षेत्रास गेले, आणि तेथें त्यांनीं श्रीव्यासराय स्वामींकडून मंत्रोपदेश घेतला. (अजमासें १५२५)

वरील वृत्तांताचें रसभरित वर्णन त्यांनीं खालील पद्यांत केलें आहे. पद्य पत्नीच्या तोंडीं घातलें आहे.

यत्त होद नम्म विप्रनु यल्ले हुडुकल्यम्मा ।
मुप्पिन ब्राह्मण मूगुति वैदनु, इके ईग बाहुवेनेंदु ॥

वर सर्व अनुवाद आलाच आहे. शेंवटचें कडवें असें आहे.

सतिपतियर कूडी, तावति हरुषदिंद नोडी ।
मितियिल्लद, मनेयु भाग्यवनेल्ला सूरि माडी ॥
पतितपावन श्रीपुरंदर विठलनु ।
स्तुतिसलु श्रीहरि कैवशनादनु ॥

अत्यंत हर्ष झाल्यामुळें सतिपतींनीं मिळून आपल्या अपरिमित अशा सर्व संपत्तीचें व घराचें दान केलें. आणि पतितपावन अशा पुरंदर विठ्ठलाची अहर्निश स्तुति करतांना श्रीहरि त्यांना वश झाला !

## ९ ग्रंथ–संभार व संचार.

पुरंदरदासांनीं ४७५००० पद्यरचना केल्याचा उल्लेख आहे. त्याशिवाय त्यांनीं इतर स्वतंत्र काव्यग्रंथही लिहिले आहेत. द्रौपदीवस्त्रहरण, सुदामचरित्र, आणि परतत्त्वसार इत्यादि हे ग्रंथ अद्यापीही प्रसिद्ध झालेले नाहींत. शिवाय सर्व पद्येंही उपलब्ध नाहींत. साधारण हजार बाराशेहे पद्यें प्रसिद्ध झालीं आहेत. उडुपी येथें श्री. पावंजी गुरुराव यांनीं पांच भागांमध्यें ‘ पुरंदरदासर कीर्तने ’ ह्मणून दासांची पद्यें छापलीं आहेत. अर्थात हें काम संशोधनाचें असून, अत्यंत अवघड आहे. पण तितकेंच तें करणेंही आवश्यक आहे. दासांनीं ‘सूळादि’ ह्मणूनही पुष्कळ तत्त्वविचारात्मक काव्यें लिहिलीं आहेत. लोकांच्या नित्य पाठांतहीं तीं आहेत. दासपरंपरेंतील लोक अद्यापीही अप्रसिद्ध अशीं पद्यें गात असतात. कानडी जाणणारा रसिक व मर्मज्ञ श्रोता तीं ऐकतांना मंत्रमुग्ध होऊन जातो. दास संगीततज्ञ होते. त्यांनीं कीर्तनाला विशिष्ट वळण लाविलें. साक्षात् श्रीहरि संगीतसेवेनें अत्यंत संतुष्ट होतात हें त्यांनीं दाखवून व पटवून दिलें. कर्णाटकामध्यें देवपूजेमध्यें संगीतसेवेचें विशेष महत्व मानिलें आहे. संगीतानें भक्ति

भावना विशेषत्वानें जागृत होते, यांत संदेह नाहीं. प्रसिद्ध आंध्र कवि भक्तश्रेष्ठ त्यागराज हा पुरंदर दासांचा फार चाहता होता, आणि त्याला काव्य करण्याची स्फूर्ति दासां-पासून मिळाली अशी प्रसिद्ध आख्यायिका आहे.

सर्व भारतभर पुरंदरदासांनीं संचार केला. आणि सर्व पवित्रक्षेत्रांची यात्रा केली. पंढरपूरास ते बरेच दिवस होते. वृध्दापकाळीं विजयनगराधीशांच्या आश्रयाखालीं असलेल्या हंपी क्षेत्रास येऊन तेथेंच ते अखेरपर्यंत राहिले. इसवी सन १५६४ रक्ताक्षी नाम संवत्सरीं, शनिवार, पौष्य वद्य अमावास्येस प्रातःकालीं हंपी क्षेत्राच्या परिसरांतील आनेगुंदी येथें दासांनीं आपला पार्थिव देह ठेविला व वैकुंठलोकीं प्रयाण केलें.

## १० पंढरपूर क्षेत्रांतील अद्भुत घटना.

पुरंदरदासांच्या चरित्रांतही अनेक चमत्कार घडले आहेत. ईश्वरी साक्षात्कार झालेल्या अगर श्रीहरीच्या प्रीतीस पात्र झालेल्या संतांच्या आयुष्यांत सामान्य मानव बुध्दीला अगम्य वाटणाऱ्या अनंत अद्भुत घटना सहजगत्या घडतात, यांत संदेह नाहीं. त्यांची अध्यात्मशक्तीही अर्थात् ईश्वरी प्रसादानें वाढलेली आहे. असल्या आत्मशक्तीचा उपयोग ते भक्तजनांवर कृपा करण्याकरितां वेळोवेळीं करितातही.

पंढरपूर क्षेत्रांत दास वास करीत असतांना ईश्वरी साक्षात्काराची सर्वांस प्रत्यक्ष ओळख करून देणारी, व भक्त व ईश्वर यांच्यांतील प्रेमरहस्य उघड करून दाखवणारी अद्भुत घटना



दास पाणी देणाऱ्या पुत्ररूप विठ्ठलास ताडन करीत आहेत.

( पा. १७ )

घडली. त्याचा उल्लेख स्वतः दासांनींही पद्यामध्यें केला आहे. वृध्दत्वामुळें दासांची दृष्टि मंद झाली होती. एके रात्रीं तहान लागल्यानें आपल्या कनिष्ठ मुलास हाक मारून पाणी आणण्यास त्यांनीं सांगितलें पण, सर्वजण निद्रापाशांत बद्ध असल्यामुळें, श्रीपंढरिरायानें सुवर्ण पात्रांतून पाणी आणून दिलें. उशीर झाल्यानें राग अनावर होऊन दास ह्मणतात, 'हे पंढरिराया, मी तुला दण्डानें ताडन केलें.' पुढें श्रीविठ्ठलानें दासवेषानें एका वेश्येच्या घरीं जाऊन आपल्या एका हातांतील कंकण तिला देऊन, 'मी रात्रीं येईन,' असें सांगितलें. दुसरे दिवशीं पूजेच्या वेळीं पूजाऱ्याच्या लक्षांत आलें, कीं मूर्तीच्या हांतांत कंकण नाहीं! तपास चालू झाला! दास हे साधु ह्मणून त्यांचा फार आदर असे. मंदिरांत दर्शनाच्या निमित्तानें आलेल्या वेश्येला शिपायानें दटावून प्रश्न विचारतांच, सदर कंकण आपणांस दासांनीं दिल्याचें तिनें सांगितलें. झालें! दासांना पकडण्यांत आलें. आणि देवालयांतील मंटपांतच एका खांबाला बांधून मार देण्यास सुरुवात झाली. त्यावेळीं ज्ञानदृष्टीनें पाहून श्रीविठ्ठलाचा, 'लोणी चोरून खाणाऱ्या कपटी कृष्णाचा' कपट वृत्तांत लक्षांत येतांच, गांहिवरून त्यांनीं खालील गीत गायिलें.

मुय्यके मुय्या तीरितु, जगदय्या!
विजय्या! सहाय्या! पंढरिराया!॥

'देवा, फिटानफिट झाली ना! मी तुला न जाणतां अज्ञानानें दण्डानें ताडन केलें, त्यासाठीं माझी एवढी जगामध्यें

विटंबना केलीस ! आणि त्यायोगें तूं लौकिक मिळवलास ! तूं भक्तवत्सल ना ? मग भक्तांच्या आधीन तुला राहणें भाग नाहीं कां ? तूं युक्ति साधलीस पण मुक्तीशा ! पुंरदर विट्ठला ! पंढरिराया ! मी संसारांतून कायमचा 'मुक्त' झालों, हें काय थोडें झालें ? ' असें एक-भावानें गायन करून ईश्वरास शरण जातांच अद्भुत चमत्कार झाला. ज्या खांबास त्यांना बांधलें होते, तेथें अकस्मात् श्रीविट्ठलाच्या मूर्तीच्या दुसऱ्या हातांतील कंकण येऊन पडलें ! सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटलें ! दासांना सर्वही नंतर शरण गेले, यांत काय आश्चर्य ? ( हा खांब अद्यापीही दाखविण्यांत येतो. सध्यां त्या खांबास पितळेचें कवच केलें असून त्यास ' गरुडखांब ' ह्मणतात. ) पुरंदरदासांचा नाममात्र संपर्क आल्यानें त्या वेश्येचाही उद्धार झाला, हें काय सांगावयास पाहिजे ?

संत नामदेवानें ज्याप्रमाणें लहानपणीं विट्ठलाच्या पाषाणमूर्तीला भोजन करविल्याची आख्यायिका सुप्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणें दासांच्या ' मध्वपति ' नांवाच्या सर्वांत लहान मुलानें दास गांवांत नसतां मातेच्या आज्ञेवरून श्रीमारुतीची पूजा करून मूर्तीस नैवेद्य भक्षण करविल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. बालकाचा भोळा भाव पाहून मारुतिरायानें, बाळानें घास घालावा, व आपण तोंड उघडून तो भक्षण करावा, अशा रीतीनें सर्वच्या सर्व नैवेद्य भक्षण केला. मातेनें विचारलें ' बाळ, नैवेद्याचें ताट रिकामें कां ?' ' आई, आरंभीं मारुति



श्रीविठ्ठलाच्या मूर्तीच्या दुसऱ्या हातांतील कंकण दासांच्या पायांशीं येऊन पडले

( पा. १८ )

कांहीं नैवेद्य घेईना, पण मी हट्ट धरतांच त्यानें सर्व नैवेद्य भक्षण केला. त्याला तुझा स्वयंपाक फारच आवडला वाटतें. त्यानें एक शीतही प्रसाद म्हणून शिल्लक ठेविला नाहीं ' असें बालकाचें भाषण ऐकून तिला परम आश्चर्य वाटलें. दुसरें दिवशीं बाळानें मातापित्यासमक्ष मारुतीस नैवेद्य समर्पण करण्याचा निश्चय केला. उगीच खोटेपणा नको. परंतु वस्ताद मारुतिराय नैवेद्य घेईनात. जेव्हां बालकानें प्राण समर्पण करण्याचा दृढनिश्चय केला, तेव्हां त्याच्या भक्तिभावाला संतुष्ट होऊन सर्वांसमक्ष त्यानें नैवेद्य भक्षण केला, अशी कथा आहे. भक्तासाठीं श्रीहरी कोणतें मायाकौतुक करणार नाहीं ? त्याचे कोणते लाड पुरविणार नाहीं ?

## ११ अनुतप्त दास :

नथेच्या अद्भुत घटनेमुळें दासांना अत्यंत पश्चात्ताप झाला. मागील आपलीं कृत्यें आठवून त्यांना अत्यंत खेद झाला. व मनुष्य आपल्या प्रारब्धाचीं फळें भोगितो, त्यांत ईश्वराकडे काडीचाही दोष नाहीं. म्हणून त्यालाच शरण जाऊन उद्धारार्थ त्याची करुणा भाकणें हेंच एकमेव कर्तव्य आहे, अशीं अनेक ठिकाणीं, अनेक प्रसंगीं केलेल्या पद्यांतून स्वानुभवावरून त्यांनीं ग्वाही दिली आहे. ' तमेव शरणं गच्छ सर्व भावेन भारत ! ' ही गीतेची उक्ति प्रसिद्ध आहे. अशा त्यांच्या कांही पद्यांचा सारांश खालीं देत आहे.

( राग- तोडी, ताल त्रिविडी )

'ना माडिद कर्म बलवंतनादरे नी माडुवदेनो देवा? । दीन रक्षकं निन्न नामवा नेनियदे कालव कळदेनो काया देवरदेवा! । इन्नादरु निन्न दासर संगवित्तु, मन्निसी सलहैय्य मन्मथजनका! अन्यरोब्बर काणें,आधारावेनागिल्ला, पन्नगशयना! श्रीपुरंदर विठ्ठला! ॥

मी केलेलें पूर्वकर्म जर बलवत्तर असेल तर तूं तरी त्याला काय करणार? ही गोष्ट अगदीं सत्य आहे, कीं, हे दीनरक्षका, या संसाराच्या मोहपाशांत अडकून पडल्यानें एक क्षणही तुझी आठवण न करतां श्वानाप्रमाणें मी आयुष्याचा काल व्यर्थ घालविला! अतिथींना अन्न न देतां विन्मुख पाठविलें, परयुवतींच्या संगाचा ध्यास घेऊन त्यांतच रंगून राहिलों. हे गरुडगमन देवा, माझ्यासारख्या मतिहीनाची आणि मोहपाशांत फसणाऱ्याची गति काय होणार, हें मला कळत नाहीं. हे दानवांतका जपतप, स्नान, दानधर्म कांही न करतां बहुमोल आयुष्य व्यर्थ घालविलें. आतां तरी तुझ्या दासांच्या संगतीचा मला लाभ दे, आणि हे मन्मथजनका! माझें रक्षण कर. हे पन्नगशयना! श्रीपुरंदर विठ्ठला, तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही आधार आतां मला नाहीं, तरी या संसार सागरांतून माझा उद्धार कर.

## १२ दास करून घेण्याबद्दल प्रार्थना :

सर्वस्वाचा त्याग करून अनुतप्त मनानें, कृतकर्माकडे पाहून, ईश्वराकडे कांहीं दोष नाहीं, आपण अत्यंत मूर्खपणा केला, आतां मात्र त्यालाच सर्वभावेंकरून शरण जावें तरच या घोर संसारांतून मुक्त होण्यास संधि मिळेल, असें मानून, आपणांस दास करून घेण्याबद्दल अत्यंत नम्रपणानें दासांनीं प्रार्थना केली आहे.

( राग, नादनामाक्रिय–अटताळ )

दासन माडिको यन्न, स्वामी, सासिर नामद वेंकटरमणा ! ।
दुर्बुद्धिगळनेल्ल बिडिसो, निन्न करुण कवचवन्नु
हरणके तोडिसो ।। चरणसेविगे यनगे बडिसो,
अभयकर पुष्पवनेन्नु, शिरदल्लि मुडिसो ।। १ ।।

शरणागतभाव: 'हे, सहस्रनामधारी वेंकट रमणा ! मला तुझा दास करून घे. दासपदवी मला मिळण्यास जें जें आवश्यक तें तें तूं कर. मी तुला अनन्य भावानें शरण आलों आहे. नित्य होणाऱ्यादुर्बुद्धींतून मला सोडव. तुझें करुणा-कवच माझ्यावर घाल. तुझें अभयकरपुष्प माझ्या मस्तकावर ठेवून, माझ्याकडून तुझी नित्य चरणसेवा घडेल असें कर. माझ्या मनांत तुझ्याविषयीं दृढभक्ति निर्माण कर. सर्व दुरितांचा नाश करून, हे पुरंदर विठ्ठला ! तूं न विसरतां माझें रक्षण कर.'

दासभाव : अनेक ठिकाणीं स्वतःला दास म्हणून मानण्याबद्दल पुरंदरदासांनीं श्रीहरीला अत्यंत कळकळीनें विनविलें आहे. 'दय माडो, दय माडो, रंग, दय माडो, निन्न दासनानेंदु' हे रंगा, मला तुझा दास म्हणून मान. माझ्यावर दया कर. हे करिराजवरदा ! पुरंदर विठ्ठला ! इहपरगति तूंच आहेस. माझ्यावर करुणा कर.'

ही सर्वश्रेष्ठ दासभावना दासांच्या रोमरोमीं भिनलेली आहे, हें त्यांच्या चरित्रावरून व त्यांच्या अभंगांवरून सहज दिसून येणार आहे. परमेश्वरास आळवितांना एके ठिकाणीं ते म्हणतात, 'ज्या अर्थी तूं जन्म दिला आहेस, त्या अर्थी माझें पोषण करणें, हें तुझें कर्तव्य आहे. पुढें जन्माला घाल अथवा घालूं नको. हे रघुनंदना ! माझे हें भवबंधन तोड. जनांमध्यें निंदित झालेल्या या दासाचें रक्षण करणारा तुझ्याशिवाय कोण आहे बरें ? तूं पावन केलेल्या, कृपासिंचन केलेल्या भक्तांची लांबलचक यादी मी कशाला सांगूं ? मला भक्त हे विशेषण नकोच. तुझे जे थोर थोर भक्त आहेत; त्यांच्या दासांचा मी दास आहे. माझें हृदय मी उघडें करून तुला दाखविलें आहें. हे आर्तबंधो ! पुरदर विठ्ठला ! या पतिताचा उद्धार कर. तुझ्या हृदयामध्यें मलाही जागा दे. ( इन्नुपुट्टिसादिरय्या पुट्टिसदके पालिसय्या ! ) सर्व संतांनीं श्रीहरीचा दास म्हणवून घेण्यांत पराकाष्ठेचा आनंद मानला आहे. तुकाराममहाराजसुद्धां म्हणतात, 'सर्व भावें नाम गाईन आवडी, सर्व माझी जोडी पाय तुझे......अंकित अंकिला दास तुझा देवा, संकल्पजीवा तुका म्हणे.'

कर्णाटकांतील हरिदासाप्रमाणेंच कबीरदास, सूरदास, तुळसीदास, रामदास, इत्यादि महनीय संत दास म्हणूनच प्रसिद्ध आहेत. आपणांला या परमार्थमार्गाप्रत आणून सोडण्याला आणि सर्वोत्तम श्रीहरीचा दास होण्याची सुसंधि मिळण्याला कारण झालेल्या आपल्या सुशील भार्येची त्यांनीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे.

( राग-पंतुवराळि, आदिताल )

आदद्देला वळिते आयितु ॥ नम्म ॥
श्रीधरन्न सेवेगे साधन संपत्तायितु ॥...
सरसिजाक्ष पुरंदर विठलन
दासगे, माले हाकिसदळु ॥

भार्येस धन्यवाद : ‘झाली गोष्ट फारच चांगली झाली. आमच्या श्रीधराची सेवा करण्यास मला साधन सामग्री मिळाली. मी देवाची पालखी धरण्यास पूर्वी लाजत असे. पण तिनें पालखी घेण्यास लाविलें. भिक्षापात्र ( गोपाल बुट्टि ) हातांत धरण्याला भूपतीला अपमान वाटावा तसा मला अपमान वाटे; पण हिनें तेंही करण्यास भाग पाडलें. नवरत्नाचा हार घालून कंठाला शोभविणारा मी, तुलसी माला कशी घालणार ? मला अगदीं शरमल्यासारखें वाटे. पण माझ्या गुणवती भार्येनें या पुरंदरविठलाच्या दासाला तुलसीमाला घालण्यास भाग पडून कृतार्थ केलें. ती धन्य होय.! तिचें कोट कल्याण होवो ’ !

## १३ ईश्वरी साक्षात्काराचा परमानंद :

अध्यात्ममार्गावर प्रवास करणाऱ्या साधकाला अल्पसा जरी अनुभव आला, तरी त्याचें अंतःकरण आनंदातिशयानें कसें प्रसन्न होतें, त्याला एक प्रकारचा कसा हर्षोन्माद होतो, हें या मार्गांत असणाऱ्यांनाच समजूं शकेल, इतरांना त्याची नीट कल्पना येणार नाहीं. सामान्य व्यवहारांतसुद्धां बऱ्याच कष्टानें भेटणाऱ्या आपल्या अत्यंत प्रिय जनांचें दर्शन किती सुखदायक असतें ! हा सामान्य अनुभव. मग भवभयांतून पार करणाऱ्या, अनंत दुःखांचें निर्मूलन करणाऱ्या, भक्तांचें परोपरीनें कोड पुरवणाऱ्या, मुक्तिदायक, दयाघन, अशा श्री. हरीचें साक्षात् दर्शन झाल्यावर होणाऱ्या ब्रह्मानंदाचें वर्णन कोण करूं शकेल ? तो भक्तच त्या परमानंदाची गोडी जाणूं शकेल ! दासांनीं अनेक ठिकाणीं ईश्वर दर्शन झाल्याचा उल्लेख केला आहे. अशा एकदोन पद्यांचा मी खालीं निर्देश करीत आहे.

[ राग-शंकराभण-आदिताल ]

देव बंद नम्म स्वामि बंदनो, देवरदेव-
शिखामणि बंदनो ॥ ....
उरगशयन बंद गरुडगमन बंद ॥ नरगोलिद्व
बंद, नारायण बंदनो ॥ १ ॥
निगमगोचर बंद नित्यतृप्तनु बंद ॥
नगेमुख पुरंदरविठल बंदनो ॥

'हा पहा देव आला! आमचा स्वामी आला! देवाधिदेव शिखामणि आला! शेषावर शयन करणारा, गरुडावर बसून गमन करणारा, अर्जुनाला वश झालेला, हा पहा नारायण आला! नंदालाही गोचर न होणारा, नित्य-तृप्त असणारा, आणि हंसतमुख असा, हा पुरंदर विठ्ठल दर्शन देण्यास आला आहे!'

पुरंदर विठ्ठलाच्या पवित्र दर्शनानें आपण अगदीं धन्य झालों, कृतकृत्य झालों, हें स्पष्टपणें दासांनीं खालील पद्यांतून कथन केलें आहे.

[ राग–तोडि-रूपक ताल ]

निन्न नोडि धन्यनादेनो हे, श्रीनिवास!
निन्न नोडि धन्य नादेनो ॥..........

'हे श्रीनिवासा! तुला पाहून मी अत्यंत धन्य झालों. आजपर्यंत पोटीं आशा धरून मी निष्कारण फिरलों. आतां अनुतापानें दग्ध झाल्यानें मी तुलाच शरण आलों आहे. आतां हे पुरंदर विठ्ठला! या दासाला कायमचा तुझा कर. ह्याला अंतर देऊं नको!'

प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर दासांनीं खालील उगाभोग (एक पद्यप्रकार) गायिल्याचा उल्लेख आहे.

इंदिन दिनवे शुभदिनवु । इंदिन वार शुभवार ॥
इंदिन तारे शुभ तारे । इंदिन योग शुभ योग ॥
इंदिन करण शुभ करण । इंदु पुरंदरविठ्ठलरायन ॥
संदरुशन फलवेनगायितु । संदरुशन फलवेनगायितु ॥

'आजचा दिवस, वार, तारा, योग, करण सर्वही शुभ आहेत. कारण आज मला श्रीपुरंदर विठ्ठलाचें दर्शन झालें!'

## १४ आर्त भक्ताची ईश्वरास हांक :

ईश्वर दर्शनास अत्यंत आतुर झालेल्या भक्ताचे उद्गार काय असतात, त्याची मनःस्थिति कशी असते, व तो अनन्य भावानें देवास कसा शरण जातो, हें दासांनीं अनेक पद्यांत स्वानुभवानें कथन केलें आहे; आणि खऱ्या आर्त भक्ताची अशीच अवस्था होते हें त्या मार्गांत असणाऱ्यांना चांगलें माहीत असतें. ही एक साधकाची अवस्था आहे. मन सर्वतो परि सिद्ध व शुद्ध व्हायला पाहिजे. अनुतापानें तें होरपळून निघालें पाहिजे. निर्मल झालें पाहिजे. लोण्यासारिखें मऊ झालें पाहिजे. ईश्वर दर्शनाचाच सारखा ध्यास लागला पाहिजे. श्रीहरीच्या कृपेसाठीं जीव कासावीस झाला पाहिजे. त्याच्या दर्शनाचीच तहान लागली पाहिजे. 'न मिळो खावया न वाढो संतान, परि हा नारायण कृपा करो॥' ही साधकाच्या मनाची श्रेष्ठतर अवस्था होय. येथें मन स्थिर झालेलें असतें. सर्व मनोव्यापार थंड पडून मन शांत झालेलें असतें, आणि ईश्वरचरणांचें सारखें चिंतन करीत असतें. 'विषय तो त्याचा झाला नारायण,' अशी त्याची अवस्था झालेली असते. षड्रिपूंचें उच्चाटन झालेलें असतें. कडकडीत वैराग्य अंगीं बाणलेलें असतें. संसाराचा व्यामोह नष्ट झालेला असतो, एवढेंच नव्हे तर या भयानक संसारसागरांत सुखाच्या आशेनें विहार करीत

असतांना अनंत दुःखेंच भोगावीं लागल्यामुळें संसारांतून मन पूर्ण विरक्त झालेलें असतें. त्यासंबंधीं संपूर्ण तिटकारा व द्वेष उत्पन्न झालेला असतो. आणि दयाघन परमेश्वराविषयीं अमर्याद शुद्ध असें प्रेम निर्माण झालेलें असतें! परंतु नूतन साधकाचें मन मात्र वारंवार हेलकावे खात असतें. वादळांत सांपडलेल्या नौके प्रमाणें त्याची अवस्था असते. कामक्रोधादि षड्रिपु त्याच्या मनावर सारखे आघात करीत असतात. आणि त्याला वारंवार मोहांत पाडतात. परंतु साधकानें मात्र अत्यंत सावध राहून संसारमोहांतून मन परावृत्त होतांच पुनः पुनः ईश्वराकडेच तें लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मन चंचल आहे. पण निर्वात स्थलीं दिव्याची ज्योत जशी शांत व निश्चल राहते त्याचप्रमाणें मन शांत आणि निश्चल ठेविलें पाहिजे. त्याला कामादि शत्रूंचा वारा लागूं देतां कामा नये. अहंकार समूळ नष्ट झाला पाहिजे. हेंच मुमुक्षु जनांना अत्यंत आर्जवानें सर्व संत सांगतात. पुरंदरदास खालील पद्यांत आर्त स्वरानें मनोभावेंकरून देवाचा धांवा करितात.

[ राग तोडी—अटताल ]

नीने अनाथ बंधु, कारुण्य सिंधु ॥

( चाल सदर )

‘ तूंचि अनाथा वाली, कृष्णा वनमाळी ॥ धृ. ॥

मुक्त कराया करि राजाला । स्वजन न कोणी समर्थ झाला ॥
शरणागत तो होता तुजला । धांवुनि येसी संकट कालीं ॥१॥

निज कांतेला दुर्जन छळितां । पांडव स्वस्थचि जोडुनि हातां ॥
'धांवे श्रीरंगा,' सति ह्मणतां । निर्भय करिसी ती पांचाली ॥२॥
पाषाणाची योषा बनली । बलिराजा सत्पदवी दिधली ॥
दृढभक्ति धरि त्यावरि अपुली । पुरंदर विठ्ठला, करुणा झाली ॥३॥

निश्चल व अनन्य भक्ति श्रीहरीच्या चरणीं असेल तर त्या तृषार्त भक्तावर तो करुणाघन कृपेचा वर्षाव केल्याशिवाय राहत नाहीं हें निश्चित होय, असें दासांनीं ग्वाही देऊन सांगितलें आहे.

दास आपला उद्धार करण्यास परोपरीनें देवाची आळवणी करतात. त्या उद्गारांमध्यें त्यांची निस्सीम भक्ति, उत्कट प्रेम, सत्य निष्ठा, ईश्वरदर्शनाची, त्याच्या कृपेची, आत्यंतिक तळमळ दिसून येते. ते त्यांचे भावोद्गार असल्यामुळें भाषा अगदी सहजसुंदर, रसाळ व हृदयाला भिडणारी आहे. त्यांचें सर्वच काव्य त्यांत प्रतीत झालें आहे.

'हे गोविंदा मला मागें, पुढें, तुझ्याशिवाय कोणी नाहीं. हें पुष्ट केलेलें शरीरही माझें नाहीं. दारा, सुत, मित्र हे सर्व लोभी, स्वार्थी आहेत. धन संपतांच हे सर्व दूर होतात. मग वनजनाभा ! तुझ्याशिवाय मला कोण सखा सांग बरें ? (हिंदिल्ला रंगा, मुंदिल्ला, गोविंदा, नीनल्लदे पररेन' गिल्ला)

तूं, अजामिळ, वाल्या कोळी, यांसारख्या पापिष्ठांनाही पावन केलेंस ? हे कोण तुझ्या बहिणीचे पुत्र काय ? करिराज हा पशु होता, हेंही तूं मनांत आणिलें नाहींस. बोबडें

बोलणाऱ्या ध्रुव बाळाला तूं अढळपद देऊन कृतार्थ केलेंस. गरीब सुदाम्याला सर्वैश्वर्य देऊन तूं धन्य केलेंस. मग माझ्यावर करुणा करून तूं मला कां धन्य करीत नाहींस ? ( नानेनु माडिदेनो, रंगय्य ! नीयिन्न काय बेको ! ) ‘ तुझी माया मला अत्यंत छळते आहे. हे रघुराया, तूं आतां माझ्यासारख्या दीनासाठीं धांव घे. जननीजनकांच्या रेत संबंधांपासून मी जन्म पावलों. अत्यंत घोर नरकत्रास भोगला ! त्या गर्भत्रासाच्या भयंकर दुःखाचें मी कोठवर वर्णन करूं ? या मायाचेटाकिणीचे हे अत्यंत घाणेरडे प्रयोग, आणि ते तुझ्यापासून दूर नेणारे संसारपंकांत रिचवणारे प्रयोग, पाहून मी अगदीं भयग्रस्त झालों आहे. सति-सुत, आप्तेष्टादिकांच्या संसारांतल्या या मायिक सुखाच्या नादीं लागून मी सर्वस्वीं फसलों. आतां तर वार्धक्य आलें. माझे हाल कुत्राही खात नाही तूं भक्तकाज कैवारी, ह्मणून तर या भवभयाला भिऊन तुला मी अनन्य भावानें शरण आलों आहे. हें सर्व विश्व तुझ्या जठरांत सामावत असतांना हे पुरंदर विठ्ठला ! मला एकट्यालाच तूं बाहेर ठेवणार काय ? ( माये यन्न काया उपायादिंद मोहिसी . )

‘ हे श्रीरंगा, रात्रंदिवस मला तुझें अखंड स्मरण व्हावें हीच माझी तुला मनोभावें प्रार्थना आहे, एवढी माझ्यावर तूं करुणा कर. राजा रुक्मांगदाप्रमाणें मी व्रतवैकल्यें करूं जाणत नाहीं. शुकमुनींप्रमाणें मला तुझी स्तुति करतां येत नाहीं. बकवैरी भीमसेनाप्रमाणें मी ध्यान जाणूं शकत नाहीं, देवकी

मातेप्रमाणें मी प्रेम करणेंही जाणूं शकत नाहीं. खगराज, कपिराज व करिराज, बलि, प्रल्हाद, यांच्या मापानें मला मोजशील, तर मी त्यांच्या पासंगाला तरी पुरेन काय ? तेव्हां हे पुरंदर विठ्ठला ! माझ्या दुष्कर्मांचा नाश करून, माझें रक्षण कर.' ( करुणिसो रंगा करुणिसो. )

इतकी प्रार्थना करूनही देवाला दया येत नाहीं असें पाहून दास म्हणतातः—

'देवा, तुला माझी अद्याप दया येत नाहीं ? इतका कां मी दुष्ट, टाकाऊ आहे ? तूं भक्तकल्पतरु आहेस ना ? माझा जर उद्धार करणार नाहींस, तर तुझ्या ब्रीदाला कलंक लागेल. या माया-डोहांत पडून, 'माझें' 'माझें' म्हणून, मी अत्यंत मूर्खपणा केला. आतां विलंब न लावतां माझा उद्धार कर. ( इन्नारे दय बारदे )

'देवा, तूं माझी स्थिति प्रत्यक्ष पहात असून माझा हात सोडतोस ! तुला काय म्हणावें ? तुझ्याशिवाय मला दुसरे कोणी आप्त आहेत काय ? माता, पिता, सर्व कांहीं तूंच आहेस. एक एक क्षण मला युगासारखा भासतो आहे. संसाराला मी पूर्ण विटलों आहे. भो ! भक्तवत्सला ! पुरंदर विठ्ठला ! या सेवकाचा उद्धार कर.' (कंडु कंडु यन्न कै बिडुवरे)

## १५ नामस्मरणाचें श्रेष्ठत्व :

प्रत्यक्ष भगवान श्रीव्यासांनीं आपल्या सर्व ग्रंथांमध्यें आणि विशेषतः महान् भागवत पुराणामध्यें नाम संकीर्तनाचें महत्व

आणि श्रेष्ठत्व परोपरीनें, अत्यंत तन्मयतेनें वर्णन करून सांगितलें आहे. अनंत शास्त्रांचें अध्ययन झालें असलें, योगयागादि प्रक्रिया सर्व पूर्ण झाल्या असल्या, घोर तपस्या करून देहदण्डण केलें असलें, आणि तपःसिद्धि प्राप्त झाल्या असल्या, तरी जगदीश्वराच्या पादकमलाचें भक्तियुक्त अतःकरणानें अनन्य चिंतन केलें नाहीं, त्याचें दिव्य नामामृत अखंडसेवन केलें नाहीं, तर बाकीच्या सर्व गोष्टी निष्फळ होत, असा स्पष्ट निर्वाळा श्रीवेदव्यासांनीं दिला आहे. अतएव नामाचा महिमा अपार आहे. ‘ देवा, तुझ्या नामाचा महिमा तुला माहीत नाहीं ! ’ असें देवाशींच संत प्रतिपादन करीत असतात.

‘ नामा परितें सार नाहीं त्रिभुवनीं, तें कां तुह्मीं मनीं आठवाना ?’ किंवा, ‘ भजोरे भय्या, राम, गोविंद, हरि ॥ जपतप साधन कछु नहि लागत, खरचत नहि गठरी ॥ ’ किंवा, ‘ एकतत्त्व नाम, दृढ धरीं मना ! । हरीसी करुणा येईल तुझी ॥ ‘ तें नाम सोपें रें , राम, कृष्ण, गोविंद, वाचेसी सद्गद जपा आधीं ’ ॥ असें तुकाराम, कबीर, ज्ञानदेव इत्यादि संतांनीं नामाचें माहात्म्य परोपरीनें गायिलें आहे. त्याचप्रमाणें श्रीपुरंदरदासांची नामस्मरणावरच कमालीची दृढ श्रद्धा आहे. त्यांच्या मतें, सर्व जगताला तारक, असें प्रभुनामच आहे. तेंच अपरोक्ष ज्ञानाला, मुक्तिसोपान चढण्याला मुख्य आणि एकमेव साधन आहे. ह्मणूनच आपल्या अभंगांमध्यें त्यांनीं सर्वत्र नामसंकीर्तनावरच विशेष ज़ोर दिला आहे.

‘एका नामामध्यें सर्व आनंदरूप श्रुतिशास्त्रांचें सार सांठविलें आहे. ध्रुव, अजामिळ, प्रल्हाद यांचा उद्धार एका नामस्मरणानेंच झाला. नामच भुवनत्रयाला आधारभूत आहे. आणि अष्टादश ग्रंथांचें, मत्स्य, कच्छादि दशावतारांचेंही सार नामच आहे. संसारश्रांतांना विसांवा हें विश्वव्यापक देव नामच होय. तस्मात् हे मनुजा, भावशुद्ध अंतःकरणानें पुरंदर विठ्ठलांच्या पदकमलांचें अहर्निश चिंतन कर. ( वोंदे नामद-लडागिदवो, आनंददिंद सुरुव अखिल वेदगळ्‌ )

‘ निष्कारण कर्ममार्गाचें अवडंबर माजविण्यापेक्षां करुणासागर अशा गोविंदाचें अखंड नामस्मरण कर. हे नरा! तेवढेंच पुरें. तें मात्र एक निष्ठेनें अनन्य भावानें कर. दुरित-बाधा, सर्व, आपोआप दूर जातील. ( स्मरणे वोंदु सालदे, गोविंदन नाम वोंदु सालदे )

नामस्मरणानें असंख्य लोक तरून गेल्याचे दाखले असतांना, नामसंकीर्तन करणाऱ्यांना लाज कसली, भय कसलें? त्यांना कधीं तरी नरकाचें भय बाधेल काय? (केसरीला सिंहाला न भिणारा मृग कोठें आढळेल काय? गरुडाला न भिणारा सर्प कोठें आहे काय? सूर्यापुढें अंधार डौलानें मिरवेल काय? हे वासुदेवा! नारायणा! नरहरे! कृष्णा! केशवा! सीता-पते रामचंद्रा! जगन्नायका! पुरंदरविठ्ठला! असें अखंड नामस्मरण करणाऱ्याला कोणतें भय त्रास देणार ’ [ हरिनाम कीर्तने अनुदिन माळपगे नरक भयगळुंटे ? ] ‘ पतितपावन

पांडुरंगाचें अखंड ध्यान मी करीत असतांना, मला बाधा करण्याची यमाची काय आज्ञा आहे? माझी रसना अहर्निश हरिनामामृताचें सेवन करीत आहे.' अशी ग्वाही स्वतः दास देतात.' (इन्याके यमन बाधेगळु? ).

'म्हणून सर्व सज्जनहो, तुम्ही अखंड हरिनामस्मरण करा, आणि या भवसागरांतून तरून जा. त्याला काळवेळांचें बंधन नाहीं. केवळ शुद्ध भाव ठेवा. त्यामध्यें तुमच्या पदरची कवडीही खर्च होत नाहीं.' (कृष्ण, कृष्ण, सर्वोत्तम कृष्ण.)

नामस्करण न करतां, केवळ व्रतवैकल्यें करणाऱ्यांना, परमेश्वर प्राप्तीसाठीं संन्यास घेण्याचे व्यर्थ श्रम करणाऱ्यांना, अनेक अनावश्यक व्याप करणाऱ्यांना उद्देशून दास कडक शब्दांत सांगतात.

'नारायण, नारायण, असें नित्य भजन कां करीत नाहीं? तुमच्या जिव्हेला खिळे टोंचले आहेत कां? ती दगडानें ठेंचली आहे? नित्य उपवास करण्याचे व्यर्थ श्रम कशाला? कडक थंडीमध्यें कांपत कांपत हिमशीतल पाण्यामध्यें डुबावें कशाला? एवढें लांब काशीला जाण्याचे श्रम कशाला? देवदर्शनांसाठीं गांवोगांव भटकावें कशाला? श्रीहरीचें नामस्मरण हें मुक्तीचें मुख्य साधन नाहीं काय? (नारायण यन्न बारदे)

'वाचेनें श्रीहरिनामाचा गजर करीत असतांना गंगादि सकल पवित्र तीर्थांचें फल आपोआप मिळतें. देवपूजा, स्नान, संध्या, केव्हांही ज्याच्या हातून घडली नाहीं त्याला मोक्षाचें



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ..........

साधन नामच होय. दानधर्म न करणाऱ्याला, ज्ञानहीन अशा परम मूढालाही, हें प्रभुनामच या भयानक भवसागरांतून पार करील. हें नाम ह्मणजे हेम, माणिक, मोतीं, या रत्नांचा कोशच समजा. भगवन्नाम ह्मणजे, मनुष्याला वेळोवेळीं जागृति देणारा, आणि मोक्षमार्गास नेणारा, असा दयाळू गुरूच होय!'
( गंगादि सकल तीर्थगळ फलविदु हरिय नाम )

## १६ पूर्व सुकृताची आवश्यकता :

पूर्व सुकृत मोठें असल्याशिवाय ईश्वरभक्तीकडे मन लागणें अत्यंत दुरापास्त आहे. असें नसतें तर, सर्व जगच परमेश्वराच्या नामसंकीर्तनामध्यें रंगून गेलें असतें. परंतु प्रत्यक्षांत हें चित्रमयजग नाना भानगडींनीं भरलेलें दिसतें. लोभ, मत्सर, स्वार्थ, असूया, ईर्षा, द्वेष, इत्यादि अनेक दुष्ट विकार या विराट विश्वांत सैतानी थैमान घालीत असतात, याचा अनुभव नाहीं. असा कोणी महाभाग आढळणार नाहीं. परंतु याच भानगडींच्या जगांत, दया, क्षमा, शांति, प्रेम, निर्लोभता, अहंकारशून्यता, उपकारबुद्धि, परमेश्वर दर्शनाची जिज्ञासा इत्यादि दिव्य गुणांचेंही, या काळयाकभिन्न मेघ समुद्रामध्यें क्षणमात्र चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें पथिकास मार्गस्थ करणारें, सुखदायक, असें दर्शन घडतें, हेंही तितकेंच खरें आहे. ह्मणूनच जी जी अशी लहान थोर संत मंडळी व जे जे साधक आढळतात, ते सर्व, पूर्व सुकृतांचें गांठोडें बरोबर घेऊन आलेले, व हरीच्या प्रीतीस पात्र झालेले असेच असतात. गत-

जन्मांच्या ठिकाणीं त्यांनीं पुण्य संचय केलेला असतो. म्हणूनच प्रभूचें नाम त्यांच्या तोंडीं सारखें असतें. ' बहुतां सुकृतांची जोडी, म्हणूनि विठ्ठली आवडी. ' आणि म्हणूनच ज्याला दयाघन देवाचें प्रेम मिळवायचें आहे, जन्ममरणाचा फेरा चुकवायचा आहे, मोक्षाचें साधन करायचें आहे, त्यानें पुण्याचा संचय करावा, नेहमीं सत्कर्मातच रत असावें, नारायणाचें अखंड नामस्मरण करावें. असें केल्यानेंच त्याचा ओढा ईश्वराकडे लागतो. नंतर तो या जन्मीं अगर पुढच्या जन्मीं परमेश्वर प्राप्तीचा ध्यास घेऊन, त्याच्या दयेनें, कैवल्यपद प्राप्त करून घेतो. ' ( यमेवेष वृणुते तेन लभ्यः )

' जन्मजन्मांतरींच्या दुष्कर्मांचा संपूर्ण नाश झाल्याशिवाय, श्रीरामाचें दिव्य नाम सुखासुखी लाभणार नाहीं. आपल्या भक्तीनें त्याला वश करून, तें आपल्या हृदयसंपुटांत-सांठवून ठेविलें पाहिजे, नंतरच तें नाम मुखीं लाभतें. आपल्या हृत्कमलामध्यें वास करणाऱ्या, आनंदपूर्ण पुरंदर विठ्ठलाचें अखंड ध्यान करीत राहिल्याशिवाय, ती मूर्ति आपल्या डोळ्यापुढें उभी केल्याशिवाय, त्याचें दिव्य नाम लाभणार नाहीं. ( सुम्मने दूरकुवदे श्रीरामन दिव्य नामा )

## १७ मनास ईश्वर भक्तीचा उपदेश :

रामदासादि इतर सर्व संतांप्रमाणें दासांनीं आपल्या नित्य भ्रांतींत पडणाऱ्या खट्याळ मनाला उपदेश केला आहे. मनाचे गुण सर्वत्र सारखेच आढळत नाहींत काय ? अखिल

मानवांनीं या गोष्टीचा अवश्यमेव विचार केला पाहिजे. अध्यात्मवादी, अगर परमार्थमार्गी, माणसाची देवावर केवल अंधश्रद्धा असत नाहीं; विचारानें त्याची दृष्टी साफ झालेली असते. सच्चिदानंदात्मक परमेश्वराच्या श्रेष्ठ सत्तेची त्याला यथार्थ कल्पना आलेली असते. म्हणून संसारांतून मुक्त होण्यास तो सारखा धडपडतो. या योगें तो आपल्या भयंकर चंचल आणि अवखळ मनाला आपल्या ताब्यांत आणूं शकतो. अंतर्मुख होऊन प्रत्येकानें शांतपणानें, स्थिर बुद्धीनें विचार केला तर, विषयलंपट इंद्रियांच्या आधीन झालेल्या मूढ मनांत दुष्ट विकार कसें तांडवनृत्य करितात, आणि बिचाऱ्या अज्ञ आणि विकारवश मनाची कशी दुर्दशा उडते, हें सहज समजून येण्यासारखें आहे. साहजिकच मनाला स्वैर सोडलें तर, माणसाच्या बहुमोल आयुष्याचा नाश ओढवतो. यासाठीं या दुस्तर भवसागरांतून तरून जाण्याची ज्याची इच्छा असते. श्रीहरीचे कृपाकिरण आपणांवर पडावेत अशी ज्याची आकांक्षा असते, त्यानें आपल्या चंचल आणि विषयांकडे धांव घेणाऱ्या मनाला आवरण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. त्याला आंजारून गोंजारून, केव्हां गोड शब्दांनीं, केव्हां कठिण शब्दांनीं, यमनियमादि यौगिक प्रक्रियांनीं, नानातऱ्हांनीं त्याला रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या विषय-रोग पीडित मनाला सुधारण्याचा रामबाण उपाय, म्हणजे हरिनामस्मरण ! चौखूर धांवणाऱ्या, आपल्या पवनवेग चित्ततुरंगाला, विवेक लगामानें खेंचून

आत्महिताच्या राजपथावर आणून सोडलें पाहिजे. मन निर्मल झालें पाहिजे. आणि याच कारणासाठीं दासांनीं मनाला फार सुंदर बोध केला आहे.

( राग : तोडी–त्रिपुर ताल )

' ई शरीरद भ्रांति इन्नेके मनवे ? ॥
वासुदेवन नेनेदु सुखि यागो मनवे ॥...

' हे मना, तूं या देहावर इतका कां मोहित झाला आहेस ? अरे, वासुदेवाचें स्मरण करून कायमचा सुखी हो. दांत गळून पडले ! सप्तधातु शुष्क झाले ! स्त्रीसुद्धां जवळ येईनाशी झाली ! आतां या देहाचा कां एवढा हव्यास ? ज्या देहाला कोणी विचारीत नाहीं, त्याची काळजी कशाला ? मना ! आतां विचार कर. श्रीकांताचें अखंड स्मरण कर. पाय थरथरत आहेत, दृष्टि मंद झाली आहे, तारुण्य ओसरलें आहे. जरेनें देहावर पाश टाकिले आहेत, आणि आयुष्य मर्यादा व सर्व क्रिया समाप्त होत आल्या आहेत. अशा वेळींही, हे मना ! तूं बालपणांतल्यासारख्या आशा धरून बसावें काय ? जलतरंगाप्रमाणें हें शरीर क्षणभंगुर, नाशवंत, आहे. म्हणून हे मना ! धन, दारा भूमी, यांचा मोह सोड. नीरजनाभ, श्रीपुरंदरविठ्ठलाशीं सख्य जोडून, हे मना ! कायमचा सुखी हो. असें करणें तुला इष्ट नाहीं काय ? '

' इगले भजिसले जिव्हे ' या पद्यामध्यें त्यांनीं नित्य जिभेवर श्रीहरीचें नाम ठेवण्यास मनास कळकळीचा उपदेश

केला आहे. भवबाधा सोडविणारी, नरकभय घालविणारी, हीच एकमेव गोष्ट आहे. मृत्यु मस्तकावर पाय देऊन उभा आहे. त्या भयांतून मुक्त होण्यासाठीं, हे मना ! हरीचें नामस्मरण कर. कंठाशीं प्राण आल्यावर तुला इच्छा झाली तरी मंगलगतिप्रद अशा श्रीरंगाचें गुणगान करतां येईल काय ? तनुतनुजाच्या या मायिक बंधनाला सत्य मानून, आहारविरहामध्यें दंग होऊं नको; आणि कमलापति श्रीनरहरीच्या पादकमलाला अंतरूं नको. भयंकर यमदण्ड भोगीत असतांना तुला कोणीहि सोडविण्यास येणार नाहीं. तुझ्यापासून तो भक्तकैवारी फार दूर आहे. कृतकर्मांचा दोष जाळून टाकण्याला, अपार दुखांचें निवारण करण्याला, आणि या भवजलधींतून तरून जाण्याला एकच एक उपाय आहे. तो म्हणजे ईश्वरभजन, अखंड नामस्मरण. या क्षणापासूनच संवय ठेव. परमपुरुष विठ्ठलाचें नांवच तुला तारील. हर्षानें नामस्मरण कर, आणि कायमचा सुखी हो.

## १८ शरीराचा मोह :

संतांचा उपदेश हा सर्व मानव जातीकरितां असतो. ‘ सर्वेऽपि सुखिनःसन्तु, ’ असाच त्या विश्वकुटुंबी संतांचा विशाल हेतु असतो. मानवी मनाला, पुरंदर दासांनीं केलेला बहुमोलाचा उपदेश, वरील विधानाची सत्यता सिद्ध करीत नाहीं काय ? आणि हे स्वानुभवाचे बोल नव्हेत काय ? मोक्षाच्या मार्गावर जाऊं इच्छिणाऱ्या, आणि असणाऱ्या

माणसाला क्षणाक्षणाला प्रतिबंध करणारें, निरुत्साहित करणारें तेजोभंग करणारें आणि नरकवास घडविणारें, दुःखाचा धनी बनविणारें कोण असेल, तर सकल इंद्रियांवर अधिसत्ता गाजविणारें दुष्ट मनच होय. अत्यंत चंचल, विकारी, आणि मोहाला बळी पडणारें असें हें मानवाचें मन फारच धोकेबाज आहे.

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथी बलवत् दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥
असंशयं महाबाहो, मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौंतेय, वैराग्येण च गृह्यते ॥

वायूचा निरोध करणें जसें कठीण, तसें हें खट्याळ, चंचल मन आवरणें कठीण, यांत संशयच नाहीं. कृष्ण ह्मणतात, 'हे महाबाहो अर्जुना! अभ्यास व वैराग्य, या मार्गानेंच तें आवरतां येईल. नित्य नवनव विषयांकडे धांव घेणाऱ्या, शरीराचा पराकाष्ठेचा मोह धरणाऱ्या, या प्रबळ विकारी मनाला सन्मार्गावर आणण्यासाठीं सर्व संतमहंतांनीं अनेक सुलभ उपाय सांगितले आहेत. ज्या गोष्टीबद्दल मोह उत्पन्न होतो, आणि ती शेवटीं आत्मनाशास कारण होते, त्या गोष्टीविषयीं, तिरस्कार, जुगुप्सा उत्पन्न करणें हें महत्वाचें कार्य आहे. हें करीत असतांना त्याला शाश्वत सुखाची खात्री, वाटली पाहिजे, आणि या मायिक व दुःखद संसाराविषयीं उदासीनता उत्पन्न झाली पाहिजे. हेंच कार्य अत्यंत कठीण आहे. सर्व शास्त्रें, पुराणें

साधूसंत कंठरवानें सांगत असतां या मायेच्या फेऱ्यांतून सुटका करून घेण्याची मानवाची धडपड अत्यंत अल्प वाटतें. परंतु आर्त, जिज्ञासु, अशा मुमूक्षूंच्या हृदयापर्यंत हा उपदेश भिडतो, परमार्थाचें दालन खाडकन् उघडतें; आणि मुंडकोपनिषदांत सांगितल्याप्रमाणें जीवाशिवांची भेट होते-सायुज्य पदाची प्राप्ती होते.

आतां दासांनीं हा उपदेश कोणत्या शब्दांत केला आहे तें पाहूं. 'हे प्राण्या, हा शरीराचा व्यर्थ मोह टाकून दे. त्यांत काहींचेंहि सुख नाहीं. ईश्वरभजनाकडे चित्त लाव. या थोर नरजन्माचें सार्थक कर. नश्वर देहाला भुलून, आत्मघात करूं नको.'

नरजन्माचें श्रेष्ठत्व: दास खालील रसभरित पद्यांत अत्यंत कळकळीनें सांगतात.

मानवजन्म दोड्डदु, हानी माडलु बेडी, हुच्छप्पगळिरा !..
येनुकारण नम्म यदुपतियनु मरेतिरी ? ॥
धनधान्य पुत्ररु कायुवरे ! ॥
इन्नादरु एको भावदि भजिसिरी ।
चिन्न पुरंदर विठ्ठल रायन ॥ ५ ॥

'धन्य धन्य हा नरदेहो' — 'नानासुकृतांचें फळ, तो हा नरदेह केवळ,' असें श्रेष्ठ मानव जन्माचें सुंदर वर्णन संत रामदासांनींहि केलें आहे.

'हे मूर्खजनहो ! थोर असा मनुष्य जन्म तुम्हांला मिळाला असतां, आत्मनाश कां करून घेतां ? कर, पद, जिव्हा इत्यादि ज्ञानेंद्रियें असतांना मोहसंभ्रांत जाऊन, परनारीची इच्छा करून, हरिनामामृताचा धिःकार करून विषयमलाचें सेवन कोणत्या कारणांसाठीं करतां ? कालपाश टाकून तुम्हांला ओढून नेणाऱ्या यम किंकरांना तुह्मी थांबवूं शकाल कां ? आमच्या यदुपतीचा तुम्हांला विसर कां पडला ? धन, धान्य, पुत्र, दारा, हे कां तुमचें रक्षण करणार आहेत ? आतां तरी यापुढें एकनिष्ठेनें पुरंदर विठ्ठलाचें भजन करा आणि दुस्तर भवसागर तरून जा.'

मनुष्यजन्माचें श्रेष्ठत्व सांगतांना दासांनीं या नाशवंत शरीराचा मोह टाकून देण्याबद्दल परोपरीनें बजावलें आहे. यावेळीं संतश्रेष्ठ रामदासस्वामींनीं केलेलें मृत्यूचें वर्णन आठवतें. मृत्यूची घटिका आली कीं, मृत्युदेव विलंब लावीत नाहीं. गृह धनादि सर्व प्रिय वस्तु व सुत, कांतादि प्रिय जन, यांना येथेंच सोडून हा इहलोक एकट्यालाच झटकन् सोडावा लागतो. मायापाशादि बंधनें ताडकन् तुटतात. त्या निर्दय अंतकाच्या कठोर यमदूतांना काडीचीहि दया येत नाहीं. सदर पद्याचा मराठी अनुवाद खालीं देत आहे.

: अंतकन दूतरिगे किंचीत दयविल्ल :

( चाल—धनराशी दिसतां )

यमदूता न दया, अवसर कांहीं । झणि तूं धरीं, मुखीं श्रीहरी ॥धृ॥
दिवस, निशा नच बघतां रमसी, गोड खाउनी ढेकर देसी ।

गरीबां नाडुनि धनीहि होसी, परि ना बरी, मतिही बुरी ॥
विवाहितीं नव दुमतें सदनीं, क्षेत्र घेतलें धन वेचोनी ।
न मरे ह्मणसी परी धरूनी, नेतीं तुला, भज श्यामला ॥
हर्म्य रम्य बांधविलें, शांती त्याची आज, गर्भिण मम युवती ।
पुत्रलग्न या मासांतीं, कथिसी जरी, बहुतां परी ॥ ३ ॥
सुत जन्मोत्सव, आज बारसे, मुंज घरीं मी येऊं कैसे ।
योग्य तुला कां हें दिसे, वदतां असें, मृत्यु हंसे ॥ ४ ॥
अन्न वाढलें न मिळें खाया, वेळ न आप्तेष्टा भेटाया ।
पुरंदर विठला त्या समयां, स्मरणा करी, तरसी तरी ॥५॥

शरीर सौंदर्याला मोहून संसारांत रंगून गेलेल्या नराला उद्देशून दास विचारतात, 'बाबारे! कशासाठीं या तनूवर मोहित झालास? क्षणांत रोष येतो, क्षणांत तोष होतो! ही तनू क्षणाक्षणाला रात्रंदिवस रंग बदलते. हा मुलगा, हा मित्र हा शत्रु, हा बांधव, असा व्यर्थ अभिमान वाहतोस; आणि ज्या देहासाठीं इतके अपार कष्ट तूं करतोस, तो देह एके दिवशीं चितेंत भस्म होणार आहे! विषयानें धुंद झालेल्या प्रेमी दंपतीच्या क्रीडांखालीं पडलेल्या इंद्रियरेताची प्रतिमा ह्मणजे हा तुझा देह बरें! या देहाच्या स्वाधीन कोणती गोष्ट आहे! तरीहि कर्म करीतच असतो, आणि शेवटीं यमाच्या स्वाधीन होतो. नवद्वारांतून सारखा दुर्गंध वाहत असतो. उदरंभरणासाठीं परदास्यामध्यें अगर नरकांतही सुख मानतो. ज्या देहाला पुरंदर विठ्ठलाचें स्मरण नाहीं त्यावर हे नरा! तूं इतका कां लुब्ध आहेस?' (हिग्गुवियाको ई देहके)

अशा तऱ्हेनें उपदेश करून नाशवंत आणि दुर्गंधानें भरलेल्या, कुमार्गाला लावणाऱ्या या देहाच्या मोहाला बळी न पडतां, ईशनामस्मरणानें आत्मोद्धार करून घेण्याबद्दल दासांनीं बजावलें आहे.

तो नरदेह व्यर्थ होय: हरिस्मरणानें हा देह पवित्र होतो. आणि तें स्मरण, भजनपूजन नसेल तर तो जन्म व्यर्थ होय, तो देह व्यर्थ होय ! ( हरिय नेनेयद नरजन्म वेके )

सदर पद्यामध्यें दासांनीं फारच रम्य व मार्मिक दृष्टान्त दिले आहेत. हरीच्या प्रीतीस आणि अनुग्रहास पात्र झालेल्या साक्षात्कारी संतांची वाणी म्हणजे प्रेताला जीवकळा आणणारी जीवनधाराच होय. 'जो मातेला सुखवीत नाहीं, तो पुत्र कसला ? सासूची मानखंडना करणारी ती स्नुषा कसली ? नीतिशून्य असणारा सर्पसा शेजारी, काय कामाचा ? भक्तिहीन बाह्य ढंग म्हणजे मोठा विधि नव्हे. सज्जन नसलेली ती सभा कसची ? वेदज्ञानहीन ब्राह्मण, धैर्यशून्य क्षत्रिय, कोपिष्ट संन्यासी, संततिहीन सौभाग्य, संकटांत लोटणारे आप्त, संसाराचा तमाशा करणारी कजाग बायको, ज्ञान न देणारा गुरु, यांचा काय उपयोग आहे ? तसेंच पुरंदर विठ्ठलाची मूर्ति न बघणारा, डोळे असूनही आंधळाच नव्हे काय ?'

## १९ देवाशीं दासांचा सलगीचा वाद :

'नाहं कर्ता हरिः कर्ता,' असें निश्चयात्मक ज्ञान झाल्यानंतर स्वतःचें प्रापंचिक कर्तव्य म्हणून कांहीं उरत नाहीं. तो भक्तांचें कांहीं उणें पडूं देत नाहीं.

‘ अनन्याश्चिंतयंतो माम् ये जनः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

ही भगवदुक्ति प्रसिद्ध आहे. गीतापठण करणारे नित्यशः हें तोंडानें ह्मणत असतात, परंतु त्या श्लोकाचा खरा अर्थ जाणणारे, अनुभव घेणारे, आणि साऱ्या जगाला त्या लीलानाटकी प्रभूचें महात्म्य पटवून देणारे खरे संत जर कोण असतील, तर हरिनामामृताच्या डोहांत सदैव डुंबणारे, हरिनामामृताचें पान करणारे, ऐहिक जगाला तुच्छ लेखणारे असे वैराग्यसंपन्न ‘ हरिदासच ’ होत. ‘ योगाचें यंत्र मला सांपडलें, अंतरंगामध्यें यंत्रवाहक नारायणाचें अखंड स्मरण ठेवणारें असें यंत्र मला मिळालें. एकच वेळ स्मरण केलें तरी कोटी जपाचें फल देणारें असें पुरंदर विठ्ठलाचें दिव्य नामरूपी यंत्र सांपडलें ( यंत्र दोरकितु ! योग-यंत्र दोरकितु ! )

कोणत्याही संकटाची पर्वा हरिदासांना असत नाहीं. यमाची बाधा त्यांना भिववूं शकत नाहीं. महाहिंस्र पशूंचीही त्यांना भीति वाटत नाहीं, एवढेंच काय ‘ हरिदासां ’ समोर आले तर ते पशु वैरभाव विसरतात. सर्व भूतांतर्यामी केशवाला दासांनीं आपल्या हृदयसंपुटांत कायमचें ठेवून दिलें आहे, आणि तो हृदयस्थ जगदात्मा त्यांना सर्वत्र दिसतो. अशा थोर भक्तांचाच आपपरभाव नष्ट झालेला असतो. वारकरी सांप्रदायांत जपवीणा दुसऱ्याच्या स्वाधीन करतांना पायांवर डोकें ठेवून नमस्कार करण्याचा जो प्रघात आहे तोही याचेंच

द्योतक असावा असें वाटतें. हृदयस्थ परमात्म्यालाच तो नमस्कार असतो. असो.

अशा तऱ्हेची उन्नत मानसिक अवस्था प्राप्त झालेले निरहंकारी भक्तच देवाशीं सख्यरूपी भक्ति करूं शकतात. ही मैत्री, ही सलगी, अत्यंत निर्मल अशी असते. विकाराची अल्पही बाधा तिला होत नाहीं. अशा अवस्थेंत रंगलेले निश्चित बुद्धीचे संत देवाशीं वादविवाद करूं शकतात. बाह्य-जगाला दोषभूत दिसणाऱ्या त्यांच्या कृत्यांचें रसभरित वर्णन करतात. देवाशीं ते भांडतात. आपलें कांहीं उणें न पडूं देण्या-बद्दल त्यास बजावतात. देवानें ज्यांचा उद्धार केला आहे, अशांचे दाखले देऊन, त्यांच्या पापाचा पाढा वाचतात. त्यांच्यापेक्षां आपण कोणत्याही प्रकारें कमी नाहीं, असें स्पष्ट सांगतात. या सर्व सलगीच्या संवादांमध्यें केवळ पराकोटीच्या भक्तीशिवाय दुसरें काय दिसून येतें ? 'न मिळो खावया न वाढो संतान, परी तो नारायण कृपा करो; देह जावो अथवा राहो, पांडुरंगीं दृढभावो' असें सदैव इच्छिणारे तुकारामादि संत देवाच्या देवपणाविषयीं अणुमात्र तरी विचलित होतील काय ? या सर्व सलगीच्या भाषेमध्यें किती उत्कट भक्ति, प्रेम, आदर, नम्रता, मनाचा शुद्ध भाव, हे गुण उत्कटत्वानें दिसून येतात.

दासहि एके प्रसंगीं सलगीचा संवाद करीत असतां देवाला म्हणतातः—

( राग : केदार गौळ )

निनगारु सरियिल्ल । यनगन्य गतियिल्ल ।

निनगू यनगू न्याय हेळुवरिल्लो ॥ धृ० ॥........

निन्नाज्ञदवनानु निन्न प्रेरणियिंद,
अनंतविधद कर्म माडीदे,
यन्नपराधगळेणिसलागदु देवा ।
पन्नगशयन श्रीपुरंदर विठ्ठला ॥

मराठींत केलेला अनुवाद खालीं देत आहे.

( चाल सदर )

सम कोण तुज ? मज गति कोण तुजवीण,
हा न्याय हरि ! कोण निवडी दुजा ॥ धृ० ॥

एके ठायीं एक सतत सान्निध तव मी,
त्वच्चरणा त्यजुनी कधिं दूर नाहीं ॥
प्राप्त विषय भोगा ओपूनी मग मातें
लोटूनी भवकूपीं, बघसी कां मौजा ? ॥ १ ॥

परकांता-प्रिय, पापी, म्हणुनि इच्छिसी
कां, बहुविध नरकीं टाकाया ? ॥
परि राधापति तूंते कां वदति ? वद कृष्णा !
तूं थोर म्हणुनी या चालति गमजा ? ॥ २ ॥

प्रेरक धनि तूंचि आज्ञांकित मी,
इछेनुसाराचि सर्व तुझ्या ॥
आचरिलें कर्म गणुं नको देवा ॥
पुरंदराविठ्ठला ! मी दास तूझा ॥ ३ ॥

वरील अभंगामध्यें, दासानीं ' नाहं कर्ता हरिः कर्ता, ' ईश्वरी संकेत, त्याची इच्छा सर्वाला कारण आहे, तोच प्रेरक आहे, भक्त त्याचा आज्ञांकित दास आहे, इत्यादि तत्त्वें सुंदर रीतीनें प्रतिपादिलीं आहेत. थोडक्यांत म्हणजे पराकोटीची भक्ति दिसून येते, यांत काडीमात्र संशय नाहीं.

## ईश्वराला आणि भक्ताला शपथेचें बंधन :

एके ठिकाणीं तर दास देवाला चांगलाच टोमणा मारतात. ' धियो यो नः प्रचोदयात् ' आमच्या बुद्धीला प्रेरणा देणारा, सर्व भूतांमध्यें वास करणारा, या जगाचा जर तो नियंता आहे, तर त्याची जबाबदारीहि पण मोठी आहे.

' यनगु आणे रंग ! निनगू आणे ॥
एनगू निनगू इब्बरिगू भक्तराणे ॥

" हे कृष्णा ! तुला आणि मला दोघांना शपथ असो. आह्मा दोघांना तुझ्या परम भक्तांचीच शपथ असो. मी तुझें नामस्मरण करणार नाहीं तर शपथ मला लागो; आणि तूं जर या कठीण भवसागरांतून माझें रक्षण करणार नाहींस तर तुला शपथ लागो. वदान्य प्रभु ! अशा तुला सोडून जर मी दुसऱ्याचें नामस्मरण केलें तर शपथ मला लागो, परंतु मध्येंच माझा हात जर तूं सोडशील तर मात्र ती शपथ तुला बाधो. तन, मन, धन यायोगें तुझ्याशीं जर मी वंचना केली तर शपथ मला लागो; पण तुझ्या पादारविंदीं जर माझें मन तूं स्थिर केलें नाहींस तर शपथ तुला लागो. दुर्जनांचा मी जर सहवास

केला तर शपथ मला बाधो, आणि सांसारिक मायापाशांतून तूं जर मला मुक्त केलें नाहींस तर शपथ तुला बाधो. सज्जनांचा सहवास जर मीं केला नाहीं तर शपथ मला लागो; आणि जर कां दुर्जनापासून मला तूं दूर ठेवलें नाहींस तर मात्र शपथ तुलाच लागो. हे प्रभो ! श्री हरि ! जर मी तुझ्या आश्रयाला आलों नाहीं तर शपथ मला लागो, आणि हे पुरंदर विठ्ठला ! तूं जर माझें रक्षण करणार नाहींस तर तुलाच शपथ लागो.'

पुरंदरदास हे नारदांश मानले जातात याचें एक महत्वाचें सहज लक्षांत येण्यासारखें कारण ह्मणजे त्यांची नारदाप्रमाणें असणारी उत्कट एकांत भक्ति ! ह्मणूनच ते देवाशीं इतक्या सलगीनें वाद करूं शकतात. त्यांची अशा प्रकारची हृदयंगम पद्यरचना असंख्यात आहे. थोडक्यांत तिचें दिग्दर्शन केलें आहे.

## २० व्याज स्तुति :

ईश्वराचें स्तुतिस्तोत्र करण्याचा हा एक प्रकार आहे. बाह्यतः या प्रकारामध्यें निंदाच, आणि तीसुद्धां भरपूर केलेली आढळेल. पण ती निंदा नसून ती निर्मळ मनानें व एकनिष्ठेनें केलेली स्तुतीच होय. भक्तीची उत्कटता मनांत उत्पन्न झाल्याशिवाय, ज्ञान आणि वैराग्य अंगी बाणल्याशिवाय कोणाच्याहि मुखांतून असे उद्गार निघणारच नाहींत. ज्यांच्या मुखांतून असे उद्गार निघतात ते अंतर्बाह्य पवित्र असणारे, देवदर्शनासाठीं वेडावलेले, अगर दर्शनानें वेडे झालेले

परम भक्तच असतात. अनुभवामृताचा स्वाद घेतल्याशिवाय, भक्तिरसाचें यथेच्छ पान केल्याशिवाय, कोणी जर असे उद्गार काढील तर तो जगांत निंदास्पदच ठरेल.

'यातरिंद चलुव ? ' 'येनु बेडलि हरिये ? ' 'केळो, कोपिस बेडा' इत्यादि पद्यें व्याजोक्तीनें भरलेलीं असलीं तरी निर्व्याज भक्तीचें त्यांना भरतें आलेलें आढळेल.

'देवा ! तुझ्याजवळ असे कोणते गुण आहेत ह्मणून तुला भजावें ? तुझी त्रिखंड गाजणारी सारी कीर्ति मला माहीत आहे. पृथ्वीवर राहायला जागा मिळेना ह्मणून तूं सागरामध्यें वास करतोस. चांगली पर्यंक शय्या मिळेना ह्मणून तुला शेषावर झोपणें भाग पडतें ! सुबुद्धि सांगण्याला तुला आईबाप नाहींत ह्मणून तूं रानांवनांत गाई चारीत हिंडतोस; चोरी करतोस, गोपींची चेष्टा करीत त्यांच्या मागें लागतोस ! बसायला चांगलें वाहन मिळेना ह्मणून तुला पक्ष्याच्या स्कंधावर बसावें लागतें ! बरोबरीचा तुझा भाऊ किती सुंदर ! आणि तूं सिंहमुख धारण करणारा किती उग्र ! तुला स्वतःच्या शरीराचें भान नसल्यानें विषाच्या डोहामध्येंही उडी टाकतोस ! मदनाचा पिता ह्मणून तूं फारच सुंदर असशील असें ह्मणावें तर तुला कुब्जा सुद्धां मान्य होते ! हे त्रिभुवनवंद्य मदनारिबंधो, माझें रक्षण कर. मी तुला अनन्य भावानें शरण आलों आहे.' (यातरिंद चलुव ? कां ह्मणूं चांगला ? )

'हे देवा! तुझी सर्व विचित्र कृति पाहिली म्हणजे अगदीं किळस येते; मग तुजकडे मी कोणता वर मागूं? तूं भारी चंचल आहेस, कठिण शरीराचा आहेस, भूमि विदारक आहेस, आंतड्यांच्या माळा धारण करणारा, नृपकुलांचें निर्मूलन करणारा, अरण्यांत स्वस्त्रीस हरवणारा, असा तूं भयंकर आणि विचित्र कर्मे करणारा आहेस. नग्न फिरणारा, घोड्यावर स्वार होणारा, भिक्षा मागून खाणारा, घोडे हांकणारा, बळीचें द्वार रक्षण करणारा, असे अनंत प्रकार करणारा तूं आहेस. जरासंधाच्या भयानें आपलें गांव सोडणारा, मातुलाचें शिरकाण करणारा, असा तूं असंख्य कर्मे करणारा, लीलानाटक करणारा, पण चतुर्विध मुक्ति देणारा, जगन्नाथ श्रीपुरंदर विठ्ठल पण तूंच आहेस.' (येनु बेडलि हरिये? मागूं काय?)

खालील प्रसिद्ध पद्याचा मराठींत अनुवाद देत आहे.

(राग–रे गुप्ती–झपताल)

केळो, कोपिस बेड, हेळिदरे फलविल्ल ॥

हेळलंजुवे निम्म, बहळ बडतनगळन्नु कृष्ण ॥ धृ० ॥

चाल–(जो जिंकुनि पांच जणांसी)

काय तुझे दैन्य देवा, कींव येवोनि करिं तव सेवा! ॥ धृ० ॥
ज्येष्ठ सुताचें मस्तक फुटकें। लहान तरी तो जगभर भटके॥
स्त्री पददात्यागृहिं कधिं न टिके। लोभ्या घरीं ती घेई विसावा १
कन्या बघतां व्युत्क्रममार्गी। जातीभेदहि न गणी स्नुषा 'गी'॥
शालक दैनंदिन क्षयरोगी। चहाडि करितांचि पौत्र फिरावा॥२॥
खासी उच्छिष्ट डौल कशाला? श्रीनाथ! मग कां भिक्षा तुजला?
कुक्षिं ठेवोनि पुरंदरविठ्ठला। विश्वा पोपिसी, गुण एक बरवा॥३

१०८६३

## २१ कृष्ण-लीला-गौळणी :

एकनाथ, नामदेव, सूरदास, कबीरदास इत्यादि संतांप्रमाणें, कृष्णलीला, यशोदा-कृष्ण संवाद, खोडकर व कपटी कृष्णाबद्दलच्या गोपींच्या तक्रारी, आदि विषयांवर दासांनीं विपुल, सुरस, पद्यरचना केली आहे. प्रत्येक पद्यामध्यें भक्तिरस ओतप्रोत भरून राहिला आहे. साक्षात्कारी संतांचे हे बहुमोलाचे गोड बोल असून ईश्वरी अनुग्रहामुळें त्यांस दिव्यत्वाची जोड मिळाली आहे. काव्यांत प्रसाद भरला आहे. ही प्रासादिक काव्यें वाचीत असतांना मन तन्मय होतें; परिशुद्ध होतें; आनंदमय व पवित्र वातावरणात संचरूं लागतें; आणि तें हरिचरणारविंदीं भक्तिभावानें विनम्र होऊन, विलीन होतें. ईश्वर सर्वश्रेष्ठ असून आपण त्याचे दासच नव्हे तर दासानुदास आहोंत, ही दासभावना दृढमूल होते. कृष्णाची अनंतविध लीला वर्णन करीत असतां, हरिभक्तीचें सुंदर विवेचन केलेलें आढळेल; आणि तें किती हृद्य व सत्य आहे, तें पहा. विश्वसुंदर बालमुकुंदाची माता यशोदा म्हणते-' हे बालमुकुंदा ! कृष्णा ! घराच्या बाहेर कुठें जाऊं नको बरें. तुला शोधीत हिंडणारे तुझे दास तुला तिथें पाहतां क्षणींच उचलून घेऊन जातील. सुर, मुनि, योगी हे सर्व गिरिगव्हरादि ठिकाणीं तुला शोधून शोधून दमलेले असणार, आणि तूं जगदात्मा सर्वांतर्यामी इथें खेळत असतांना, त्यांच्या दृष्टीला पडलास, तर हे माझ्या मोहक बालकृष्णा, अत्यंत हर्षित झालेले ते तुझे भक्त तुला पळवून नेल्याशिवाय राहतील काय ?

तुझे भक्त फारच लोभी आहेत. तुला बाहेर सोडूं नये ह्मणून आपल्या हृदयगुहेमध्यें कोंडून ठेवतात, आणि ध्यानाचें दिग्बंधन करून तुझ्या नामस्मरणांतच दंग राहतात. पण तूं परशक्ति आणि अनंत गुणनिधान असल्यानें रामकृष्णादि रूपानें बाहेर संचरतोस! आपल्या हृदयांतील परवस्तु अदृश्य झाल्यामुळें ते शोधीत, धांवतच येथें येतील; आणि तुला माझ्यापासून दूर नेतील. तुझ्या सुकुमार शरीराला प्रेमालिंगन देण्याला या गोपांगना कशा अगदीं टपलेल्या आहेत. तेव्हां हे रंगा, मंगलोत्तमा, पुरंदरविठ्ठला, आमच्या अंगणांतच खेळ बरें! बाहेर जाऊं नको.' (पोगदिरेलु रंगा बागिलिंदाचिगे) परशक्ति, पूर्ण, सर्वांतर्यामि, अनंतगुणनिधान, पुरुषोत्तम, प्रेरक व शासक, असा ईश्वर, आणि अल्पशक्ति, अल्पबुद्धि, परतंत्र आणि त्याच्या आधीन असणारा जीव हें तत्त्व उत्तम रीतीनें दासांनीं या पद्यांत प्रतिपादिलें आहे.

यशोदामातेचें भाग्य-यशोदेचें भाग्य वर्णन करतांना गोपी म्हणते-'हे यशोदे तूं किती भाग्यवान्! अशा मुलाला तूं नित्य पाहतेस, खेळवतेस, त्याचें कौतुक करतेस ना? किती सुंदर हा राजगोपाल आहे! या सरसिजनाभास सहज पहातांक्षणींच सर्व दुरितें पळून जातात. त्याचें भावपूर्ण बोबडे बोल एकदांच ऐकिलें तरी परम संतोष होतो. या परब्रह्माशीं खेळायचें, नानाक्रीडा करायच्या, तर गावांतील सर्वांची आम्हांला भीति वाटते! पण आम्ही अरण्यामध्यें केलेल्या अनंतविध

क्रीडांची सर, हे इंदुवदने ! कशाला तरी येईल काय ? आमचा प्राणाधीश, सगुण, साकार, परब्रह्म अशा पुरंदर विठ्ठलाला हे यशोदे ! मी कधींतरी सोडीन काय ? ( यंथा पुण्यवे निन्न ? । यंथा भाग्यवे गोपि ?–केव्रढंग, पुण्य तुझं ? )

यशोदा माता बाळकृष्णाला घांस भरवीत आहे, आणि तो घांस घेत नाहीं. या प्रसंगावर दासांनीं अत्यंत सुंदर असें काव्य केलें आहे. यांत प्रसाद भरला आहे. कृष्णलीलेचें अवीट वर्णन आहे. ' देव भावाचा भुकेला ' असतो, हें तत्त्वही त्यांत अनुस्यूत केलें आहे. मराठी अनुवादच खालीं देत आहे.

: उणलोल्लि येको कंद ? :

[ राग–कालिंगडा ]

कां रे घांस घेइनास, जेविनास ? श्रीनिवास ! ॥ धृ० ॥
तुज दुर्मुखदर्शनची । घडलें कां उठतांची ? ।
वा कवण्या पापिणिची । झाली नजर बालकास ? ॥ १ ॥
पूतनिस्तनविषबाधा । बाधलि कां गोविंदा ? ॥
वा राधा अधरसुधा–पिउनि तृप्त जाहलास ? ॥ २ ॥
सवंगड्यांचा वनिं काला । खाल्ला तो बहु झाला ? ॥
वा चोरुनि गोपाला ! । भक्षियलें गोरसास ? ॥ ३ ॥
बहुविध नैवेद्य तुला । भक्तांनीं अर्पियला ? ॥
खाउनियां तो धाला । श्रीपुरंदरविठल खास ! ॥ ४ ॥

## २२ गोपी-गीत-रासक्रीडा-भक्तीची परमावधि :

पुरंदरदासांनीं, कबीरदास, सूरदास, नामदेव, एकनाथ इत्यादि संतांप्रमाणें कृष्णलीलांवर विपुल सुरस पद्यरचना केली आहे. ती वाचतांना, गातांना, ऐकतांना मन तल्लीन होतें. एक, दोन पद्यांचाच थोडक्यांत सारांश आम्ही देत आहों.

एक गोपी यशोदामातेकडे येऊन खोडकर कृष्णाच्या तक्रारी सांगते, ' हे यशोदे, तुझा हा लाडका कृष्ण किती दुष्ट आहे म्हणून सांगूं ! ब्रह्मदेवाच्या सृष्टीमध्यें इतका चेष्टेखोर मूल आम्ही तरी पाहिलें नाहीं ! हळूं हळूं चोर पावलांनीं येतो ! तंग कंचुकीची गांठ सोडून यथेच्छ स्तनपान करतो ! कांहीं तरी बोध दे याला. आम्हाला गावांत राहूं देणार आहांत कीं नाहीं ? आम्ही गांव सोडून जाऊं, ग, पण हा तुझा खोडकर किशोर आमची पाठच सोडीत नाहीं ! आमचीं वस्त्रें हरण करून हंसत मुरलीनादामध्यें रंगून जातो. अशा याच्या विचित्र चेष्टा पाहिल्या तर आमचे पती काय म्हणतील ? ते या उद्दंड पुरंदर विठ्ठलाची शेंडी धरून चांगलें पिटून काढतील त्याला !

[ यष्टु दुष्टन यशोदे–किती दुष्ट ग ? ]

केवढा चोर नी कपटी हा तुझा कृष्ण ! यशोदे ! हा कांहीं साधा बाळ नाहीं बरें ! अपरात्रीं येतो, सगळें लोणी खातो. संवगड्यांना घेऊन येतो. घरांत सगळीकडे हैदोस घालतो. अत्यंत

व्रात्य, पुंड, असा हा तुझा पुंडरीकाक्ष कृष्ण आहे ! असेल राजाचा कुमार ! ह्मणून काय त्यानें आह्मांला इतका त्रास द्यावा ? या पुरंदर विठ्ठलानें तर आह्मांला जन्मांतून उठवलें आहे ! आतां आह्मीं कांही इथें राहणार नाहीं. ( कोळिळगार निन्न कंद-चोर तुझा कंद )

'हे यशोदे, आह्मी गोकुळ सोडून जावें काय ? थोडा-तरी तुझ्या कृष्णाला आवर ! काय त्याचा दांडगेपणा ! घरीं येऊं दे, लोणी खाऊं दे, दंगामस्ती करूं दे, बरोबर संवगडी आणूं दे, पण हा साधा बाळ नाहीं बरं ! कुणालाही न सांपड-णारा हा चोर आहे. गोपिकांचीं वस्त्रें हरण करतो ! हळूंच गाईंच्या वासरांना सोडून देतो ! संसारी गोपींना त्यानें संसा-रांतून उठाविलें आहे ! त्याच्यावर विश्वासून या गोपबाला त्याच्या पाठीमागे लागत आहेत. या पुरंदरविठ्ठलाला चार उपदेशाच्या गोष्टी सांग ! ( गोकुलादोळगिरलारे वम्म-गोकुळांत नकोना राहूं बाई ? )

**: वेदव्यासप्रणीत गोपीगीत :**

श्रीभागवत पुराणामध्यें श्रीव्यासमहर्षींनीं गोपीगीताचा, आणि रासक्रीडेचा कथाप्रसंग अत्यंत तन्मयतेनें रेखाटला आहे. त्यांत भक्तिरस तुडूंब भरला आहे. नित्य पठणांत या गीतांचा समावेश होतो. ( जयति तेऽधिकं जन्मना व्रजः श्रयत इंदिरा साधु तत्रहि-दशमस्कंधः) हें गीत अत्यंत सुंदर, रसाळ आणि गेय आहे. तें निर्दोष, निरुपम, आणि प्रासादिक आहे. गोपींनीं कृष्णाला काय अर्पण करण्याचें शिल्लक ठेविलें ? 'हे कृष्णा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
दि. ..........

वृष्णिकुलोत्पन्ना ! या संसार भयाला भिऊन कीं रे ! तुला आह्मीं शरण आलों ! आह्मांला अशा असहाय स्थितींत टाकून इतक्या भयाण रात्रीं तूं कुठें निघून गेलास ? तुला नम्रभावानें शरण आलेल्यांचें पाप नाहींसें करणारा तूं ना ? [ पापकर्शनः ] त्यांचे मनोरथ पूर्ण करणारा तूंच ना ? तुझें कथारूपी अमृत भवतप्तजीवांचें कल्याण करणारें, आणि त्यांना शाश्वत सुख देणारें आहे. तूं अदृश्य झाल्यामुळें एक एक क्षण आह्मांला युगाप्रमाणें भासतो. गोपींनीं केलेल्या या स्तुतीकडे पाहिलें ह्मणजे त्यांची कृष्णाच्या ठिकाणीं अपार भक्ति दिसून येते. त्यांनीं आपले सर्वस्व श्रीकृष्णाला समर्पण केलें. हीच पराभक्ति नव्हे काय ? ही आत्मनिवेदनभक्ति ! हें अनन्य चिंतन ! या देवभक्तांच्या भावपूर्ण लीलांचें वर्णन जर संतांनीं केलें, तर तें दोषास्पद कसें ठरतें ?

सर्व रस, सर्व शब्द, सर्व विद्या, सर्व कला, ज्या जगन्नियंत्यापासून निघाल्या, त्या जगजन्मादिकारण अशा अचिंत्य गुणशक्तिप्रभूच्या महिम्याचें यथार्थ वर्णन कोणी तरी करूं शकेल काय ? ज्ञानी मुनिजनांना, ब्रह्मादि देवानां जिथें या प्रभूचें यथार्थ वर्णन करतां आलें नाहीं, तिथें पामर मानव ते काय करूं शकणार ? ( परो मात्रया ) श्रीकृष्णाच्या शृंगार चेष्टा या मानवाच्या चेष्टा नव्हेत, हें टीका करणाऱ्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. स्वपतीच्या हृदयांत वास करणारा जगत्पति ज्या गोपस्त्रियांना सांपडला, त्या खरोखरच धन्य होत !

मोक्षनिधान, मोक्षदाता, भवदुःखहर्ता ज्यांना मिळाला त्या गोपींचें आणखी कोणतें प्रिय व्हावयाचें राहिलें !

विस्तारभयास्तव या विषयावर विस्तृत विवेचन करण्याचें टाळावें लागत आहे. या अध्यात्ममार्गातील अमृतप्रवाहांत मज्जन करून भक्तिरूपामृतबिंदु सेवून, अनुभव घेतल्याशिवाय शाश्वत पदास पोंचविणाऱ्या अध्यात्म मार्गाची महती कळणार नाहीं. केवळ पांडित्याचा, परोक्षाचा अनुभव येण्याकडे काडीचाही उपयोग नाहीं. तेथें दासभाव पाहिजे.–'पापाचा क्षय झाला पाहिजे. अखंड नामस्मरण पाहिजे. परस्त्रीचा संग टाकला पाहिजे. विषयविषाची धुंदी चढविणाऱ्या कामक्रोधांना दूर लोटलें पाहिजे,' असा हितोपदेश करणारे संत रासक्रीडेंतील शृंगारचेष्टांचें वर्णन करतांना अत्यंत तन्मय होतात ! या त्यांच्या कृतीचा अर्थ समजून घेतला पाहिजे. सर्व अर्थ अध्यात्मपरच लावला पाहिजे. गोपींची भक्ति असामान्य होती. 'सात्वस्ति परमप्रेमरूपा।' असें भक्तीचें लक्षण सांगितलें आहे. भागवतामध्यें १ अपक्का, २ पक्कफलपा, आणि ३ पक्का, अशा भक्तीच्या तीन अवस्था वर्णिल्या आहेत. (भागवत स्कंध ७ अध्याय श्लोक ३६, ३७, ३८, पहा.) पक्का भक्ति हीच सर्व श्रेष्ठ भक्ति होय. श्रीहरीच्या लीला ऐकत असतांना त्याच्या भक्तांच्या कथा ऐकत असतांना, मनाला आनंद वाटणें, हास्य उत्पन्न होणें, हें अपक्क भक्तीचें लक्षण होय. भक्तीची ही पहिली अवस्था होय. त्याच्या पुढची अवस्था

म्हणजे तीमध्यें तल्लीन होणें, भक्तिभावनेचा उद्रेक होऊन उन्मत्ताप्रमाणें त्या भक्ताची अवस्था होणें, हें पक्कल्पा भक्तीचें लक्षण होय. याच्या पुढची अवस्था म्हणजे पक्वावस्था होय. श्रीहरीच्या कथा ऐकतांना सांगतांना तो भक्त हर्षोन्मत्त होतो! त्याचे नेत्र भरून येतात! सर्वांग रोमांचित होतें! तो मोठमाठ्यानें ओरडतो! तारस्वरांत गायन करतो! नाचतो! रडतो! [ उच्चतयैव गायति, रौति, नृत्यति च ] पिशाच्चबाधा झाल्याप्रमाणें [ ग्रहग्रस्त ] वृथा शब्द करतो! हंसतो, चिंतापर होतो! ध्यानमग्न होतो! दिसेल त्या माणसाला पुनः पुनः वंदन करतो! परमात्म चिंतनांत निमग्न होऊन, हे हरे! हे नारायणा! हे जगत्पते! असें विलज्ज होऊन ओरडत असतो!

अशा भक्तालाच जीवन्मुक्त ह्मणतात. त्यालाच दिव्य दृष्टीनें श्रीहरीचें बिंब दृग्गोचर होतें. अशाचाच जन्म सफल होय! तोच जगतांत वंद्य होय! तोच अपरोक्ष ज्ञानी होय! जो अभक्त आहे त्याचा जन्म पाषाणसदृश व्यर्थ होय! (अश्म-सारम् ) अशा जन्माला धिक्कार असो!

वरील कसोटी जर गोपींना लाविली तर त्यांची भक्ति पराकोटीची होती, यांत तिळमात्र तरी शंका घेण्यास जागा आहे काय? कृष्णदर्शनोत्सुक गोपी धाय मोकलून रडत होत्या! त्यांची वृत्ति कृष्णमयी बनली होती! सारखा त्यांना कृष्णाचा ध्यास लागला होता! ( रुरुदुः सुस्वरं राजन्! कृष्ण दर्शन लालसाः ) आपलें सर्वस्व ज्या गोपींनीं परमपुरुषाच्या

चरणीं वाहिलें त्या गोपस्त्रियांचें वर्णन कोणत्या शब्दांनीं करावें? सर्वसमर्पण सेवा ती आणखी कोणती? आणि संतांनीं या रासलीलेचें वर्णन तन्मयतेनें केलें तर यांत दोषास्पद तें काय?

## २३ दासांची निर्भयता :

जगांत जर कांहीं कठीण असेल तर सत्य बोलणें. कठोर कोणतें असेल तर सत्य. भयप्रद! कोणतें असेल तर सत्य. दास निर्भय झाले; निःशंक झाले, निजसत्य त्यांना सांपडलें, मग जगांतील व्यावहारिक गोष्टींची त्यांना काय पर्वा? म्हणून ज्यानें सच्चिदानंदात्मक परमेश्वराला, परब्रह्माला वश केलें, त्याला जगांतलें कोणतें भय भीति दाखवील? दास म्हणतात– 'कोणाचा रोष होवो अगर तोष होवो, शेषशयन श्रीरंगाच्या पादारविंदीं आमचें मन कायमचें जडल्यावर कोणाची कशाकरितां जरूरी आहे! आईबापांनीं आमचें अनहित केलें; स्त्रीपुत्र, आप्त, यांनीं झिडकारिलें, बरोबरीच्या मित्रांनीं द्वेष केला; राजानें हद्दपार केलें; घोर अरण्यामध्यें भयंकर क्रूर, हिंस्र पशूंनीं अडविलें, अंधारामध्यें भूत-पिशाच्च अंगावर आलें, काळसर्पानें पायांस विळखा घातला, कृमिकीटकांनीं देहाला दंश करून पीडिलें; शुक्र, शनि, मंगळ, इत्यादि ग्रह अत्यंत प्रतिकूल असले; इतक्या सर्व गोष्टी असल्या तरी पुरंदरविठ्ठलाच्या भक्ताला कळिकाळाचीही भीति वाटत नाहीं. (आरुवलिदरेनु? नमगिन्यारु वलिदरेनु?)

सदर पद्यांत ईश्वरभक्तीनें भक्तांस कशी निर्भयता प्राप्त होते हें सांगितले आहे. 'भयकृत् भयनाशनः' असें परमेश्वराचें वर्णन आढळतें (विष्णुसहस्रनाम). ईश्वरावर संपूर्ण विश्वास, तो नियंता, भवदुःखहर्ता, ब्रह्मांडनायक, सर्व प्रेरक, सर्व सत्ताधारी एकमेवाद्वितीय, असें तें परब्रह्म आहे; अशी पराकोटीची श्रद्धा पाहिजे. आणि अशा करुणाकराची करुणा झाल्यावर, जीव निर्भय, निःशंक, श्रद्धायुक्त बनतो, यांत काय नवल?

## २४ दासांची स्पष्टोक्ति आणि हितोपदेश :

हरिभक्त कधीं विफल बोलत नाहींत. त्यांचें भाषण आचरणाप्रमाणेंच आदरणीय, पथ्यकर, सार्थ आणि त्रिकाल सत्य असतें. कसलीही ऐहिक लालसा नसणारे, स्वार्थनिरपेक्ष असे ते असतात. लोकांना हितोपदेश करणें, त्यांना ज्ञानी करणें, हेंच त्यांचें जीवितकार्य होय. आर्त, मुमुक्षु, आणि जिज्ञासु जनांचे ते आधार असून अध्यात्म मार्गावरील ते दीपस्तम्भच होत. प्रस्तुत प्रकरणामध्यें दासांची निरनिराळ्या विषयांवरील स्पष्ट मतें, आणि विचार, यांचा गोषवारा सांगून त्यांनीं प्रसंगानुरूप केलेल्या उपदेशांचेंही सारकथन आम्हीं करणार आहों. दासांनीं अनेक ठिकाणीं संचार केला होता. त्या प्रसंगांतून स्वतःला आलेल्या नाना अनुभवांचें मंथन करून जनताजनार्दनापुढें त्यांनीं, भक्तिभावानें, समर्पण केलेलें अमृततुल्य नवनीत मी वाचकांपुढें ठेवीत आहे. जन्माचें सार्थक करण्यास याचें सेवन हाच योग्य मार्ग नाहीं काय?

## : उदर वैराग्य :

'उदर निमित्तं बहुकृतवेषम्' असा या त्रिगुणात्मक जगाचा व्यवहार आहे. धर्माच्या नांवाखालीं, दांभिक, आणि संधिसाधू, स्वार्थी व्यवहाराचें कपट नाटक करणारांवर दासांनीं चांगलेच कोरडे ओढले आहेत. पण या उक्तीमध्येंही त्यांची ईशभक्ति, आणि मानवांस सन्मार्गगामी करण्याची तळमळ दिसून येते. कानडी भाषेंत सदर पद्य अत्यंत प्रसिद्ध असून तें सर्वतोमुखी झालेलें आहे. नेहमीं ते आकाशवाणीवरही गातात. त्याचा पद्यमय अनुवाद खालीं देत आहे.

[ उदरवैराग्य विदु, नम्म पदुमनाभदलि लेश भकुतिविल्ल ]

चाल–सदर. राग–पूर्वि अट्टताल

'उदरवैराग्याचि हें ॥ लेश न भक्ती प्रभुपदकमलीं ॥ धृ० ॥
शीतोदकिं अरुणोदयिं स्नाना करुनि नियम वरि दावितसे ॥
अंतर्यामीं मदमत्सरविष भरुनि निंद्य बहु कर्म करितसे ॥ १ ॥
स्मरणीची ती जपमाला करिं, मुखावरुनि पट पांघरुनी ॥
योगनिष्ठता दावि जनां, परि परधनकांता चिंतितसे मनीं ॥२॥
कांसे, पित्तल, ताम्र धातुंच्या मूर्ती जमवुनि बहुविधसें ॥
दीपावलि लखलखाट करुनी अर्चन शोभा ती दावितसे ॥ ३ ॥
जादू, टोणा, ताइत, दोरे, भूतोच्चाटण मंत्रांचे ॥
प्रयोग करुनी फसवि जनाला नटसम मुरडी ! ज्ञान न साचें ॥४
मी माझें या ममत्व नरकीं पडुनि, वरी हा दंभाविधी ॥
दाविसि, यानें कैसा होईल प्रसन्न पुरंदरविठल कृपानिधी ? ॥५

: संपत्तीचा माज :

मनुष्य लक्ष्मीचा दास झाला म्हणजे तो उन्मत्त होऊन अविचारानें नाना पापकर्में करतो. अशा माणसाला उद्देशून दास म्हणतात–' हे भल्या माणसा, उन्मत्त होऊं नको बरं ! अधिकारमदानें तूं फार ताठला आहेस ! नित्य गोरगरिबांना गुरकावीत असतोस. पण लक्षांत ठेव; दैवयोगानें तूं जर अधिकारच्युत झालास तर अंगावर कंडू उत्पन्न करणारी खरूज टवकारीत तुला बसावें लागेल ! लक्ष्मीकृपेनें नित्य तूं षड्रस अन्न भक्षण करीत असतां अतिथींना मात्र दूतांकरवीं दंडेली करवून बाहेर घालवतोस ! पण दैवाची वक्रदृष्टि झाली, आणि तुझ्या घरीं अक्काबाईचा फेरा आला, तर मग मात्र तुला अन्नासाठीं दारोदार वणवण फिरावें लागेल. व्यापार साधला म्हणून तूं अपहार करतोस. पण लोक मात्र तुला नाना-परीनें शापतात ! हे मूढा ! लक्षांत ठेव. पुरंदरविठ्ठलाच्या न्याय सभेंत ज्यावेळीं तूं जाशील त्यावेळीं मात्र तुला खरोखर कठोर शासन मिळेल ! ( कोब्बिरलु बेडवो हे मनुज ! )

: गुरुची आवश्यकता :

गुरवो बहवः सन्ति शिष्यवित्तापहारकः ।
दुर्लभः स गुरुर्लोके शिष्यचित्तापहारकः ॥

प्रत्येक सांप्रदायामध्यें गुरूचें महत्त्व वर्णिलें आहे. वेदशास्त्रपुराणें यामध्येंहि नानापरीनें, कथा, संवाद, नीति या निमित्तांनीं गुरूची महति वर्णिली आहे. प्रत्यक्ष प्रभूनीं

आपल्या रामकृष्णादि अवतारांमध्यें गुरु केल्याचा उल्लेख आहे. व्यवहारामध्यें जशी हरप्रसंगीं आपल्या अभ्युदयासाठीं कोणा तरी श्रेष्ठाची जरूरी भासेत, तशी भवभयाची बाधा-झालेल्यांना, भवरोगवैद्य अशा संतसद्गुरूंची पण अत्यंत जरूरी असते. त्याच्याशिवाय हा भवताप शांत होणार नाहीं. शिष्यांच्या चित्ताचा ताप हरण करणारा, त्यांना सन्मार्ग दाखविणारा, मोक्षपथावर नेणारा, आणि श्रीहरीचें साक्षात् दर्शन घडविणारा, जो कोणी असेल तोच सद्गुरु होय. अध्यात्ममार्गावर श्रद्धा ठेऊन भक्तिभावानें शुद्धाचरण करणारे जे सज्जन आहेत तेच हा सनातनधर्माचा मार्ग अनुसरतात. श्रीज्ञानेश्वर, रामदास आदि अनेक संतांनींही गुरूची थोरवी सुंदर शब्दांनीं वर्णिली आहे. आधुनिक कांहीं तत्त्वज्ञानी आणि अनुभवशून्य वावदूक गुरूची कांहींच जरूरी नसल्याचा, एवढेंच नव्हे, तर तो प्रगतीच्या मार्गांत अडथळा असल्याचा दावा मांडतात. हें कितपत योग्य आहे तें मुमुक्षु वाचकांनींच ठरवावें. त्याचें निराकरण करण्याचें हें स्थळ नव्हे.

दासांनीं गुरूची महती खालील पद्यांत मोठ्या कळकळीनें वर्णन केली आहे.

‘ गुरूचा गुलाम झाल्याशिवाय, अरे बाबा ! मुक्ति मिळणार नाहीं ! अनेक शास्त्रांचें पठण केलेंस तरी ती तुझी भक्ति व्यर्थ होय ! षट्शास्त्रांचें पठण केलें, सर्व अष्टादश पुराणें वाचलीं, सर्व तऱ्हेचे न्याय, कथा वाचल्या, ऐकिल्या, तरी

कांहीं उपयोग नाहीं. गळ्यांत तुलसी-माला घातली, हातांत जपमाळ घेतली, सर्वांगाला भस्माचा लेप करून भुवनसंचार केला, तरी त्याचा उपयोग नाहीं. देहदण्डण करून, स्त्रीभोगापासून अलिप्त राहिलास तरी, 'मारहर' अशा आमच्या पुरंदरविठ्ठलाला वश केल्याशिवाय कांहीं उपयोग नाहीं. याच्या साठींच तुला गुरूचा दास झालें पाहिजे.

( गुरुविन गुलामनागुव तनका )

: मुक्ति केव्हां मिळते ? :

साक्षात्कार झाल्याचा भास आणणारे, क्वचित्कारणाने, अल्पस्वल्प सिद्धि प्राप्त होतांच गुरुपद भूषवूं इच्छिणारे, आपण ईश्वरकृपेस पात्र झालों असें समजणारे, अगर योगमार्गांतील नाद, प्रकाश, स्फुरण इत्यादि प्रक्रिया साध्य झाल्या ह्मणजे, सर्वस्व हातीं आलें, सहस्राधार चक्रामध्यें कुंडलिनीनें प्रवेश केला, सर्व साधलें, असा गैरसमज करून घेणारे, किंवा अहंकारानें ताठणारे असे जे अनेकविध लोक आहेत त्यांना दास खडसावून बजावतात.

'मुक्ति काय फुकट मिळते ? आणि ती आमच्या आदिकेशवाची दया होण्यापूर्वीं ? पहा, तुझें अंतरंग तपासून पहा. खालील गोष्टी तुला साध्य झाल्या आहेत कां ? मनांत दृढविश्वास असला पाहिजे. दुर्जनसंगापासून दूर असलें पाहिजे. अनुमानांचा त्याग केला पाहिजे. श्रीहरीला तन, मन, धन सर्व समर्पण केलें पाहिजे. कामक्रोध संपूर्णपणें टाकले पाहिजेत.

हरिनामसंकीर्तन केलें पाहिजे. कनकाची आशा सोडून हरीच्या पादारविंदीं आपलें मन स्थिर केलें पाहिजे. मदांधकाराचा त्याग केला पाहिजे. अज्ञानरूपी अरण्य जाळलें पाहिजे. निंदा केली तरी आनंद मानला पाहिजे, हर्षित झालें पाहिजे; आणि राग आलाच तर गिळला पाहिजे. श्रीहरि सर्वोत्तम आहे. तो पूर्ण आहे. असें निश्चितपणें मानिलें पाहिजे. वडिलांना पाहतांच हर्ष झाला पाहिजे. देह हा अस्थिरच आहे, तो स्थिर नाहीं, असें मानिलें पाहिजे; आणि परांच्या वस्तूपासून अलिप्त राहिलें पाहिजे. पापांचा निरास केला पाहिजे. ज्ञानदीपाच्या प्रकाशांत हिंडलें पाहिजे. आणि आमचा करुणासागर पिता जो पुरंदरविठ्ठल त्याला भक्तीनें वश केलें पाहिजे. ( सुम्मने बाहोदे मुक्ति नम्म चन्नादे केशवन दयवागदनक )

## : योग आणि कुंडलिनी :

मुक्तीसाठीं जशीं वरील पथ्यें सांभाळण्यास दासांनीं बजावलें आहे; तसेंच कुंडलिनी शक्तीचा अभ्यास करणाऱ्या साधकांवरही दासांचा असाच कटाक्ष आहे. योगमार्गाचा अवलंब करणारे साधक प्राचीन काळींही होऊन गेले; आणि दहा वर्षांपूर्वीं समाधिस्थ झालेले योगी श्रेष्ठ अरविंद बाबू आणि सांप्रतकाळीं त्या मार्गाचें आचरण करणारे अनेक साधक या मार्गाचा प्रसार करीत आहेत. गीतेमध्यें तर सहाव्या अध्यायांत योगमार्गाचेंच वर्णन आलेलें आहे. भगवान् श्रीकृष्णांनाच योगेश्वर म्हणतात. भक्ति, ज्ञान, योग हे मार्ग आपआपल्या

परीनें श्रेष्ठ आहेत; आणि ते एकमेकांस पूरक आहेत. श्रीज्ञानेश्वरांनीं तर कुंडलिनी शक्तीचें बहारदार वर्णन केलें आहे. परंतु सांप्रदायिक साधक भक्तीचीच कांस धरितात, आणि प्रवचनकार हा अध्याय निमूटपणें गाळतात. हा अध्याय म्हणजे अनुभवाचें सारच होय.

हा विषय तात्त्विक व अनुभविकांचा असल्यानें हटयोग, ज्ञानयोग, राजयोग इत्यादि अनेक प्रकार त्यांत असल्यानें विस्तारभयास्तव या विषयांवर लिहिणें टाळावें लागत आहे. फक्त गीतेंतील एका श्लोकाचा उल्लेख करून दास काय ह्मणतात तें सांगणार आहे.

श्रीकृष्णांनीं अर्जुनास, 'योगी हो,' असा आदेश दिला. कारण तपस्वी, ज्ञानी, कर्ममार्गी यांपेक्षां योगी श्रेष्ठ आहे. इतकें सांगितल्यानंतर भगवान् अर्जुनाला ह्मणतात—

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥

अत्यंत श्रद्धेनें माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर करून जो मला भजतो तोच योगी मला अत्यंत प्रिय होय, असें भगवंतानीं स्पष्ट ह्मटलें आहे. योगिजनांच्या हृदयामध्यें परमेश्वर नित्य वास करतो, 'योगिनां हृदये नित्यम्' ( लक्ष्मीहृदय-अथर्वणरहस्य ) या उक्तीचा अर्थ, सर्व भूतांतर्यामीं पूर्ण ब्रह्म असा ईश्वर त्यांच्या ठिकाणीं प्रकटरूपानें असतो; इतरत्र तो अदृश्य असतो. याचाच अर्थ, 'अर्चकस्य तपोबलात्' या

न्यायानें त्या ठिकाणीं त्याला देवपणा आलेला असतो, जागृति आलेली असते. भक्तिसामर्थ्याच्या अभावीं इतर जनांना ईश्वरी-सामर्थ्याचा साक्षात्कार होत नाहीं आणि ईश्वराचें अस्तित्व त्यांना ज्ञात होत नाहीं, असो.

: दास ह्मणतात :

( पिंडांडदोळगिन गंडन काणदे; मुंडेयरादरु पंडितरु )

'अरेरे ! हे सर्व पंडित लोक पिंडांडांमध्यें वास कर-करणाऱ्या जगत्पतीला न पाहतां अज्ञपणानें मुंडन केलेल्या विधवेप्रमाणें झाले काय ? कुंडलीशयन अशा पुंडरीकाला आपल्या हृत्पुंडरीकामध्यें न पाहतां, त्याला न भजतां, हे पंडित लोक विवेकभ्रष्ट झाले काय ? मूलाधारादि षट्चक्राचें भेदन केलें नाहीं, नाद उत्पन्न झाला नाहीं, बिंदुमात्र प्रकाशाचें दर्शन झालें नाहीं; नाडीचें शोधन करून अमृत पान केलें नाहीं; असें असतांही हे मनुजा ! वृथा पांडित्याचा अभिमान बाळगून सभेमध्यें वाद करतोस, हें योग्य आहे काय ? एकाचा तरी तुला अनुभव आला आहे काय ? ॐ कार नाद उत्पन्न झाला आहे कां ? अनुभव न घेतां वेदान्त तत्त्वें कशाला पठण करतोस? वायुवेष्टित कुंडलिनीला ( सार्पिणी ) शिवत्रिपुटीमध्यें ( आज्ञा चक्रामध्यें ) स्थिर न करतां, भवरोगवैद्य अशा सर्वभुक् पुरंदरविठ्ठलाचें ध्यान न करतां, त्याचें स्मरण न करतां, वृथा योगावडंबर कां माजवतोस ?

'हे नरा ! या चराचराचा स्वामी असणाऱ्या श्रीहरीला तूं अंतश्चक्षूंनीं पहा. षट्चक्रकमलांची तूं शुद्धि कर. ईषणात्रयाला

जिंकून ( अधिकार, द्रव्य, कीर्ति ) सुषुम्ना चढून जा; आणि आज्ञाचक्राचें द्वार भेदून परब्रह्माचें दर्शन घे. वायूचें स्तम्भन करून अनिमिषनेत्रांनीं वर पहा. नतर उत्पन्न झालेल्या नादाचें यथेच्छ श्रवण कर; आणि नारायणासमोर नवविधभक्तींत रंगून प्रेमभरानें नृत्य कर. तो नारायण भानुमंडळांत वास करणारा असून या विश्वांत अनेकविध क्रीडा करणारा असा आहे. जगाचा रक्षणकर्ता असा तो श्रीपुरंदरविठ्ठल या कुंडलिनीच्या अग्रभागीं राहतो ’ ( कण्णिनोळगे नोडो हरिय )

नाऽहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये तथा ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥

‘ मी वैकुंठामध्यें रहात नाहीं, अगर योग्यांच्या हृदयामध्येंही वास करीत नाहीं. तर हे नारदा ! जेथें माझे भक्त माझें गायन करतात, माझे भजन करतात, तेथें मी राहतों, ’ असें स्पष्ट श्रीविष्णूंनीं नारदाला सांगितलें आहें. यावरून परमेश्वराला भक्तीच अत्यंत प्रिय आहे, हें सिद्ध होत नाहीं काय ? प्रेम, श्रद्धा, भक्ति, ज्ञान, वैराग्य आणि उत्कट भक्ति-ज्ञानोत्तर भक्ति ( पक्काभक्ति ) अशी भक्तींची श्रेणी कल्पिली तर योग, अगर मुक्तिसोपानाला नेणारा कोणताही मार्ग, यांचा अंतर्भाव यांत होत नाहीं काय ? भक्त्यैव तुष्टिमभ्येति विष्णुर्नान्येन केनचित् ! [ भारत तात्पर्य निर्णय ] या वचनानुसार केवळ भक्तीनेंच ईश्वर संतुष्ट होतो हेंच सिद्ध होत नाहीं काय ?

## : संसाराची चिंता :

भोजनाच्छादने चिंता वृथा कुर्वन्ति जन्तवः ।
योऽसौ विश्वंभरो देवः स भक्तान् किमुपेक्षते ॥

—कृष्णामृत महार्णव.

वरील वाक्य शौनक ऋषींच्या तोंडचें आहे. ऋषि ह्मणतात—' सारेजण निष्कारण भोजनाच्छादनाची काळजी करतात. अखिल विश्वाचें पोषण करणारा हा श्रीहरि आपल्या भक्तांची कधींतरी उपेक्षा करील काय ! ' अनन्य भावानें जो माझें चिंतन करील त्याच्या भक्तियुक्त उपासनेला संतुष्ट होऊन त्याची सर्वदा सर्व प्रकारें मी काळजी वाहतों ' ( अनन्याश्चितयंतोमाम्‌—गीता ) असें प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला स्पष्टपणें सांगितलें आहे. अशाप्रकारें ईश चिंतनांत निमग्न राहून सर्व प्रकारची चिंता परमेश्वर वाहतो, असा दृढतम विश्वास मनांत ठेवून त्या प्रमाणें वर्तन करणें ह्मणजे अध्यात्ममार्गावरील मोठा टप्पा गांठणें होय. प्रपंचामध्यें मनाचा समतोलपणा राखणें अत्यंत कठीण असतें. तुकाराम महाराज आरंभापासून अखेरपर्यंत दरिद्रीच राहिले. कसल्याही प्रकारची अभिलाषा त्यांनीं धरली नाहीं ! परंतु त्यांच्या मनाची शांति ढळली नाहीं ! आनंद मावळला नाहीं ! चिंता कधींच केली नाहीं ! तसेंच दास ! नवकोटनारायण ! सर्वसंपत्तीवर तुळसीपत्र ठेवून ते बैरागी बनले ! परमेश्वरच सर्वांची काळजी वाहणारा आहे; आपला अभिमान खोटा आहे; प्रेम, माझेपणा

या गोष्टी खोट्या आहेत, असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें, आणि ते देवाला अनन्य भावानें शरण गेले! त्यांना कांहीं उणें असें वाटलें नाहीं ! त्यांचें समाधान भंगलें नाहीं ! सांसारिक व्यामोह सोडवणारा, शाश्वत सुखाची जोड देणारा असला अनुपम अनुभव आपणाला जर ईश चिंतनानें आला ! तर मग सर्व लोकांना तो कां येऊं नये ! आलाच पाहिजे. परंतु शेणांतले किडे शेणांतच सुख मानतात, त्याप्रमाणें हे मानव दुःखमय संसारांत सुखाची आशा करीत वणवण हिंडतात! त्यांना सन्मार्ग दाखवावा या बुद्धीनें दासांनीं अनेक दाखले देऊन परोपरीनें बोध केला आहे.

‘ स्त्री, क्षेत्र, आणि धन, यांपैकीं कोणती गोष्ट तुझ्या हिताची आणि सुखाची आहे! दुसऱ्याच्या घरीं जन्म पावलेली! अशा अंगनेला आणून आपली गृहस्वामिनी करायची ती स्वतःला तर अर्धांगी मानते ! पण हे भल्या माणसा ! तूं कालवश झालेला पाहून ती भिऊन लांब पळते! तिच्यापासून तूं सुखाची आशा करतोस ! सार्वभौमपद तुला प्राप्त झालें! आणि अनेक राजवाडे तूं बांधलेस, आणि स्वतःच्या ऐश्वर्याचा आणि अधिकाराचा तुला अभिमान वाटला ! तुझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं ! परंतु तुझ्या देहांतून प्राण निघून गेला कीं तो तुझा प्रिय देह गांवाबाहेर, दूर स्मशानांत नेऊन जाळतात ! हें तुला कळतें ना ? अनेक कारस्थानें करून, राज सेवा करून, परद्रोह करून, नाना रीतींनीं मिळविलेला पैसा,

हा तरी तुझ्याबरोबर येणार आहे कां ? मागें जिवंत असणाऱ्यांनाच त्याचें भोगसुख मिळतें ! पत्नी, मुलें, आणि बांधव, हे सारे दुःखालाच कारणीभूत आहेत. परलोकांत जातांना आपल्याबरोबर कीर्ति आणि अपकीर्ति, पाप आणि पुण्य, याच गोष्टी येणार आहेत. अस्थिर आणि नाशवंत देहाला मोहून आत्मघात करूं नको. चित्त शुद्ध करून, शांतपणानें, आणि भक्तिभावानें, पुरंदरविठ्ठलाचें ध्यान कर. म्हणजेच तुला शाश्वत सुखाची जोड देणारी मुक्ति लाभेल.
( आरु हितवरु निनगे मूरु मंदीगोळगे ? नारियो, धारुणियो, बलु धनद सिरियो ! )

'चिंते यातको ? बयल भ्रांति यातको ? ' या पद्यांत दास म्हणतात–मदनजनक अशा श्रीहरीच्या दिव्य नामाचा मंत्र जवळ असतांता तूं कां वृथा चिंता वाहतोस ? उदयकालीं आरवणारी कोंबडी आपल्या पिलांना दूध पाजवून त्यांचे पोषण करते काय ? घरी बाळंतीण होणाऱ्या बाईचा मात्र किती बडेजाव ! अरण्यांत प्रसवलेल्या मृग शिशूंची आणि त्यांच्या मातांची कोण काळजी वाहतो ! पाषाणाचे सुंदर मूल केलें तर तें पोटांत धरवेल कां ? मग ज्यानें दिलें त्यानें तें परत नेलें, तर एवढें आक्रंदून कां रडतोस ? आई मेली तर दाई रक्षण करतें ? वारुळांत वास करणाऱ्या सर्पशिशूंचे कोण रक्षण करतो ? एका पुरंदर विठ्ठलावर दृढ विश्वास धर. तो तुझा सर्व योगक्षेम वाहील.

मनुष्याला कोणती चिंता छळते? चोवीस तास माणसाला चिंता कशी जाळते, याचें फार सुंदर वर्णन दासांनीं खालील पद्यांत केलें आहेः—

( अनुगाल चिंतेयु मनुजरिगे )

जोंपर्यंत मन माधवाच्या पादकमलांचें ध्यान करण्यांत तन्मय होत नाहीं, तोंपर्यंत माणसाला चिंता अहर्निश छळते! कांता असली तरी चिंता, नसली तरी चिंता! रूपहीन भार्या मिळाली तरी चिंता! आणि जगांत अत्यंत देखणी अशी स्त्री लाभली तरी चिंता! ती निष्कलंक कशी राहील ही चिंता! मुलें झाली तरी चिंता! आणि नाहीं झाली तरी चिंता! द्रव्य असलें तरी चिंता, नसलें तरी चिंता! गरीबी असली तरी चिंता! श्रेष्ठपणा आला तरी चिंता! पण जर आमच्या पुरंदर-विठ्ठलावर संपूर्णपणें विश्वास ठेवला, तरच चिंता नष्ट होऊन मन निश्चित होईल.

: सोंवळयाचें स्तोम :

कर्णाटकांत आणि इतरत्रहि कर्ममार्गाचें आणि सोंवळ्या ओंवळ्याचें फारच बंड एके काळीं माजलें होतें. आणि आजही तें विशेषेंकरून दक्षिणेला जास्त आणि बाकी ठिकाणीं अल्पप्रमाणांत आढळून येतें. सर्व संतांनीं या अतिरेकाचा निषेध केला आहे. आणि सत्य मार्गाचें शोधन आणि आचरण करण्यास लोकांना आर्जवून सांगितलें आहे. या विषयांवर पुरंदर-दासांनीं सडेतोडपणानें आपले विचार मांडिले आहेत. त्यांनीं

केलेला सुंदर बोध जर प्रत्येकानें आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला तर परमार्थाचें श्रेष्ठ तत्त्व समजल्यासारखें होईल, आणि घरांघरांतील वातावरण शांत आणि प्रसन्न राहील. समाजाला चांगलें वळण लागेल; चित्ताची शुद्धता वाढेल.

: दास ह्मणतात :

‘ सोवळें [ मडि ] सोवळें ह्मणून उगाच तीन ताड कां उडी मारतोस ? दुसऱ्याचा स्पर्श झाला ह्मणजे तूं ओंवळा होतोस कां ? मूर्खा ! हें सोवळें तूं कोठून आणलेंस ? सोवळा ही तूंच आणि ओवळाही पण तूंच. जळो तुझें तें सोवळें ! अस्थि, चर्म, मलमूत्र यामध्यें मूर्खा तूं वास करतोस ? नव-द्वारांतून सारखे दुर्गंधाचे झरे वाहत आहेत ! आणि पुनः वर तूं सोवळा ह्मणून मिरवतोस ना ? जन्मल्याबरोबर सुतक, मृत झाल्यावर सुतक, आणि मध्येंच तुझें हें सोवळें कोठून आलें ? मूर्खा ! पापनाशिनी गंगेमध्यें चर्म धुतलें ह्मणजे कर्म नष्ट होतें काय ? स्नान केलें ह्मणजे ओवळें नाहींसें होत नाहीं. यांतलें मर्म समजून घे. निर्मल अंतःकरणानें श्रीपुरंदर विठ्ठलाचें ध्यान कर, आणि खऱ्या अर्थानें सोवळा हो.

माडि मडि यंदु मूर्मारु हारुति । मडि यल्लि बंते बिकनासी ॥

आणखी एके ठिकाणीं ते ह्मणतात—पावलोपावलीं उडी मारली ह्मणजे कां सोवळें झालें ? विश्वपालकाच्या पादकमलाचें ध्यान कर. तेंच खरें सोवळें. वस्त्र धुऊन वाळवून नेसलें ह्मणजे सोवळें होत नाहीं. पोटांतील काम, क्रोध, मद, मत्सर प्रथम

१०

नष्ट कर. हेंच खरें सोवळें. पापाला न भितां दुसऱ्याच्या मनाला दुष्ट शब्दांनीं दुखवून वर पुण्य करण्याचा आव आणणें, हें काय सोवळें ह्मणायचें? आपण यथेच्छ भोजन करायचें आणि क्षुधित अतिथीला वाटेला लावायचें! हें तुझें सोवळें काय? वडीलधारे गुरु आणि हरिदास यांच्यावर प्रेम, आदर ठेवून, अनन्य भावानें पुरंदर विठ्ठलाचें स्मरण कर. तेंच खरें सोवळें बरें! ( मडि मडि मडियेंदु अडिगडिगहारुव ) दासांना सोवळ्याचा अतिरेकीपणा अजीबात पसंत नव्हता हें यावरून स्पष्ट होतें. अंतरंग निर्मल करून भक्तिभावानें ईश्वरास शरण जाऊन आत्महित करून घ्या. असाच त्यांच्या ह्मणण्याचा भावार्थ आहे. यावरून बाह्य सोवळें करणाऱ्या कर्मठांनीं दासांचा आषय लक्षांत घेणें इष्ट नाहीं काय?

## : मोक्षमार्गांतील पाथेय :

मोक्षाचा मार्ग आक्रमीत असतांना कोणत्या गोष्टींची तयारी केली पाहिजे, कोणतें पाथेय बरोबर नेणें अवश्य आहे, हें रूपकाच्या दृष्टीनें दासांनीं अत्यंत सुंदर रीतीनें वर्णिलें आहे. मुमुक्षूंना त्यापासून चांगला बोध होऊन उत्तम मार्ग-दर्शन मिळेल. नाहीं तरी, जननमरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घ्यायची आणि शाश्वत सुखाच्या कैवल्यधामांत आनंद-मग्न राहावयाचें, ह्मणजे बरीच तयारी करणें अगत्याचें नाहीं काय?

( राग-रेगुप्पी-आदिताळ )

बुत्तिय कट्टो। मनुज बुत्तिय कट्टो॥
बुत्तियन्नु कट्टिदरे। एत्तलादरु उणबहुदु॥

'हे मानवा, तुझ्याबरोबर चांगल्या पाथेयाचें गांठोडें बांधून घे. हें पाथेय तूं बरोबर घेशील तर, तुला मार्गांत इच्छा होईल तेथें भोजन करितां येईल. धर्मरूपी पात्रामध्यें शुद्ध मनरूपी गंगाजल भरून घे. सुमनरूपी अग्नी चेतव आणि स्थिर चित्तरूपीं अन्न तयार कर. नंतर ज्ञानरूपी वस्त्र पसर आणि अत्यंत विरक्तिपूर्वक आणि भक्तिपूर्वक तें श्रीहरीला समर्पण कर. या प्रमाणें जगत्कर्ता अशा श्रीपुरंदर-विठ्ठलाचें परमतत्त्वरुपी अन्न, जवळ ठेवून नित्य भक्षण कर आणि तृप्त हो. मोक्षाचा भागीदार हो.

## : जगाचा व्यवहार :

अनेकविध विषयांवर उपदेशानुरोधानें प्रसंग साधून दासांनीं विपुल पद्यरचना केली आहे. सर्व तऱ्हेच्या उपदेशाचें आणि विचाराचें सारच काढावयाचें झालें तर एवढेंच ह्मणतां येईल कीं, सर्वांना सत्प्रवृत्त करून चुकलेल्यांना अध्यात्म मार्गावर पुनः आणून सोडणें, आणि चिकित्सक पढीकांना भक्तिमार्गाचे पाईक करून सोडणें, हाच उदात्त हेतु दासांचा होता; आणि त्यासाठीं अनेक ठिकाणीं संचार करून आपल्या गोड प्रासादिक, भक्तिपर आणि काव्यमय गीतांनीं सर्व लोकां-नाही त्यांनीं या परमार्थ मार्गावर येण्याचा आदेश दिला आहे. यांतील दोनचार पद्यांचा थोडक्यांत सारांश देत आहे. नानाविध लोकव्यवहार पाहून केव्हां दास खिन्न दिसतात, केव्हां ते उपरोधिक हंसतांना दिसतात, केव्हां ते कठोरपणें टीका

करितांना दिसतात, केव्हां चंद्रापेक्षांही शीतल उपदेशामृताचा मधुर शिडकावा करितांना दिसतात.

हा ! हा ! हा ! हा ! मानव हिगेके केट्टी । हरिभजनिय बिट्टी ॥

'अरेरे ! मानवा ! इतका तूं कसा चळलास ! हरीचें भजन कां सोडिलेंस ! थोर मनुष्य जन्म, जन्म-जन्मांतराच्या पुण्याईनें मिळाला, तो कां वाया घालविणार ! देहाची चिंता ! धन, धान्य, कांता इत्यादींची चिंता ! उदरभरणाची चिंता ! अरे बाबा ! पुरंदरविट्ठलाचें अखंड चिंतन करशील तर या साऱ्या चिंता दूर होतील.'

एल्लरू माडवदु होट्टिगागी गेणु बट्टीगागी ।
सिरिवल्लभन भजिसिवदु मुक्तिगागी ॥

'सर्वजण जे अहोरात्र व्यवहार करतात ते एका टीचभर पोटासाठीं आणि वीतभर वस्त्रासाठीं ! परंतु श्रीवल्लभाचें भजन मात्र मुक्तिसाठीं होय ! पालखी वाहून न्यायची पोटासाठीं ! आणि मोठ्या मल्लाबरोबर कुस्ती खेळायची पण पोटासाठीं ! खोटें बोलावयाचें पोटासाठीं ! श्रीवल्लभाचें ध्यान मात्र मुक्तीसाठीं. मोठेपणा मिरवावयाचा पोटासाठीं ! गज-तुरंगांवर आरोहणही पोटासाठी ! पापें करावयाचीं पोटासाठीं ! श्रीहरीचें भजन मात्र मुक्तीसाठीं. डोंगर चढून जायचें पोटासाठीं ! कंठ फुटेपर्यंत हाकारायचें पोटासाठीं ! परंतु आमच्या पुरंदर विठ्ठलाचें मोठ्या तन्मयतेनें आणि निलज्जपणें केलेलें ध्यान मात्र मुक्तीसाठीं.'

कोती हागे नी कुणदाड बेड । रीति मार्गव हिडीयलो मूढ।

' अरे मूढा ! वानरासारखा नाचूं नको. कांही रीतिमार्गाचा अवलंब कर आणि या मानव जन्मास येऊन पापाचा भागीदार होऊं नको. पुत्र, कांतादिकांच्यासाठीं म्हाताऱ्या रेड्याप्रमाणें तूं राबतोस ! पण तुला या भवभयांतून पार करणारा कोणी आहे कां, याचा तूं स्वतःशींच विचार कर. या अस्थिर संसाराच्या मायापाशांत न गुंततां स्थिर अशा पुरंदर विट्ठलाच्या पादकमलांचा आश्रय कर.'

नगेयु बरुतदे । एनगे, नगेयु बरुतदे ।

' लोकांचे दांभिक वेड पाहून मला हंसूच येतें ! मुखानें मोठ्यानें प्रभुनामाचा गजर चालू ! नजर मात्र परयुवतीवरती ! मुखचंद्र दिसला नाहीं की नदीला स्नानाला हजर !

पतीची सेवा सोडून इकडे जाराबरोबर रात्रीं यथेच्छ विहार करायचा ! आणि वरती मात्र दानधर्माचा, व्रतवैकल्यांचा मोठा देखावा करायचा !

परधन हरण करण्यांत कपटशिरोमणि असून नेहमीं मनामध्यें दुष्टबुद्धि वागवायची ! आणि वरोपचारी मात्र पुरंदर विट्ठलाच्या भजनामध्यें रंगून गेल्याप्रमाणें दंग दिसायचें ! काय हा जगाचा व्यवहार !'

आरेनु माडुवरु आरिंदले नद्दुदु ।
पूर्वजन्मदकर्मविधि बेन्न बिडदु ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

पूर्वजन्म आणि कर्म याबद्दल बोलतांना दास म्हणतात–

'अरे बाबा ! या जगामध्यें कोणी कोणाला सुख दुःख देत नाहीं. पूर्व जन्मांचीं कर्मँ आपली पाठ सोडीत नाहींत !

पांच वर्षाचा ध्रुव ! सापत्न मातेच्या वाग्बाणानें चिडून तपःसाधनेसाठीं वनास गेला ! त्याचे आईबाप नव्हते कां ? दुष्ट दशकंठानें जानकीचें हरण केलें त्या वेळीं नृपश्रेष्ठ रामाचा पराक्रम कोठें गेला ? द्रौपदीचा भयंकर अपमान होण्याचा प्रसंग आला असतां पंच पतींच्या पराक्रमाची प्रौढी कोठें गेली ! अनेक महारथींशीं युद्ध करणाऱ्या अभिमन्यूला चक्रव्यूहांत एकटेच सोडतांना बलसंपन्न भीमादि वीरांची वीरश्री कोठें पळाली ?

ही कर्मबेडी कोणाला तरी तोडतां येईल काय ? जगत्पति पुरंदरविठ्ठलांच्या आज्ञेचें उल्लंघन करून कोणी राहूं शकेल काय ? कर्मबंधनांतून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे श्रीहरीचें अखंड स्मरण ! व त्याचें भक्तिपूर्वक चिंतन !

## : सुलभ पूजा :

'कलौ नामसंकीर्तनात् ,' असें श्रीभागवतांतील वचन आहे. नामसंकीर्तन हाच एक मुक्तिसोपान गांठण्याचा सुलभ मार्ग आहे. परमेश्वराला आळविण्याचा, दयासागराची दया जागृत करण्याचा साधा उपाय म्हणजे भक्ति. आचार्यांनीं, संतांनीं, ज्ञानी जनांनीं ईश्वरभजन हा सुलभ असा मार्ग सांगितला आहे. श्रीमत् शंकराचार्यांचें 'भज गोविंदं भज-

गोविंदं मूढमते !' हे स्तोत्र प्रसिद्ध आहे. तुकाराम महाराज ह्मणतात 'मुक्ति नाहीं कोणापाशीं, एका गोविंदाशीं शरण जा रे!' याप्रमाणें सर्वांना ईश्वराची भक्ति करण्यास सांगितलें आहे. परंतु अज्ञ मनुष्याला भक्ति कशी करावी हें कळत नाहीं. शिवाय त्याला ईश्वराची विधियुक्त पूजा करण्याची भारी आवड असते. आपल्याला षोडशोपचार विधि साधत नाहीं, ह्मणून त्याचें समाधान होत नाहीं ! साधी भक्ति करणेंही जमत नाहीं, आणि कोणी अधिकार वाणीनें सांगणारा गुरु भेटत नाहीं.

दासांनीं हें सर्व जाणून जगाचा व्यवहार लक्षांत घेऊन अत्यंत सुलभ अशी पूजापद्धति सांगितली आहे. आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं संत कबीरदासांनींही असेच उद्गार काढले आहेत. संत कोठेंही जन्मास आलेले असले तरी एकच भाषा बोलतात !

( सुलभ पूजि केळि सूक्ष्म जनरू )

या उपदेशाचा मराठी पद्यमय अनुवादः—

( चाल—क्षीण दीनंदिन आर्यवेशधन )

सुलभ करा हें श्रीहरी पूजन ॥
ज्यांत न वेचें किमपीही धन ॥ धृ० ॥
समजा गृहदीपा नीरांजन ॥
नवपट धरितां तें कृष्णार्पण ॥
षड्रस अन्नें करितां सेवन ॥
गोविंदाचें करणें चिंतन ॥ १ ॥

बोल सकल स्तुति गोपालाची ॥
स्त्री सुत मंडळि सर्वही त्याची ॥
पथक्रमतांना प्रदक्षिणाची ॥
शयनीं निजणें जाणा वंदन ॥ २ ॥

यापरी सारें कर्म आपुलें ॥
प्रभुसि अर्पितां श्रम नच कसले ॥
आयु करा सार्थक जें उरलें ॥
शरण पुरंदरविठला जाउन ॥ ३ ॥

( कबीरदास–संतो सहज समाधि भली ।
साईंतें मिलन भयो जा दिनतें
सुरत न अन्न चली ।........
जहँ जहँ जाऊँ सोई परिक्रमा ।
सब सोऊँ तब करूँ दंडवत । )

## २५. श्रीमध्वाचार्यांचें भक्तिप्रधान तत्वज्ञान :

श्रीमदाचार्यांनीं द्वैत मताचा प्रसार केला. द्वैत तत्त्वज्ञान हें भक्तिप्रधान आहे. कर्णाटकांतील सर्व हरिदास हे मध्वाचार्यांचे अनुयायी असल्यानें त्यांनीं, आचार्यांनीं कथन केलेल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार आपल्या गीतोपदेशांनीं केला आहे. या तत्त्वज्ञानाची ओळख करून देणें इष्ट असल्यानें, त्या तत्त्वज्ञानांतील प्रमुख तत्त्वांची थोडक्यांत माहिती देत आहे. आचार्यांचें तत्त्वज्ञान हें भागवत धर्मालाच धरून आहे.

आचार्यांचा जन्म बाराव्या शतकामध्यें दक्षिण कॅनरामध्यें समुद्रकिनाऱ्यालगत असणाऱ्या उडुपी क्षेत्राच्याजवळ पाजक क्षेत्र नांवाच्या गावांत मध्यगेह भट्ट नांवाच्या सदाचार संपन्न पंडिताच्या उदरीं झाला. त्यांच्या मातेचें नांव वेदवती असें होतें. वयाच्या अकराव्या वर्षी त्यांनीं संन्यास ग्रहण केला. प्रस्थान त्रयीवर त्यांनीं भाष्य लिहिलें. दशोपनिषदांवर भाष्य लिहिलें. ऋग्वेदांतील अर्थ कसा जाणावा याचें मार्गदर्शन करण्यासाठीं त्यांनीं चाळीस सूक्तांवर भाष्य लिहिलें आहे. अनेक प्रकरणें व स्तोत्रें लिहिलीं. त्यांनीं स्वमत प्रचारार्थ एकंदर सदतीस ग्रंथ लिहिले. आपण लिहिलेलें सूत्रभाष्य बदरीकाश्रमीं जाऊन श्रीवेदव्यासांना आचार्यांनीं दाखविलें, व त्यांची अनुमति घेतली, असा उल्लेख मध्वविजय ग्रंथामध्यें आढळतो.

'भारततात्पर्यनिर्णय' या ग्रंथामध्यें आचार्य ह्मणतात–

आलोड्य सर्वशास्त्राणि विचार्यच पुनः पुनः ।
इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा ॥

सर्व शास्त्रांचें अवलोकन करून पुनः पुनः विचार करून पाहिलें आणि सर्व शास्त्रांचें परमोत्तम सार येवढेंच निघालें, नेहमीं नारायणाचें ध्यान करावें; तोच ध्येय आहे. भक्तीच्या योगानेंच भगवान विष्णु संतुष्ट होतो. दुसऱ्या कोणत्याही मार्गानें नाहीं ( भक्त्यैव तुष्टिमभ्यैति विष्णुर्नान्येन केनचित् ) परम सुंदर अशा गेय द्वादशस्तोत्रांमध्यें आचार्य अगदीं कळकळीनें सांगतात–

कुरु भुंक्ष्व च कर्म निज नियतं हरिपाद विनम्रधिया सततम् ।
हरिरेव परो हरिरेव गुरुर्हरिरेव जगात्पितृमातृगतिः ॥
शृणुतामलसत्यवचः परमं शपथेरितमुच्छ्रितबाहुयुगम् ।
न हरेः परमो न हरेः सदृशः परमः स तु सर्व चिदात्मगणात् ॥

आचार्य ह्मणतात ‘ नित्य हरिपादकमलीं विनम्र बुद्धि ठेवून स्वतःचें नियत कर्माचरण कर आणि त्याचें फलभोग; हरीच सर्वश्रेष्ठ आहे. हरीच गुरु आहे. हरीच जगाचा पिता आणि माता आहे. दोनही हात उंचावून शपथ घेऊन सांगतों कीं हरीपेक्षां श्रेष्ठ कोणी नाहीं. हरी सारखा कोणी नाहीं. तो सर्वांहून [ ब्रह्मादि सर्व जीवगणांहून ] श्रेष्ठ आहे. ’ या प्रमाणें त्यांनीं सर्वोत्तमत्व कथन केलें आहें. परब्रह्म ह्मणजे अनंत गुणपूर्ण विष्णूच होय.

वेदे रामायणे चैव पुराणे भारते तथा ।
आदावंतेच मध्येच विष्णूस्सर्वत्र गीयते ।

वेद, रामायण, पुराणें, आणि भारत या सर्वांमध्यें आरंभीं, मध्यभागीं, व शेवटीं, सर्व ठिकाणीं विष्णूचेंच गायन केलें आहे. श्री मध्वमतामध्यें मुख्यतः पंचभेद कल्पिले असून, तारतम्य जाणून पूजा करण्यावर कटाक्ष आहे. १ जीवेश भेद, २ जीवजीव भेद, ३ जडेश भेद, ४ जीवजड भेद, ५ आणि जडजड भेद. श्री व्यासराय स्वामींनीं एकाच श्लोकांत श्रीमदाचार्यांच्या तत्त्वज्ञानाचें सार आणिलें आहे.

श्रीमन्मध्वमतेः हरिपरतरस्सत्यंजगत्तत्त्वतो
भेदो जीवगणा हरेरनुचरा नीचोच्च भावं गताः ।

मुक्तिर्नैज सुखानुभूतिरमला भक्तिश्चतत्साधनम्
ह्यक्षादि त्रितयं प्रमाणमखिलाम्नायैक वेद्योहरिः ॥

'श्रीहरी परतर आहे (सर्व श्रेष्ठ आहे) जगत् सत्य आहे. तत्त्वतः भेद सत्य आहे. सर्व जीव हरींचे अनुचर असून, त्यांमध्यें उच्चनीच भाव आहे. आत्मज्ञानानंतर मिळणाऱ्या शाश्वत सुखाची अनुभूति ह्मणजेच मुक्ति. निर्मल भक्ति हेंच मुक्तीचें साधन आहे. प्रत्यक्ष अनुमान आणि आगम या प्रमाणांनीं हें सिद्ध आहे. श्रीहरि हा ज्ञेय आहे. अखिल वेदांनीं ज्ञेय असा एकमेव हरीच आहे.'

या तत्त्वज्ञानाचें ज्ञान अज्ञजनांना व्हावें ह्मणून दासांनीं अनेक पद्यें रचलीं आहेत. त्यांतलि एकाचा उल्लेख करीत आहे.

(मध्वमतद सिद्धांतद पद्धति पद्धति बिडबेड बिट्टुकेडबेड)

'हे नरा! मध्वमतसिद्धांतपद्धतीचा आचार सोडूं नको, आणि नाश पावूं नको. मोहबंधनाला तोडणारें दासभावाचें अभिजात तत्त्व त्यांत प्रतिपादलें आहे. हरि सर्वोत्तम असून, विधि, रुद्र, रमा, वायु हे त्या परब्रह्म विष्णूचे भृत्य आहेत. हें ज्ञान जाणून घे. हें सुमत असून तें हरिभजनाची गोडी लावणारें आणि मुक्तीचा लाभ करून देणारें आहे. ह्मणून भारतीरमणमुख्यप्राणांतर्गत श्रीपुरंदर विठ्ठलाला प्रिय असा मार्ग सोडूं नको.'

वायुदेवाचे तीन अवतार असल्याचा बलित्थादि सूक्तांत [ऋग्वेद] उल्लेख आहे. श्रीमदाचार्यांना वायूचा तृतीय अवतार मानतात.

प्रथमो हनुमन्नाम द्वितीयो भीम एवच ।
पूर्णप्रज्ञस्तृतीयस्तु भगवत्कार्य साधकः ॥

पहिला हनुमान, दुसरा भीम, आणि तिसरा भगवत्कार्य साधक असा पूर्णप्रज्ञ श्रीमुनि श्रीमध्वाचार्यांचा अवतार होय.

आचार्यांना परम गुरु मानतात. अनंत गुण विधान श्रीविष्णु. आणि त्यानंतर श्रीरमा, नंतर ब्रह्मदेव, नंतर वायुदेव ह्मणजे मुख्यप्राण, नंतर रुद्र-शंकर, अशी तारतम्य परंपरा मानली आहे. हा सर्वांस आधार–उपनिषदांचा व पुराणांचा व पंचरात्रागमांचा आहे. अतएव सर्व हरिदासांनीं श्रीमदाचार्यांवर स्तुतिपर व तत्त्व विवेचक अशी पद्यें रचलीं आहेत. महाराष्ट्रांत ज्या प्रमाणें श्री ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी सारखा तत्त्व विवेचक असा सर्व श्रेष्ठ ग्रंथ लिहिला शिवाय भक्तिमार्गाचें मार्गदर्शन केलें, त्याप्रमाणें दास परंपरेंतील जगन्नाथ दास या महान दासांनीं 'हरिकथामृतसार,' नांवाचा अद्वितीय ग्रंथ लिहून अखिल कन्नडिगांना मार्गदर्शन केलें आहे. सर्व ग्रंथ पद्यमय असून ऐकणाऱ्याला तल्लीन करून सोडतो.

'हरिकथामृतसार, गुरुगळ, करुणदिंदापनितु
पेळुव, परम भगवद्भक्तरिदनादरादि केळुवदु ॥'

'भक्तिभाव उत्पन्न करणारें असें हरि कथामृतसार सर्वांनीं आदरपूर्वक ऐकावें.' अशातऱ्हेनें 'मंगळसंधि' पासून ग्रंथाला सुरुवात केली आहे. वेदांततत्वें अत्यंत सुलभरीतीनें हृद्य भाषेंत कथन केलीं आहेत. श्री माध्व सांप्रदायी लोकांना हा

ग्रंथ अत्यंत प्रिय आणि पूज्य आहे. सर्व भाषिकांनाहीं अर्थ-ज्ञान झालें तर पूज्य वाटण्यासारखाच तो ग्रंथ आहे.

श्रीदासार्यांनीं श्रीमध्वाचार्यांवर केलेल्या अनेक पद्यां पैकीं केवळ दोन तीन पद्यांचाच जातां जातां उल्लेख करीत आहे.

'हनुम नम्म तायि तंदे, भीम नम्म बंधु बळग,
आनंदतीर्थरे नम्म गति गोत्रवय्य ।'

'मुख्य प्राण एन्न मूल गुरवे, रक्कसांतक श्रीरामन निज दास ।।
अंजिकिन्यातकय्य सज्जनरिगे ।।
संजीवरायर स्मरण माडिद मेले ? ।।'

'हनुमान मुख्यप्राण, आमचा माता पिता ! भीम आमचा बंधुपरिवार ! आणि आनंदतीर्थ श्रीमध्वाचार्य आमची गति आणि कुल या ह्मणण्याचा पुष्ट्यर्थ श्रीपुरंदर विठ्ठलच साक्षीभूत आहेत.

'हनुमंत, मुख्यप्राण आमचा मूळ गुरु ! राक्षसाचा नाश करणाऱ्या श्रीरामाचा निजदास ! वित्त, विभव, सत्य सदाचार सर्वहि तूंच मला आहेस. सुख तूंच व मला सुलभ असा तूंच ! श्रीपुरंदर विठ्ठलाचा एकांत भक्त, व निजदास [ खरा दास ] तूंच आहेस.'

'सज्जनांना आतां भीति कसली ? जीवोत्तम अशा वायूचें स्मरण श्रीमध्वरायांचें स्मरण केल्यावर भीति कसली ? श्रीपुरंदर विठ्ठलाची अखंड पूजा करणाऱ्या त्याला परमप्रिय असणाऱ्या परमगुरु मध्वरायांचें स्मरण केल्यानंतर भीति ?

नांव कशाला घेतां ? ती केव्हाच दूर पळून जाईल !' या प्रमाणें सर्व हरिदासांनीं अचिंत्य अद्‌भुत शक्ति असणाऱ्या मूलगुरु ह्मणून प्रसिद्ध असलेल्या श्रीमदाचार्यांस उद्देशून अनेक स्तुतिपर पद्यें केलीं आहेत. तीं सर्व अभ्यासण्याजोगीं व नित्य पठणास योग्य अशींच आहेत.

'हरिसर्वोत्तम आणि वायु जीवोत्तम' असें वचन वैष्णव सांप्रदायांत प्रसिद्ध आहे.

: शिवस्तुति :

श्रीमध्वसांप्रदायांत तारतम्य समजून घेण्यावर विशेष भर आहे. सर्व देवतांची पूजा तारतम्यानुसार करावी, असा संकेत शास्त्राधारानें ठरवला आहे. वैष्णव लोक शंकरास मानीत नाहींत. शिवशक्तीची पूजा करीत नाहींत असा लोकप्रवाद आहे, तो चुकीचा आहे. वैष्णवानां यथा शंभुः' असे भागवत वचन आहे. सर्व दासांनीं रुद्रदेवाची आणि पार्वतीमातेची मुक्त कंठानें स्तुति केली आहे. मध्वाचार्यांचें शिष्यत्व पत्करणारे महान् पंडित त्रिविक्रमाचार्य यांच्या नारायणाचार्य या पंडित पुत्रानीं शिवस्तुति लिहिली असून ती वैष्णवांच्या नित्य-पठणांत असते. सदर स्तुति ( स्फुटं स्फटिकसंप्रभं स्फुटित हाटकश्रीजटम् ) बृहद्स्तोत्र रत्नाकरांत मुद्रित झाली आहे असो.

पुरंदर दासांनीं लिहिलेल्या एक दोन पद्यांचा आतां फक्त उल्लेख करीत आहे.

' चंद्रचूड शिवशंकर पार्वतिरमण निनगे नमो नमो ।
सुंदर मृगधर पिनाकधनुकर गंगाशिर गजचर्मांबरधर ॥....

धरेगे दाक्षिण कावेरी तीर कुंभपुरवासनु नीने ।
करदालि वीणेय गानव माडुव उरगभूषण नीने ।
कोरळलि भस्मरूद्राक्षि धरिसिद परम वैष्णवनीने ।
गरुडगमन श्रीपुरंदर विठलगे प्राणप्रियनु नीने ’

सदर पद्य कावेरीतीरावर असलेल्या कुंभकोणमूला गेल्यावेळीं पुरंदर दासांनीं लिहिलें असावें. सदर पद्याचा अर्थ सहज लक्षांत येण्यासारखा आहे. दक्षिण काशी ह्मणून प्रसिद्ध असलेला कुंभपुर निवासी तूंच आहेस. भस्म रुद्राक्ष धारण करणारा परम वैष्णव तूंच आहेस. गरुडवाहन पुरंदरविठ्ठलाचा प्राणप्रिय ही तूंच आहेस.

हंपीला पंपासरोवर आहे. श्रीराम लक्ष्मण तेथें राहिल्याचा, व तेथेंच त्यांनीं सुग्रीवाशीं सख्य जोडल्याचा उल्लेख आहे. त्या ठिकाणीं हंपी विरूपाक्षाचें प्रसिद्ध देवालय आहे. दक्षिणेकडे सर्वच देवालयें भव्य, प्रचंड, व प्रेक्षणीय अशीं आहेत. तेथेंच दासांनीं शेवटीं वास्तव्य केलें. त्या पंपा पुराला गेल्यावेळीं रुद्रदेवाचें दर्शन झाल्याचा उल्लेख दासांनीं आपल्या पद्यांत केला आहे.

‘ कंडेकरुण विधिय गंगेय मंडयोलिट्ट धोरिय ।
शिवन, रुंडमाले सिरिय नोसलीळु कंडगण्णिन बगिय, हरन ॥
कामित फलविवन, भकुतर प्रेमादि सलहुवन
रामनामस्मरण, रतिपति, कामन संहरन शिवन ॥

पंपा पुरवासी, तारक, उपदेशी,
पुरंदर विठ्ठल भक्तर पोषी, हरन ॥

' करुणानिधि अशा गंगाधराला आज मी पाहिलें रुंडमाला धारण करणाऱ्या त्रिनेत्रधारी अशा हराला मी आज पाहिलें. इच्छाफल देणारा, प्रेमानें भक्तांचें रक्षण करणारा, रतिपति कामाचा संहार करणाऱ्या, अशा शिवाला मी आज पाहिलें. पुरंदर विठ्ठलाच्या भक्तांचें पोषण करणाऱ्या तारक मंत्र देणाऱ्या अशा पंपापुरवासी शंकराला मी आज पाहिलें '

## २६ दास आणि कनकदास :

' स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रा येऽपिस्युः पापयोनयः । '

या गीतेच्या वचनाधारें पाहिलें तर ' मुक्ति हें पद ' जाति-निरपेक्ष वय-निरपेक्ष आहे. स्त्री, वैश्य, व पापयोनींत जन्मास आलेले जीवजंतुही– ' तेऽपि यान्ति परां गतिम् '–या उक्ती-प्रमाणें परागतीस पोचतात म्हणजे मोक्षास जातात–कैवल्यपद प्राप्त करून घेतात.

कर्नाटक दासपरंपरेमध्यें श्रेष्ठ पद प्राप्त करून घेणारे, आदरणीय, व वंदनीय, असें शूद्र जातींतील दास ह्मणजे 'कनक दास ' हे होत. जसे तुकाराम, नामदेव, चोखा इत्यादि शूद्र व अत्यंज जातींत जन्म पावलेले महाराष्ट्रीय संत विठ्ठलप्रीतीस पात्र झाले, त्याचप्रमाणें श्रीकनक दास हे कन्नड भाषिक संत, श्रीहरीच्या प्रीतीस प्रात्र झालेले, साक्षात्कारी संत होत. खुद पुरंदर दासांनीं त्यांना आपल्या ' दासकूटा ' मध्यें घेतलें व

आपले मंत्रगुरु श्रीव्यासराय स्वामी, यांना विनंति करून, त्यांच्याकडून त्यांना उपदेशही देवविला. श्रीव्यासराय हे त्रिकाळज्ञानी असल्यानें, कनकदासांची योग्यता त्यांनीं जाणली आणि त्यास दासकूटांत प्रवेश दिला.

सर्वांतर्यामिहरि ज्यांनीं वश केला, सर्व भूतांच्या ठिकाणीं असणाऱ्या सर्वव्यापी, सर्वसाक्षी अशा केशवाचें दर्शन ठायीं ठायीं ज्यांना घडलें, अशा सद्भक्तांना, बाह्यतः भासणाऱ्या व्यावहारिक जातिभेदाचें महत्त्व कधींच वाटत नाहीं, हें, दास, कनकदास, रामानंद, कबीर, तुलसीदास इत्यादि महान संतांच्या चरित्रांवरून स्पष्टपणें कळून येतें.

व्यासराय स्वामींच्या मठांत घडलेल्या घटनांचा उल्लेख दासांनीं आपल्या पद्यांत केला आहे.

‘कनकदासनमेले दयमाडुव व्यासमुनि, मठदवरेल्ल दूरिकोंबवरु’

श्रीव्यासमुनींनीं एके दिवशीं कनकाला सर्व पंडितांच्या आधीं तीर्थ दिलें. तें पाहून पंडितजन, ‘संन्यास घेतल्याचें सार्थक झालें,’ असें ह्मणून उपहास पूर्वक हंसूं लागले. दुसरे दिवशीं सर्वांना स्वामींनीं बोलाविलें कनकासही बोलाविलें. प्रत्येकाला केळीं दिलीं, आणि सांगितलें, ‘एकांतात जाऊन केळीं खाऊन या.’ प्रत्येकानें एकांत मिळेल त्या ठिकाणीं जाऊन, तीं केळीं भक्षण केलीं, परंतु कनकानें तीं तशींच स्वामींच्या चरणांजवळ आणून ठेविलीं, आणि तो ह्मणाला, ‘स्वामी, कर्ण, वाक्, वगैरे सर्व इंद्रियांचे अधिपति अशा देवता ( तत्त्वेशरु ) आंत बाहेर

व्यापून असतांना, कसें मीं भक्षण करूं? हें ऐकतांच स्वामींना परमानंद झाला.

आणखी एके प्रसंगीं आपल्या हातांत वासुदेव शालिग्राम घेऊन, स्वामींनीं सर्वांना विचारलें, ‘ माझ्या हातांत काय आहे, हें सांगा. ’ सर्वही दिङ्मूड होऊन स्वस्थ बसले. पण कनकानें तात्काळ सांगितलें ‘ परब्रह्म पुरंदर विठ्ठल वासुदेव मूर्ति आपल्या हातांत आहे. ’

यावर कनकानें त्याच प्रसंगावर पद्य केल्याचा उल्लेख आहे. ‘ ई तनुग वासुदेवनु ’ या तनुस वासुदेव म्हणतात.

दक्षिणेकडे समुद्राकिनाऱ्यालगत असणाऱ्या उडुपी महाक्षेत्रांत श्रीमध्वाचार्य करार्चित आणि स्थापित श्रीमंधरबालकृष्णाचें मंदिर आहे. तेथें हा कनक गेला असतां, त्यास त्या महामंदिरांत प्रवेश मिळाला नाहीं. त्या आर्त भक्ताला पुजाऱ्यांनीं दर्शनसुख घेऊं दिलें नाहीं. दर्शनाचा भुकेला असा तो परम भक्त देवळाच्या पाठीमागें जाऊन भजन करीत राहिला. उडुपी बाळकृष्णानें माया कौतुक केलें! आपलें पूर्वाभिमुख तात्काळ फिरविलें, आणि कनकास गर्भमंदिराच्या पश्चिमभागीं असलेल्या खिडकींतून दर्शन देऊन संतृप्त. केलें! केवढें हें भक्त प्रेम! ‘ कौंतेय! प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति. ’ भक्ताचें कोडकौतुक त्याच्याशिवाय कोण करणार? ‘ माझा भक्त नाश पावणार नाहीं ’ असें श्रीकृष्णाचें वचन आहे. ज्या खिडकींतून कनकाला दर्शन झालें, तीस

कनकाची खिडकी ( कनक खिंडी ) असें म्हणतात. याची प्रचीति आजहि दिसून येते. अर्धी प्रदक्षिणा झाल्यावर लहानशा खिडकींतूनच दर्शन घ्यावें लागतें. मूर्तीनें कनकाकरितां फिरवलेलें मुख पूर्वींसारखें पुनः केलें नाहीं. यावरून हें स्पष्ट आहे कीं ईश्वराला सर्व जीव सारखे आहेत; आणि ' यमेवैष वृणुते तेन लभ्यः ' हें श्रुति वचन अत्यंत सत्य आहे.

## २७ दास मंडप :

आतांपर्यंत दासांच्या अनेक कृतींचा परिचय करून देण्याचा यथाशक्ती व यथामति प्रयत्न केला आहे. या प्रकरणामध्यें त्यांच्या चरित्रांतील उल्लेख करण्याच्या राहून गेलेल्या एक दोन घटनांची माहिती सांगायची आहे.

दासांची तीर्थयात्रा चालू असतां ते तिरुपति बालाजीच्या ( श्रीवेंकटगिरी ) दर्शनास आले. तिरुपति श्रीवेंकटरमणाच्या कृपेनेंच दासांचा जन्म झाला असल्यानें, दासदीक्षा घेतल्यानंतर सहस्रनामधारी वेंकटेशाच्या दर्शनाची त्यांना आतुरता झाली. त्याप्रमाणें तिरुपति येथें त्यांनीं कांहीं दिवस वास्तव्य केलें.

एके दिवशीं आपल्या हृदय मंदिरांत श्रीनिवासाची स्थापना करून दास मानसपूजा करीत होते. त्याच वेळेस देवस्थानांतील गर्भ मंदिरांतही मूर्तीची पूजा चालू होती. विधियुक्त पूजा आटोपतांच पूजारी पच्छकर्पूरयुक्त [ भीमसेनी कापूर ] गंध लावूं लागले. पण गंध चिकटून बसेना. तीन वेळां प्रयत्न केला तरी, हें गंध लागेना. दर्शनास बाहेर लोकांची

गर्दी झालेली! पूजाऱ्यांना विस्मय वाटला. आपणांकडून कांहीं प्रमाद घडला कीं, काय हें त्यांना कळेना. ही वार्ता महंतांना कळविली. सर्वाधिकारी महंत तेथें आले. पुनः कापूर देऊन स्वतःसमक्ष गंध लावण्यास त्यांनीं सांगितलें. पुनः पूर्वी प्रमाणेंच घडलें. गंध कांहीं केल्या देवाच्या कपाळीं चिकटेना! आश्चर्य व भय यांनीं सर्व दिङ्मूढ झाले! व श्रीवेंकटेशास ते सर्व शरण गेले! याच वेळेस दासांची मानस पूजा संपली! आणि ते देवदर्शनार्थ मंदिरांत आले. त्यांच्या कानीं, 'देवास गंध लागेना' इत्यादि वार्तालाप ऐकूं आले. ज्ञानदृष्टीनें त्यांनीं पाहिलें. त्यांचें अंतःकरण सद्गदित झालें. 'अहाहा! भगवंता, वेंकटेशा, तूं किती कृपाळू! मला दर्शन देण्यासाठीं, महामंगलारती, पहावयास मिळावी ह्मणून हें कौतुक केलेंस ना!' असें ह्मणून, ते महंतापाशीं आले व ह्मणाले, 'महंत महाराज, हा कापूर घ्या, आणि गंधांत मिश्रण करून मूर्तीस नाम लावण्यास पुजाऱ्यांना सांगा.' याप्रमाणें करतांच तात्काळ मूर्तीस गंधाचा नाम लागला. या घटनेनें दासांची महती वाढली, व देवाच्या ठिकाणीं त्यांची असलेली अनुपम भक्ति लोकांना कळून आली.

दासांनीं अनेक ठिकाणीं संचार केला. घटिकाचल, कालहस्ती, कांचि, श्रीमुष्ण, तोताद्रि, मायावरम्, श्रीरंग, मदुरा, दर्भशयन, रामेश्वर, वगैरे क्षेत्रें पाहत पाहत कन्याकुमारीपर्यंत त्यांनीं प्रवास केला. सर्व तीर्थक्षेत्रांचें दर्शन घेऊन त्या त्या

स्थळांचें महात्म्य त्यांनीं पद्यांत वर्णन केलें आहे. तुंगभद्रा, कावेरी, इत्यादि महानद्यांवर स्तुतिपर काव्यें दासांनीं रचिलीं आहेत. तदनंतर श्रीमदानंदतीर्थांनीं स्थापन केलेल्या आणि अर्चिलेल्या बाळकृष्णाचें दर्शन घेण्यासाठीं ते उडुपी क्षेत्रास आले.

त्यावेळीं श्रीमत् वादिराजतीर्थ, सोदे मठाधीश हे उडुपी येथें होते. यानांच हयवदन दास असें ह्मणतात.

स्वामी महान् पंडित, आणि श्रीहरीच्या अनुग्रहास पात्र झालेले साक्षात्कारी आणि अधिकारी पीठाधीश होते. माध्व सांप्रदायांमध्यें श्रीमध्वाचार्यांनंतर त्यांनाच विशेष मान आहे. त्यांना वायूचा अंशावतार असें म्हणतात. शिरसीजवळ १०-१२ मैलांवर सोदे या लहानशा खेड्यांत त्यांची समाधि-वृंदावन-आहे. कथा आहे कीं:-ते अदृश्य झाले, आणि आकाशांतून आपली छाटी त्यांनीं टाकिली. ती वृंदावनांत ठेवली आहे. आजबाजूस जंगल असून जागा अत्यंत रमणीय आहे. स्थान जागृत आहे. त्यांनीं अनेक वेदांतपर ग्रंथ, टीका ग्रंथ, काव्यें, महाकाव्यें लिहिलीं आहेत 'रुक्मिणीश विजय' हें त्यांचें महाकाव्य प्रसिद्ध आहे. दास परंपरेंत त्यांना मोठें स्थान आहे. वैकुंठ वर्णन, भ्रमरगीता इत्यादि अनेक ग्रंथ त्यांनीं कानडी भाषेंत लिहिले आहेत. त्यांचीं पद्यें सरस व हृदयंगम आहेत.

दासांचा मुक्काम तेथें असतांना नित्य परिमार्थचर्चा, प्रवचन, व संगीत सेवा चालत असे. उडुपी येथें कृष्णाच्या

देवळा शेजारींच अनंतेश्वराचें मोठें देवालय आहे. एका एकादशी दिवशीं दास त्या ठिकाणीं रात्रीं भजनांत रंगून गेले. त्यांच्या देहावर स्मृति नव्हती ! स्वानंद सुखामध्यें त्यांचें मन तल्लीन झालें होतें ! उजाडलें तरी हे भानावर आले नाहींत; एका हातांत वीणा ! पायांत चाळ, दुसऱ्या हातांत चिपळ्या ! आणि हरिनाम संकीर्तन !

* नृत्य करीत सारखा नामाचा गजर चालू ! *

बृहन्नारदीय पुराणांत एकादशी महात्म्यामध्यें खालील वचन आहे.

स: स्वपित्वा तु शयने हरि चिंतयते नरः ।
स हरिः कीर्तनं तस्य संतिष्ठन् शृणुते तदा ॥
यस्तिष्ठन् कीर्तयेद्देवं भक्त्या युक्तो नरोत्तमः ।
स्वयमुत्थाय देवेशो भक्तस्य श्रुणुते स्तवम् ॥
यस्समुत्थाय मतिमान् जगदाधारमीश्वरम् ।
कीर्तयद्भिर्विधैर्गीतैर्महाभक्तिसमन्वितैः ।
स हरिः श्रुणुते स्तोत्रं नृत्यमानोति हर्षितः ॥
यः पुमान्नृत्यमानःसन् विलज्जो गीयते यदि ।
स हरिः परमप्रीतो प्रत्यक्षो भवति ध्रुवम् ॥

पुरंदरदास हे नारदांश असल्यानें, नारदाप्रमाणें नृत्य करीत हरिभजनांत विलज्ज होऊन रंगत असत. आणि जसा नृत्यगायन करणाऱ्या नारदांना प्रभु प्रत्यक्ष दृश्य झाला त्या प्रमाणें दासांनाही झाला.

जातां जातां उल्लेखनिय गोष्ट ह्मणजे संतांची वाणी शास्त्रांस धरूनच कशी असते, हें पाहण्यासारखें आहे. तुकारामाचा एक अभंग अशा प्रकारचा आहे.

'निजल्यानें गातां उभा नारायण। बैसल्या कीर्तन करितां डोले॥
उभा राहोनियां मुखीं नाम वदे। नाचे हा गोविंद नाना छंदें॥'

अशाच अर्थाचें वाक्य जगन्नाथ दासांच्या 'हरिकथामृतसार' या ग्रंथात आहे.

'मलगि परमादरदि माडलु कुळितु केळुव
माडलु निलुव नितरे नलिव नलिदरे वलिवेनिवगेंचा'

अशा प्रकारचा अनुभव कोणास आला? या प्रश्नाचें उत्तर पुराणाच्या आधारें देतात. भीष्माचार्यांनीं अत्यंत आदरानें निजून (शरपंजरीं) ईशस्तुति केली; ती श्रीकृष्णानें बसून ऐकिली. श्रीपुंडलिकानें पितरांगत परमेश्वराचें ध्यान-मातापित्यांची सेवा करीत असतांना बसून व एकनिष्ठेनें केलें. 'श्रीविठ्ठलानें उभा राहून स्तुति ऐकिली; श्रीहरी नाचत स्तम्भांतून प्रगट झाला आणि नाचत स्तुतिकरणाऱ्या नारदांना तो प्रत्यक्ष दिसला.

असो. श्रीवादिराज स्वामी 'चौकी' मधें (उडुपी कृष्णाच्या भव्य मंदिरांतील भोजनास बसण्याची प्रशस्त आणि विस्तिर्ण अशी जागा) द्वादशीचे दिवशीं पूजा आटोपून सकाळीं तीर्थ देण्यास सिद्ध असतां, दास, न दिसल्यानें, आपल्या शिष्यांना दासांना बोलावण्यास त्यांनीं आज्ञा केली. एका धीट ब्राह्मणानें सांगितलें, 'महाराज अद्यापि अनंतेश्वराच्या देवळांत

दास थै थै नाचत आहेत. द्वादशी टळत आहे. भोजनास बसावें, हें योग्य.' दुसरा म्हणाला, 'स्वामी, कालचा निराहार'! तेव्हां, स्वामी म्हणतात- 'तें कांहीं नाहीं' जा, दासांना मी खोळंबलों आहे, तावडतोब या, असा माझा निरोप सांगा'

ते भुकेलेले शिष्य तेथें आले! दास आनंदसागरांत बुडालेले होते! त्यांना वर कसें काढायचे? अत्यंत मोठ्यानें आणि कर्कशपणें ओरडून ते शिष्य म्हणाले; 'दास महाराज, आतां तुमचें हें नृत्य गायन बंद करा-पोटांत कावळे उठले आहेत-स्वामी महाराज आपल्यासाठीं, खोळंबले आहेत. उठा. चला. आज साधन द्वादशी आहे.'


दास अत्यंत घाईनें निघाले. शौच, मुखमार्जन, स्नान, कांहीं न करीतां, चौकांत येऊन दाखल झाले. श्रीमान् वादिराजांना परमानंद झाला. त्यांनीं दासांना तीर्थ दिलें. हजारों ब्राह्मण पंक्तीस बसले होते. आतां भोजनास बसण्याची वेळ झाली. चेष्टा सुरू झाली 'संध्या-पूजा राहूं दे. पण साधें स्नान तरी! कानडी पदें करून नाचले, म्हणजे कां देव प्रसन्न होतो?' स्वामींनीं ऐकिलें. दासांचा महिमा सर्वांना कळावा म्हणून त्यांनी विचारलें 'दास महाराज, आपलें गंगास्नान झालें आहे ना?' लगेच उपहास करणारे म्हणाले-'दासांनीं आवाहन केलें तर गंगाच येथें येईल-'

दास म्हणाले, 'ठीक आहे, ब्राह्मणाचें वचन असत्य कसें होईल?' लागलीच त्यांनीं गंगेची स्तुति केली. चमत्कार

असा झाला कीं त्या चौकीमध्यें जलधारा सुरू झाल्या ! भोजन पात्रें पाण्यांवर तरंगूं लागलीं ! स्वामी ह्मणाले, ' आतां तरी दासांची योग्यता तुह्माला कळली ना ? त्यांची क्षमा मागा, नाहीं तर कठीण प्रसंग येईल ' ' छे ! छे ! नको. नको ! ब्राह्मणांनीं क्षमा मागण्याचें कारण नाही. आपल्या पित्याचें दर्शन घेण्याच्या, व त्याचें भूमंडळावरचें वैभव पाहण्याच्या इच्छेनें गंगा आली आहे. ती आतां स्वस्थानाला परत जाईल. काळजी नको ' असें ह्मणून, ' हे गंगे ' असें स्तोत्र करतांच तात्काळ गंगा गुप्त झाली ! सर्वहि दासांना शरण आले. भक्तांचें महात्म्य वाढावें अशाच घटनांची योजना ईश्वर करीत असतो.

दासांना वैराग्य उत्पन्न होऊन, श्रीव्यासरायांच्या मठांत ते मंत्रोपदेशासाठीं आले असतांना, कृष्ण देवरायांच्या कानांवर ही गोष्ट गेली. दासांची व त्यांची मैत्री होती. विजयनगरचा तो राजा, दासांच्या दर्शनास आला ! दासांची गांठ घेऊन त्यानें सर्व वृत्तांत समजून घेतला. व त्यांना राजवाड्यांत नेऊन, त्यांचा मोठा मानसन्मान करून, राजानें पुष्कळ दान त्यांना दिलें. पण हें सर्व ओझें दासांना सहन होईना ! त्यांनीं परत आपल्या पर्णकुटीकडे येतांना भेटेल त्या भिकाऱ्यांना आणि गरीब ब्राह्मणांना सर्व देऊन टाकिलें ! वैराग्य-लक्ष्मी प्रसन्न झाली असतां या विभव-लक्ष्मीची दासांना काय पर्वा ? आश्रमांत ते हात हालवीतच परत आले. सर्व लोकांना आश्चर्य वाटलें ! दुसऱ्या भेटींत कृष्णदेवरायानें दासांना विचारिलें, ' आपल्या साठींच मी सर्व दिलें होतें.' दासांनीं उत्तर दिलें 'आपली दान-

सेवा ईश्वरास पोंचली. गरीब लोकांना सहाय्य करणें महापुण्य आहे. ' कृष्णदेवराय या भाषणानें फार संतुष्ट झाले. राजास दुर्धर कुहूयोग [१] आला असतां, राज-सिंहासनावर स्वतः बसून राजास त्या कुहूयोगांतून श्रीव्यासरायांनीं वाचविलें. त्या वेळीं त्यांनीं पुनः सर्वांच्या योग्यतेप्रमाणें दान दिलें. दासांनीं, विचारतांच उत्तर दिलें, ' महाराज, जर देण्याची आपली इच्छा असेल तर हंपीक्षेत्रामध्यें चक्रतीर्थाजवळ भजनास योग्य असा मंडप बांधून मिळावा. ' हें ऐकतांच वैराग्यशाली दासांसाठीं राजानें एक विस्तीर्ण मंडप बांधून दिला. आतां तो मंडप जुना झाला असला तरी हजारो भक्तगण एका वेळेस बसतील इतका मोठा आहे. यास ' दास मंडप ' असें ह्मणतात.



हंपी क्षेत्रांतील चक्रतीर्थाजवळ श्रीकृष्णदेव-रायानें बांधून दिलेला-
' दास मंडप '

[१] टीपः- ( सर्पदंश होऊन मृत्यु ओढवणें या घटनेस कुहूयोग म्हणतात. राजसिंहासनावर बसणाऱ्यांसच तो योग असतो. यास ऐतिहासिक आधार आहे. )

## २८ उपसंहार :

'हरिदासर संग इरबेकु' हरिदासांचा संग नेहमीं असावा असें दास म्हणतात. 'संत संग देई सदा' तुकोबाराय मागतात. याचाच अर्थ, शाश्वत सुखाचा मार्ग लाभावा आणि ईशप्राप्ति व्हावी अशी इच्छा असणाऱ्यांनीं संतांचा सहवास केला पाहिजे. सहवास लाभणें दुरापास्त असेल तर त्यांच्या चरित्रामृतांत अवगाहन करून पवित्र होणें, आणि त्या चरित्र सागरांतून कांहीं हातास लागल्यास त्याचा स्वीकार करून कृतार्थ होणें, हें तरी एक सत्कर्मच आहे.

कर्णाटक दासपरंपरा अद्यापीहि मूळ धरून आहे. याचें कारण पुरंदरदासार्यांनीं घालून दिलेला भक्तीचा मजबूत पाया हाच होय. सर्वस्व विठ्ठलाच्या चरणीं वाहून स्वतःच्या उज्वल चारित्र्यांनीं, आणि दिव्य वाणीनें साऱ्या मानव जातीलाच उपदेशाचा बहुमोल ठेवा त्यांनीं दिला आहे. त्यांच्या वाङ्मयाचें एक अभ्यासू विद्वान मास्ती वेंकटेश अयंगार म्हणतात.

'They ( the songs ) indicate a mind familiar with the world and its ways inclined as much to see without as within, wide knowledge, deep experience and a great love of humanity are visible in them. Their range is great.'

( Popular culture in Karnatak. *Page 74* )

त्यांचा शब्दन् शब्द भक्तिरसानें व अनुभवानें भरला आहे. त्यांच्या काव्यांत ईश्वरी प्रसाद आहे. कर्नाटक साहित्याला हरिदासांनीं विशेषतः पुरंदरदासांनीं वैभवसंपन्न केलें आहे.

त्यांची कविता सुलभ, प्रासादिक, हृदयास भिडणारी आहे. उपमा, उत्प्रेक्षा रूपकादि अलंकार वाक्यागणिक आहेत. व्यवहारांतलेंच दृष्टांत, पण ते अलंकारिक भाषेंत मांडण्याची हातोटी व शब्द योजनेची कुशलता, ही अद्वितीय आहेत. फक्त ईश्वरी कृपेस पात्र झालेलेच असें लिहूं शकतात.

: दासांचे प्रिय दैवत विलठ्ठच :





विठ्ठल नामासंबंधीं व देवतेसंबंधीं बरेच संशोधन चिकित्सक करीत असतात. पंढरपूर हें मूळचें नांव आहे कां ? पांडुरंग हें नांव कां पडलें ? कोणी म्हणतात, पंडरगे असें मूळचें गांवाचें नांव. तें भीमा तटाकीं होतें. पुढें पंढरपूर असें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

नाम पडलें. विठ्ठल हें दैवत मूळचे कानडी 'कानडा हा विठ्ठलु कर्नाटकु' ( ज्ञानेश्वर ) पुंडलीक हा कानडी संत होता. पुढें हें दैवत महाराष्ट्रियांनीं पूज्य मानिलें आणि ज्ञानेश्वर, नामदेव तुकाराम इत्यादि संत विठ्ठलास परम आवडीनें भजूं लागले.

थोडा विचार केला तर देव हा कानडी अगर मराठी कसा? येवढेंच ह्मणतां येईल की कर्णाटकांतच आरंभीं विठ्ठलाची पूजा सुरू झाली. ज्यावेळेस पुंडलीकासाठीं, परब्रह्म भेटीला आलें, त्यावेळीं तो सर्व प्रांत कर्नाटक राजांच्या ह्मणजे विजय नगर राजांच्या ताब्यांत असला पाहिजे. पैठणपर्यंत विजय-नगरचें साम्राज्य पसरलें होतें. इकडे पुणें नागपूर पर्यंतही तें होतें. आद्य मध्वाचार्यांचें पहिलें शिष्य ओरिसा राजाच्या दर-बारी मोठे अधिकारी होते, आणि त्यांनीं राजाच्या खजिन्यां-त्यांतील मूल राम-सीतेच्या प्रतिमा आचार्यांना दिल्याचा-पुरावा आहे. दासांचा जन्म पुण्याजवळ असणाऱ्या पुरंदर गडा-मध्यें झाला. शिवनेरी [१] वगैरे सारखी कांहीं नांवें कानडी आढ-ळतात. ज्ञानेश्वरीमध्यें तुकारामाच्या गाथेमध्ये कांहीं कानडी शब्द दिसतात. असो. कानडी माणसानें पूजा केली ह्मणून तो देव कानडी नव्हे.

स्कंद पुराणांत 'पांडूनां पालितं रंगं यदूनां कुलदीपकम् ।

असें वाक्य आढळतें. पांडुकुलाचा रक्षण कर्ता ह्मणून पांडुरंग, असा शब्द तयार झाला. पद्मपुराण आणि स्कंद

[१] टीपः-शिवन एरी-शिववाहन-नंदी.

पुराण यांत पंढरीमहात्म्याचे बरेंच वर्णन आलें आहे. विठ्ठल हें दैवत बाराव्या शतकांत तरी माहीत होतें असें दिसतें. कारण श्रीमध्वाचार्यांनीं स्थापलेल्या कांहीं मठांत स्वतः आवाहन करून पूजा केलेली विठ्ठलमूर्ति दिल्याचें आढळतें.

चौदाव्या शतकांतलि रामचंद्राचार्य यांचा 'प्राक्रिया कौमुदि' ग्रंथ उपलब्ध आहे. त्यांत विठ्ठल शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे. वित् + ठ + ल = विठ्ठल.

: अर्थ :

विदा ज्ञानेन ठान् शून्यान् लाति गृह्याति यः स्वयम् ।
अज्ञानुग्रह कृद्देवो विठ्ठलः कथ्यते बुधैः ॥

ज्ञानशून्य अशा अज्ञ नरांवर अनुग्रह करणारा ह्मणून 'विठ्ठल' असें विद्वान् ह्मणतात.

'सर्वाणि नामानि यमाविशन्ति' या न्यायानें सर्व शब्दवाच्य परमात्माच आहे. आह्मा सामान्य अज्ञजनांना विठ्ठल हें परमप्रिय दैवत आहे. 'विठ्ठल विठ्ठल ह्मणा वेळो वेळा. विठ्ठल नामाचा गजर करा आणि भवसागर तरा.' दासांसंबंधीं गरुड पुराणांत खालील उल्लेख आहे.

'नारदो विष्णूसेवार्थं वाय्वावेशयुतोऽजनि ।
पुरंदर इति ख्यातस्तन्मार्गंच प्रदर्शयन् ।
शूद्रयोनौ यतो जातो नारदः पूर्वजन्मनि ।
तद्दोष परिहारार्थं रुद्रचोदितमानसः ।

नानाविधां पद्यमालां विष्णोरूप प्रकाशिकाम् ।
चकार विठ्ठलः प्रीत्यै दुःख प्रारब्ध मोक्षणे । ’

हा आधार तर आहेच पण दासांचें चरित्रच अत्यंत अद्‌भुत आहे. त्यांची भक्ति अनुपम अत्यंत उत्कट आहे. भजन रंगात रंगणाऱ्या दासांना नारदाचा अवतार मानण्यांत कांहींच वावगें नाहीं, नारदाचे कार्य लोकोपकारचें. तसेंच दासांचेंही. श्रद्धावान भक्त ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेवांनाही अवतारी पुरुष मानतात.

दासांच्या अपार कृतींचें थोडक्यांत जितकें समालोचन करतां आलें तिवके केलें. त्यांनीं अनेक विषयांवर स्फुट कविता केली आहे. त्यांत भूपाळ्या, पाळणें इत्यादि अनेक प्रकार आहेत. उगाभोग, सूळादी असेहि सुभाषितमय काव्य प्रकार आहेत. सुदाम चरित्र, द्रौपदीवस्त्रहरण, परतत्त्वसार, इत्यादि त्यांचे स्वतंत्र ग्रंथहि आहेत. पण यांपैकीं आज पुष्कळसे अनुपलब्ध आहेत. त्यांचें संशोधन करून सर्व प्रकाशांत आणणें जरूर आहे. विस्तारभयास्तव या विषयांवर एवढाच उल्लेख पुरे. दासांचे सर्वच काव्य रागदारींत आहे. ते संगीत शास्त्रांमध्यें अत्यंत निष्णात होते. संगीत सेवा ईश्वरास अत्यंत प्रिय आहे. ‘वेडे वांकुडें गाईन, परि तुझा ह्मणवीन’ असेंच संत ह्मणत असतात.

सर्व भाषांतील संतांचें श्रेष्ठ वाङ्मय वाचलें असतां अध्यात्मवादच प्रतीत होतो; आणि कैवल्य पदास नेणारा राजरस्ता दिसूं लागतो. सद्भक्तांना दासांच्या काव्याची

गोडी उत्पन्न व्हावी, दासांचा दिव्य उपदेश त्यांना समजून द्यावा, व त्यांचें अद्भुत चरित्र त्यांच्या अवलोकनार्थ त्यांच्या पुढें ठेवावें, हाच या अल्प लेखनाचा हेतु आहे. त्यांच्या आणखी कांहीं प्रसिद्ध आणि रसाळ कवितांचा अनुवाद देण्याची इच्छा असून टाळावें लागत आहे.

असो. हरिदासांनीं केलेल्या ईशस्तुतीनेंच हा अल्प ग्रंथ समाप्त करीत आहे.

:: ईशस्तुति ::

[ राग–मध्यमावति ताल–आदि ]

'दासोऽहं तव दासोऽहम् । वासुदेव विघताघसंघ तव ॥ पल्ल ॥
जीवांतर्गत जीव नियामक । जीव विलक्षण जीवनदा ॥
जीवाधारक जीवरूप । राजीव भवजनक जीवेश्वर तव ॥ १ ॥
कालाव्हय महाकारण कालक । कालातीत त्रिकालज्ञ ॥
कालप्रवर्तक कालनिवर्तक । कालोत्पादक कालमूर्ति तव ॥ २ ॥
कर्मकर्मकृत कर्मकृतागम । कर्मफलप्रद कर्मजित ॥
कर्मबंध महाकर्मविमोचक । कर्मनिग्रहविकर्मनाश तव ॥ ३ ॥
धर्मयूप महधर्म विवर्धन । धर्मविदोत्तम धर्मविधे ॥
धर्मसूक्ष्ममह धर्मसंरक्षक । धर्मसाक्षि यमधर्म मित्र तव ॥ ४ ॥
मंत्रयंत्रमय मंत्रबीजमहा । मंत्रराजगुरु मंत्रधिता ।
मंत्रमेयमह मंत्रगम्यवर । मंत्रदेव जगन्नाथ विठल तव ॥

या वाङ्मय सेवेनें मुख्य प्राणांर्गत श्रीहरि सुप्रीत प्रीत होवो.

* श्रीकृष्णार्पणमस्तु *

# श्रीपुरंदर-विठ्ठल-वैराग्य

• • • • • •

कवि : वामनराव भाटे, एम्. एः बी. टी. बेळगांव.

[ १ ]

( चाल : भूपति-वैभव. )

गड कोट पुरंदर ख्यात नामजगिं झालें
अवतरुनि ‘ पुरदर विठ्ठल ’ येथें आले ॥ ध्रु० ॥ १ ॥
‘ वरदप्प ’ वरद जो पिता तया बालाला,
श्री ‘ लक्ष्मी ’-कुशीं वास जयानें केला ॥ २ ॥
श्री ‘ सरस्वती ’ परि अतरंग तत्फुलवी,
तइं भक्ति-तरंगीं तुंगा-भद्रा डुलवी ॥ ३ ॥
लागलें ‘ वेड ’ या ‘ दासा ’ कां ? कदां ?
त्यागिलें प्रपंच्या कैसें सर्वदा ?
ध्यातसे विठ्ठलाच्या श्री-पदां ! ॥ ४ ॥
गुण-गान तयाचें करित कीर्तनीं रमला
करिं वीणा अन् करताल ताल तो धरिला ॥ ५ ॥

[ २ ]

‘ शीनप्प ’ सराफी-दुकान तेथें नगरीं
प्रगटलें तिथें मग ब्रह्म सगुण अवतारीं ॥ ६ ॥
“ मागतों, विवाहा दान - दक्षिणा द्या हो !
वर-वचें तोषविन, ‘ व्यवहार तुम्हांला लाहो’ ” ॥ ७ ॥

" जा घरीं, पहा हो ! दुसरी कसली सोई
सोईर करा जा, पोटभरू तुम्हि सांई " ॥ ८ ॥
नव-कोट-नाणकी न्हाले नाइक ॥
करि धरुनि करिति रत्नांची पारख ॥
नट परब्रह्म हें नेणें कौतुक ॥ ९ ॥
ते फसले कंसे ? सादर राहुनि एका—
नथ देउनि जातो, ब्राह्मण घेउनि पैका ॥ १० ॥

[ ३ ]

' जा घरीं ', वचातें परिसुनि ब्राह्मण जाई,
नाईक-गृहीं ये, मागत ' भिक्षान्देहि ' ॥ ११ ॥
स्त्री-सरस्वती तो दंग सदा गृह-कार्यी
नथ देई त्यातें, तुष्ट अतिव तो होई ॥ १२ ॥
येउनी दुकानीं त्यानें दाविली ॥
आपुली, ओळखीचीशी भासली ॥
अन्तरशी मानसीं शका, दवडिली ॥ १३ ॥
जरि पुनः पाहिली, शंका राहुनि गेली ॥
मग गृहासि येउनि सतीस पृच्छा केली ॥ १४ ॥

[ ४ ]

" नथ कुठें ? सांग मज; त्वरित करीं मम देई "
" नथ आंत असे हो ! कां करितां लवलाहो ? ॥ १५ ॥
नथ हवी नाथ ! ना ? लगबग येइल पायीं
मम देह दिला ना ? काय नथेची घाई ?" ॥ १६ ॥

परि हृदयिं सतीच्या कडाडलें हो ! गगन !
ब्रह्माण्ड आठवे विष-चषक हस्तकीं धरुन ! ॥ १७ ॥
लाविला विषाचा प्याला तैं मुखीं ॥
श्रीरंग ध्यायिला चित्तीं निजसुखी ॥
नथ तिला दिसतसे तेथें तळवटीं ॥ १८ ॥

" आश्चर्य काय हो ! नथ या पेल्यामाजीं
जनि धन्य ! नाथ तूं ! नथ ही नाथा ! घ्या जी ! ॥१९॥

[५]

मग गृहाहुनी जंव नाइक येती हाटीं
भाण्डार-कपाटीं निरखिति आंतिल वाटी ॥ २० ॥
वाटींत नसे नथ ! " आश्चर्य, " म्हणति, " हें दुसरें !
" नच भिक्षेकरि, जो हात दुकानीं पसरे ॥ २१ ॥
प्रत्यक्ष देव तो पंढरिचा जो राणा-
अवतरे पुरंदर-विठ्ठल अवघा जाणा ! ॥ २२ ॥
विठ्ठला ! परत या ना, हो ! मजप्रति ॥
मागतों दान आतां मी तुजप्रति ॥
त्यागिला स्वार्थ सारा हे ! सुरपति ! ॥ २३ ॥
येतसे शरण मी, चुकलों, सेवा मुकलों !
अंतरे पुरंदर-विठ्ठल-पद ! मी भुललों ! ॥ २४ ॥

[६]

या दिना पासुनी दास विरक्तचि फिरती
' श्रीनिवास ' नाइक पाइक मग हे होती ॥ २५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: ........
नों: दि: ........

संसार त्यागुनी, भजन-दंग कवि झाला ॥
परि सुगण-दर्शनें नच कधिंही तो धाला ॥ २६ ॥

अजि 'हुच्च'-वेड हें यांनीं वरियलें ॥
अन् 'संत-कवि' नामांनीं चमकले ॥
जगिं सार्थ नाम ही त्यांचें झळकलें ॥ २७ ॥

श्रीरंग ! श्रीहरी ! वरद--विठ्ठला ! पावें
हे रुक्मिणि-रमणा ! वेंकटपति ! तूं धांवें ॥ २८ ॥

[ ७ ]

हे रामकृष्ण ! हे नारायण ! मज तारीं !
हे पन्नग-शयना ! गरुड-वहन ! गिरिधारी ! ॥ २९ ॥
हे पंकजनाभा ! नीरज-नाभा ! पाहीं
हे कंजनाभ ! हे कंद ! शरण-जन-ग्वाही ! ॥ ३० ॥

मम मनीं वसा हे देवा ! कामदा !
मम नयनिं मूर्त तूं राहीं सर्वदा !
मम पार्श्वि सदा घे ठावा मोक्षदा ! ॥ ३१ ॥

वसुदेव-सुता ! तव नामिं धुंद मज ठेवीं
गोविंद ! पुरंदर-विठ्ठल ! वामन सेवीं ! ॥ ३२ ॥

* समाप्त *

संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 90८६३